# 'स्व' - रुपवर्धिनी

कार्यवृत्त १९९८-९९



जीवन पुष्प चढा चरणों पर
माँगे मातृभूमि से यह वर
तेरा वैभव अमर रहे माँ
हम दिन चार रहें न रहें ॥
ध्येय साधना अमर रहे ।

# 'स्व'-रूपवर्धिनी

# कार्यवृत्त १९९८-९९

## ✤✤✤ अं त रं ग ✤✤✤


- मनोगत
- ध्येय साधना अमर रहे ! — श्री. संजय विष्णू तांबट
- शाखा व प्रकल्प उपक्रम वृत्त
- सार्वजनिक गणेशोत्सव व सामाजिक बांधिलकी
- ओढ मातृभूमीची — सौ.सोनल व श्री. निलेश काविया
- वर्धिनी - आईची आणि माझीही — कु. आरती वडके
- क्रिया करून करवावी । बहुतांकरवी ।। — सौ. विद्या दीक्षित
- मंत्र छोटा, तंत्र सोपे — श्री. मंदार पारगावकर
- शाळा- मुलांसाठी ? नव्हे नव्हे, पालकांसाठी !! — श्रीमती. पुष्पाताई नडे
- साता समुद्रापलीकडे ... वर्धिनीसाठी — श्री. कृ. ल. पटवर्धन
- वाढते काम, वाढता खर्च ...
- बलसागर भारत होवो



संपादक :: श्री. जयंत कवठेकर

मुद्रण : प्रबोध उद्योग, शुक्रवार पेठ, पुणे २
अभय मुद्रणालय, टिळक रोड,
पुणे - ३०

मुखपृष्ठ : श्री. अवधूत फडणीस

मुखपृष्ठ सहाय्य : श्री. मिलिंद वेर्लेकर

रेखांकने : श्री. शेखर साने

# 'स्व'-रूपवर्धिनी कार्यकारिणी

**सन्माननीय सभासद**

**श्री. अविनाश वारदेकर**

## कार्यकारी समिति

**अध्यक्ष**
श्री. जयसिंहभाई मरिवाला

**कार्यकारी अध्यक्ष**
श्री. पु. व. श्रॉफ

**कार्याध्यक्ष**
श्री. कृ. ल. पटवर्धन

**कोषाध्यक्ष**
श्री. श्री. शं. सामळ

**सहकार्याध्यक्षा**
श्रीमती कुंतला मुजुमदार

**सहकार्याध्यक्ष**
श्री. व. ना. दाते

**कार्यवाह**
श्री. रा. प. देसाई

**सहकार्यवाह**
श्री. शिरीष रा. पटवर्धन

## सभासद

श्री. प्रतापराव पवार
श्री. कां. गि. शहा
प्रा. श्रीमती उषःप्रभा देसाई
श्री. पुखराजजी जैन
श्रीमती पुष्पाताई नडे
श्री. संजय विष्णू तांबट

श्री. वा. दे. संचेती
श्री. कृ. गो. लवळेकर
श्री. उदय गुजर
सौ. चंद्राताई दलाया
श्री. नंदकिशोर सोंडूर
श्री. कन्हैय्यालाल बलदोटा

**पंजिकृत न्यास रजि. नं.एफ/१६९४, पुणे**

**फॉरेन कॉन्ट्रीब्युशन रेग्यु. ॲक्टनुसार नोंदणी क्र. ०८३९३०६०**

**आयकर सवलत आयकराच्या कलम ८० जी प्रमाणे व १००% सवलत कलम ३५ ऐसी प्रमाणे.**

**संपर्काचा पत्ता :-** 'स्व-'रूपवर्धिनी, २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ४११०११.
दूरध्वनी : - कार्यालय - ६२१७०४ निवास - ५६५५८३५, ६३४३१०, ५६५३६०६, ६६८४३७५

**धनादेश 'स्व'-रूपवर्धिनी या नावाने काढावेत.**

# मनोगत

पुण्यामध्ये नुकत्याच झालेल्या भारतीय विज्ञान परिषदेच्या अधिवेशनामध्ये केलेल्या अध्यक्षीय भाषणामध्ये डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी अत्यंत आत्मविश्वासपूर्वक विधान केले की, आगामी सहस्त्रक हे भारताचे (भारतीय प्रभावाचे) असेल. परंतु असे प्रत्यक्षात घडण्यासाठी नव्या पंचशीलाचा अंगिकार आपल्याला करावा लागेल, असे आग्रहपूर्वक सांगत त्यांनी विद्यार्थी केंद्रित शिक्षण, स्त्री केंद्रित कुटुंब, मानव केंद्रित समाज, ज्ञानकेंद्रित समाज व अभिनवता केंद्रित भारत ही पंचशीलाची सूत्रे सर्वांसमोर ठेवली. हे भाषण ऐकताना, वाचताना डोळ्यासमोर उभे राहिले, ते पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या 'एकात्म मानव विकासाचे सूत्र'. व्यक्तीचे कुटुंबाशी, समाजाशी, देशाशी आणि एकूण साऱ्या जगाशी काही निश्चित नाते आहे. गेल्या एकवीस वर्षांपासून 'स्व'-रूपवर्धिनीच्या माध्यमातून व्यक्तीचे अगदी असेच सर्वांशी असणारे हे नाते दृढ करण्याचा प्रयत्न केला जात आहे. म्हणूनच वर्धिनीमध्ये दररोज म्हटल्या जाणाऱ्या प्रार्थनेमध्ये खालील पंक्तींचा अंतर्भाव केलेला आहे -

**"जनांचा प्रवाहो इथे चाललेला**
**सदा संस्कृतीच्या मुळापासूनी ।**
**पिढ्या नांदती भोवती बांधवांच्या ।**
**आम्ही भिन्न ना त्यांचियापासूनी**
**तयांच्या कळा जाणवाव्या आम्हाला ।**
**तयांच्या सुखाचीच लागो स्पृहा ॥"**

आपले जीवन हे केवळ आपल्यापुरते नाही, याचा संस्कार जागा रहाणे आणि आपल्याला जे स्वातंत्र्यसुख मिळत आहे, त्यासाठी आधी कोणीतरी त्याग केला आहे, याविषयी मनात कृतज्ञतेचा भाव जागा रहाणे हेही समाजाच्या, देशाच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक आहे. नोव्हेंबर १९९९ ते ऑक्टोबर २००० हे वर्ष 'वंदेमातरम्' या गीत निर्मितीचे शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्ष आहे. केवळ 'वंदे मातरम्' या शब्दांच्या उच्चारासाठी अनेकांनी हौतात्म्य पत्करले आहे. स्वातंत्र्यसमरातील प्रेरणादायी इतिहास म.म. बाळशास्त्री हरदास यांनी त्यांच्या 'भारतीय स्वातंत्र्यसमर-१८५७ ते सुभाष' या पुस्तकात अत्यंत तपशीलाने मांडला आहे. स्वातंत्र्यसमराचा हा इतिहास तळटीपेच्या रूपाने या अंकात समाविष्ट केलेला आहे. स्वातंत्र्यसमरातील रणवीरांच्या जीवनाचा आदर्श डोळ्यासमोर ठेऊन त्यांचे 'वंदे मातरम्' चे जे व्रत होते, ते साकारण्याच्या दृष्टीने १९९८-९९ या कालावधीत केलेल्या अल्प प्रयत्नांचा हा वृत्तांत आपल्यासमोर ठेवीत आहोत.



**दि. २९ मार्च १८५७ : हुतात्मा मंगल पांडे यांनी बराकपूरच्या छावणीत प्रथम पारतंत्र्याविरूध्द गोळी झाडली. त्यांना ८ एप्रिल १८५७ ला फाशी. दि. १० मे १८५७ ला मीरतच्या सैनिकांनी पारतंत्र्याविरूध्द पहिली तोफ डागली.**

# ध्येय साधना अमर रहे !

✍ श्री. संजय विष्णू तांबट

ध्येयावरील अविचल निष्ठेतून आणि मातृभूमीच्या चरणावर समर्पित होण्याच्या भावनेतून साकारलेले विजयाचे क्षण दुर्मिळ असतात. राष्ट्रांच्या इतिहासाला निर्णायक वळण देण्याची शक्ती या क्षणांमध्ये असते. भारतीय सेनेच्या जवानांनी कारगीलच्या बर्फाच्छादित शिखरांवर झालेल्या घनघोर लढाईत जिद्दीने साकार केलेले 'विजय अभियान' हा असाच एक ऐतिहासिक क्षण आहे. त्यासाठी शेकडो भारतीय जवानांना आपल्या प्राणांचे बलिदान द्यावे लागले. अशा युध्दांमध्ये आधुनिक युध्दसामुग्रीबरोबरच लढणाऱ्या सैनिकांचे मनोबल अतिशय महत्त्वाचे ठरते. हे मनोबल घडविण्यामध्ये मातृभूमीविषयी उत्कट प्रेम आणि सहकाऱ्यांवर व ध्येयावर ठाम विश्वास या प्रेरणा महत्त्वाच्या ठरतात. सर्वंकष विपरीत परिस्थितीवर मात करून याच उच्च मनोबलाच्या सहाय्याने भारतीय जवानांनी कारगीलमधील विजयश्री खेचून आणली.

भारतीय जवानांच्या या शौर्याला व जिद्दीला अभिवादन करण्यासाठी यंदा कार्यवृत्ताच्या मुखपृष्ठावर कारगीलच्या रणभूमीवर शत्रूवर भडिमार करणारी तोफ दाखवली आहे. कारगीलच्या विजयाचा 'स्व'-रूपवर्धिनीच्या कामाशी नेमका संबंध काय, याचा विचार करीत असताना 'प्रेरणा जागृतीचे शिक्षण' हा दोन्हीला जोडणारा दुवा असल्याचे सहजपणे लक्षात येईल. देशासाठी मरण्याची आणि देशासाठीच जगण्याची प्रेरणा नव्या पिढीच्या मनात जागवणे हेच 'स्व'-रूपवर्धिनीचे काम आहे. भावनेच्या क्षणिक उर्मीत अनेक नवी कामे सुरू झालेली आजूबाजूला दिसतात. परंतु ही ऊर्मी ओसरली की, ती कामेही बऱ्याचदा बंद पडतात. या क्षणिक भावनांच्यावर उठून समाजासाठी, देशासाठी सातत्याने काम करणे, हा आमचा स्वभाव बनला पाहिजे, असा 'स्व'-रूपवर्धिनीचा आग्रह आहे. वर्धिनीच्या वर्षभरातील सर्व उपक्रमांची रचना हा हेतू मनात ठेवूनच केलेली असते. रोजच्या प्रार्थनेतूनही या ध्येयाच्या दिशेने जाण्याचा संकल्प वर्धकांच्या मनात रुजत असतो. **'पुन्हा जन्म घेऊ, स्वराष्ट्रास ध्याऊ'** हे प्रार्थनेतील शब्द म्हणत असताना त्याचा विचारही नकळत सुरू होतो आणि 'देशासाठी काहीतरी करायला हवे,' असे त्यांना वाटू लागते. असे वाटायला लागणे आणि ध्येयाचे स्पष्ट दर्शन होणे, ही प्रक्रियाही खूप मोठी असते. अनेकांच्या मनात अंकुरलेल्या अशा ध्येयबीजांना सुयोग्य वातावरण आणि प्रगटीकरणाची संधी देणे, एवढेच 'स्व'-रूपवर्धिनीचे काम आहे. मात्र ही ध्येयसाधना वर्षानुवर्षे दररोज नित्य नियमाने करावी लागते. गेल्या वर्षभरात या ध्येयाच्या वाटेवर आम्ही किती चालू शकलो, याचा आलेख या कार्यवृत्ताद्वारे सर्वासमोर मांडला आहे. त्याचे परीक्षण करीत असताना या ध्येयसाधनेला आपणही सहाय्यभूत व्हावे, असे वर्धिनीच्या सर्व कार्यकर्त्यांचे आपल्याला नम्र आवाहन आहे.

**दि. ११ मे ते ४ जून १८५७ पर्यंत दिल्ली, रोहीलखंड, बनारस, अलाहाबाद, कानपूर, झाशी, अयोध्या स्वतंत्र.**
**दि. २७ जून १८५७ : कानपूरच्या गंगाप्रवाहात एक हजार ब्रिटीश सैनिकांना कंठस्नान.**

# शाखावृत्त

## शाखा विभाग (मुली)

**भगिनी निवेदिता शाखा**

१७ जानेवारी १९९९ रोजी महिला व युवती विभागाचा मकर संक्रमण उत्सव आगरकर प्रशालेत संपन्न झाला. या कार्यक्रमाला प्रसिध्द वास्तुशिल्पी श्री. कृष्णकांत कापडिया उपस्थित होते. तर प्रमुख वक्त्या होत्या, वर्धिनीच्या ज्येष्ठ कार्यकर्त्या श्रीमती पुष्पाताई नडे. आपल्या प्रमुख मार्गदर्शनपर भाषणात पुष्पाताई म्हणाल्या की, "सामाजिक कार्य हे ईश्वरी कार्य आहे. संपूर्ण समाज हा माझा आहे, या भावनेतून काम केलं, तर सामाजिक काम हे ओझं वाटत नाही."

या उत्सवात अभिनय गीते, दीपनृत्य, योगासने व मनोरे, दोरीचा मल्लखांब व मशाल ही प्रात्याक्षिके सादर झाली.

चैत्र शुध्द प्रतिपदा - गुढीपाडवा यादिवशी वर्धिनीच्या सर्व युवक-युवती कार्यकर्त्यांची सामूहिक उपासना ओंकारेश्वराच्या मंदिरात झाली. यावेळी श्री. सुनील देवधर यांनी उपस्थितांना पूर्वांचलाचे अनुभव सांगून पूर्वांचलामधील आपल्या कामाची आवश्यकता पटवून देऊन मार्गदर्शन केले.

**१४ एप्रिल :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने वर्धिनीत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते. जास्तीत जास्त रक्तदाते मिळवण्यासाठी निवेदिता शाखेतील मुलींनीही खूप प्रयत्न केले व त्यांना प्रतिसादही चांगला मिळाला.

**१५ एप्रिल ते १७ एप्रिल ९९**- या कालावधीत ग्रामविकास प्रकल्पातील सर्व गावातील विद्यार्थ्यांचे निवासी शिबिर घेण्यात आले. या शिबिरातही निवेदिता शाखेच्या युवतींनी सहभाग घेतला.

जूनमध्ये नवीन मुली शाखेत येऊ लागल्या. एकूण संख्या ४० झाली.

अर्थ समजून शाखेत प्रार्थना म्हटली जावी म्हणून कुमारी विद्या कुडलिंगार हिचे 'प्रार्थना' या विषयावर व्याख्यान झाले. यानंतर प्रार्थना म्हणण्यामध्ये गुणात्मक फरक जाणवू लागला आहे.



आषाढी एकादशीनिमित्त सर्वांनी शाखेत हरीपाठ व गीतेमधील काही श्लोक म्हटले. नंतर पांडुरंगाची पूजा व श्री. प्रदीप आगाशे यांचे कीर्तन झाले.आधुनिक अभ्यासाशी मैत्री कशी करायची, तसेच गणित,इंग्लिश यासारख्या विषयांना आपल्या पध्दतीने सोपे कसे करायचे, ते त्यांनी कीर्तनमाध्यमातून सांगितले.

गुरूपौर्णिमेनिमित्त शाखेत निबंध स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धा तीन गटांमध्ये झाल्या. त्यांचे विषय होते-

५वी,६वी :- १) माझा शाखेतील पहिला दिवस २) माझी आई ३) सूर्य संपावर गेला तर !

७वी,८वी :- १) निसर्ग हाच गुरू २) बालपणीचा काळ सुखाचा ३) माझा देश व माझे कर्तव्य

९वी,१०वी :- १) या जगण्यावर शतदा प्रेम करावे २) ग्रंथ हेच गुरू

गुरूपोर्णिमेचा कार्यक्रम रामकृष्ण, आजोळ व निवेदिता शाखा अशा सर्वांचा एकत्रित कार्यक्रम झाला.

**दि. २६ एप्रिल १८५८ : जगदीशपूरचे स्वातंत्र्ययोध्दे कुमारसिंह यांनी आपला प्रदेश स्वतंत्र करूनच देह ठेवला.**

तिन्ही शाखांवरच्या वर्धकांनी आपली मनोगते व्यक्त केली. कार्यक्रमात श्री. प्रमोद बेहरे यांनी मार्गदर्शन केले.

टिळक पुण्यतिथीनिमित्त केसरी वाड्याला भेट दिली. टिळकांच्या या पवित्र वास्तूमध्ये गेल्यावर त्यांच्या स्मारकाचे पूजन केले व उपासना झाली. नंतर त्यांच्या जीवनावर आधारीत माहिती, चित्र व प्रतिकृती प्रदर्शनी पाहिली. मुलींनी टिपणे घेतली. अनेक गोष्टींची नोंद करून घेतली. त्यांच्या आयुष्यातील माहीत नसलेल्या अनेक गोष्टींची माहिती मिळाली. नंतर शाखेत या माहितीवर आधारीत प्रश्नमंजूषा घेतली गेली. मुलींचा प्रतिसाद चांगला होता.

८ ऑगस्टला डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, पर्वती येथे एकत्रीकरण झाले.निमित्त होते पर्वती शाखेच्या नामकरण समारंभाचे. याच दरम्यान शाखेत गीता पठणाची स्पर्धा दोन टप्प्यांमध्ये झाली. या स्पर्धेची पूर्वतयारी म्हणून शाखेत वर्गशः गीता पठणाची स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेमध्ये ५वीचा वर्ग सर्वांच्या मध्ये चमकला. नंतर मुख्य स्पर्धा दोन टप्प्यात पार पडल्या. या स्पर्धानंतर शाखेत, २१ ऑगस्ट रोजी श्री. अर्जुन खेडकर यांचे व्याख्यान झाले. त्यांनी भगवंतांनी सांगितलेला भक्तियोग अतिशय सोप्या पध्दतीने सांगितला.

१५ ऑगस्ट रोजी निवेदिता, राजमाता जिजाऊ व आजोळ या शाखांचे एकत्रीकरण होते. खेळांच्या स्पर्धा झाल्या. वर्धिनीच्या इमारतीतील सभागृह विशेष स्वरूपात सजवले गेले होते. तेथे पुढचा कार्यक्रम पार पडला. सौ. सुनिला सोहनी यांनी यावेळी मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी आपल्या प्रतिज्ञेचा अर्थ व ती जीवनात कशी आणावी याविषयी सांगितले.

२६ ऑगस्ट हा दिवस 'देशरक्षाबंधन' म्हणून साजरा केला. यावेळी मुलींनी सोमवार पेठ या भागात घरोघरी जाऊन आपला संकल्प सांगितला. वर्धिनीबद्दल माहिती सांगितली आणि सर्वांना राख्या बांधून त्यांना आपल्या संकल्पात सहभागी करून घेतले. सोमवार पेठ हा भाग सर्वांच्याच परिचयाचा होता. या भागातील अनेकजणांनी नंतर शाखेत येऊन भेटी दिल्या व वर्धिनी करीत असलेल्या कामात कोणत्या ना कोणत्या स्वरूपात सहभागी होण्याविषयी इच्छा व्यक्त केली. इतक्या छोट्या मुली देश, जवान या सर्वांच्याबद्दल इतक्या प्रभावीपणे बोलतात,याविषयी त्यांनी आश्चर्य व्यक्त केले. अनेकांनी पैसे देऊ केले. पण हे सर्व पैशासाठी नसून आपल्या समाजासाठी, देशासाठी आहे, असे मुलींनी त्यांना पटवून दिले. सोमवार पेठ भागातील डॉ. कुमठा यांनी वर्धिनीबद्दल चौकशी केली आणि कोणत्याही वेळी, कोणत्याही स्वरूपाची मदत करण्याची मनापासून इच्छा असल्याचे सांगितले.

गणेशोत्सवाचे वारे वाहू लागले. पथकाचा सराव सुरू झाला. यावर्षी शाखेने लेझीमचे पथक सादर केले. पथक पहिल्या व शेवटच्या दिवशी होते. दरम्यानच्या दिवसात मुलींनी शाखेतील सर्व युवतींच्या घरी जाऊन आरतीचे कार्यक्रम केले. या निमित्ताने सर्वांच्या सात आरत्या पाठ झाल्या. अथर्वशीर्ष, तसेच मंत्रपुष्पांजली मुलींनी मोठ्या आवडीने पाठ केली.

या सर्वांचा सराव मोठ्या उत्साहाने शाखेत चालत होता. प्रत्येक घरी अर्धा तास आरतीचा कार्यक्रम चाले. प्रत्येक घरी रोज होणारी आरती व शाखेच्या मुलींच्या बरोबर एकच दिवस झालेली आरती यात

**दि. १८ जून १८५८ : झाशीची महाराणी संग्राम देवता लक्ष्मीबाई अखेरपर्यन्त झुंजत झुंजत ग्वाल्हेरच्या गंगादास बाबा यांच्या झोपडीशेजारी पेटलेल्या चितेच्या ज्वालेत पंचतत्त्वात विलीन.**

फरक असल्याचे पालकांनी सांगितले व समाधान व्यक्त केले. तसेच पुढल्या वर्षी नक्की येण्याविषयी सांगितले.

३० सप्टेंबर रोजी श्री. उत्तमराव पोरे सरांचे व्याख्यान झाले. त्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांचे चरित्र सांगितले.

९ ऑक्टोबर रोजी श्री. दि. दा. जोशी सरांचे व्याख्यान झाले. २ ऑक्टोबरला झालेल्या गांधी जयंती निमित्त हे व्याख्यान झाले. यावेळी सरांनी महात्मा गांधी व भगतसिंग अशा दोन थोर पुरूषांची चरित्रे थोडक्यात सांगितली.

नंतर सर्व वर्गांवर तिन्ही विषयांच्या पूर्व परीक्षा घेण्यात आल्या. या पूर्व परीक्षांचा फायदा शाळेच्या परीक्षांमध्ये झाला.

३१ ते ३ नोव्हेंबर या दरम्यान भावे हायस्कूलमध्ये शिबिर झाले. शिबिराचा विषय 'साहसी सफरी' असा होता. संख्या १०० होती.

दिवाळी सुटीमध्ये श्री. कुलकर्णी सरांचे व्याख्यान व शंकानिरसनाचा कार्यक्रम झाला. 'कारगीलच्या युध्दात वापरलेली शस्त्रास्त्रे' असा विषय सरांनी मांडला. त्याबाबत विचारलेल्या अनेक प्रश्नांना, शंकांना उत्तरे दिली.

२७ नोव्हेंबरला श्री. नाना लाभे यांचे 'हस्ताक्षर सुधारणा' यावर एक व्याख्यान झाले.

**राजमाता जिजाऊ शाखा**

दि. १२ ऑगस्ट ९८ रोजी राजमाता जिजाऊ शाखा अवघ्या २५ मुलींसह सुरू झाली. आज शाखेत ३८ मुली आहेत.

**शाखेत झालेले कार्यक्रम :** जानेवारीमध्ये राजमाता जिजाऊ शाखेचे संक्रांत उत्सवातले पहिलेच प्रात्याक्षिक बसवले होते. दोरीवरच्या मल्लखांबासाठी मुलींनी खूप सराव केला. ऐन थंडीतही सकाळी लवकर येऊन मुली सराव करत होत्या. सुरवातीला अवघड वाटणारे प्रात्यक्षिक मुलींच्या उत्साहाने आणि परिश्रमाने सहज सुलभ कधी झाले हे कळलेच नाही. 'आओ चले, हम चले' या भारतीयम्‌च्या गाण्यावरचे हे प्रात्याक्षिक वेगवेगळ्या आकारातून सादर केले.

**गुरूपोर्णिमा :** दि. २८ जुलै रोजी गुरूपोर्णिमेचा कार्यक्रम शाखेच्या वेळातच झाला. सर्व मुलींना गुरूशिष्य या विषयांवर तयारी करून बोलायला सांगितले. राजमाता जिजाऊ शाखा ज्या आंबेडकर शाळेत भरते, त्या ठिकाणी वारकरी दरवर्षी मुक्कामाला उतरतात. म्हणून त्या दिवशी शाखा भरल्यावर खेळ घेण्याऐवजी वारकऱ्यांशी गप्पा मारावयाचा कार्यक्रम झाला. मुलींना छोटे छोटे गट करून त्यांच्याशी गप्पा मारावयास सांगितल्या. मुली त्यांच्याशी गप्पा मारण्यात फारच दंग झाल्या होत्या. खेळाच्या वेळाशिवाय तासिका व्यवस्थेच्या वेळीही गप्पाच झाल्या.



दि. ८ ऑगस्ट रोजी एक वर्ष पूर्ण झाल्यावर शाखेस 'राजमाता जिजाऊ शाखा' असे नाव मिळाले. कार्यक्रमास प्रा. शिरीष आपटे आले होते. राजमाता जिजाऊंचे संपूर्ण चरित्र त्यांनी सांगितले. कार्यक्रमात जिजाऊंचे पद्य म्हंटले. यावर्षीचे रक्षाबंधन वेगळ्या पध्दतीने झाले. कारगिलच्या पार्श्वभूमीवर 'देशरक्षाबंधन संकल्पपत्रा'सह रक्षाबंधन घरोघरी जाऊन झाले. रक्षाबंधनाच्या वेळच्या प्रतिक्रिया

**दि. १८ एप्रिल १८५९ : सेनापती तात्या टोपे यांना शिप्री येथे फाशी.**
**दि. ३१ डिसेंबर १८५९ : श्रीमंत नानासाहेब पेशवे नेपाळात अंतर्धान.**

फारच बोलक्या होत्या. मुलींना त्यानिमित्ताने समाजाशी संवाद साधता आला. काहींनी रस्त्यावरील पथारीवाले, वडेवाले, चांभार, फुलवाले, फळवाले यांनाही राख्या बांधल्या. काही ठिकाणी अनेकांनी मुलींना पैसे देऊ केले, पण मुली ते नम्रपणे नाकारून उत्साहाने त्यांना रक्षाबंधनाचे महत्त्व पटवून सांगत होत्या. सर्वत्र या छोट्या मुलींचे जोरदार स्वागत झाले.

एका ठिकाणी एका उत्तर प्रदेशातल्या भैय्याला इतका आनंद झाला की, त्याने अर्धा लिटर दुधाचा ३ कप चहा केला. आग्रहानं प्यायला लावला आणि एक तास गप्पाही मारल्या. यावर्षी शाखेत दहीहंडी साजरी केली. मुलींनी ढोल वाजवत वाजवत मुलांप्रमाणेच घोषणा देत दहीहंडीचा आनंद पुरेपूर लुटला. शाखेत संख्या जास्त असल्याने दोन गट पाडून गटशः स्पर्धा घेतली. प्रत्येक गटाला तीन वेळा संधी दिली गेली. हा कार्यक्रम फारच रंगला.

यावर्षी शाखेचे मल्लखांबाचे प्रात्याक्षिक झाले. त्यातीलच आठ जणींचा संघ जिल्हास्तरावरील मल्लखांब स्पर्धेच्या पात्रता फेरीसाठी उतरला.

शाखेवर या वर्षभरात सौ. वेदवती जोशी, श्री. दादा पारखी, प्रा. शिरीष आपटे, कु. मंगल कुडलिंगार यांची वेगवेगळ्या विषयांवर व्याख्याने झाली. मंगलताईने आसामातले अनुभव सांगितले.

कारगिल युध्द चालू असतांना शाखेतून ५० जणींनी सैनिकांना पत्र पाठवले होते. आपण येथून त्यांना शुभेच्छा पाठवल्याचा मुलींना खूप आनंद झाला होता. मात्र सैनिकांचे जे मुलींना उत्तर आले, त्यादिवशीचे शाखेतले वातावरण शब्दांत व्यक्त करणे अवघड आहे.

'You are a real Indian Blood' असा त्यांचा संदेश होता. 'अब तो नगारा बज ही चुका है। सरहदपर शैतान का नक्शेपरसे नाम मिटा दो पापी पाकिस्तानका' अशा घोषणा बराच काळ निनादत होत्या. या सर्वांबराबरच मुळशी धरणावरची सहल, भोंडला प्रश्नमंजूषा स्पर्धा, पद्य स्पर्धा, पुस्तकवाचन, नागपंचमी असे कार्यक्रम वर्षभरात झाले.

**संपर्कात आलेले अनुभव** :- शाखेतील इ. ७वी तील एक मुलगी. घरची परिस्थिती अगदी बेताची. वडिलांचे काम करत असताना डोळ्यांवर परिणाम झालेला. आई काम करते. अतिशय समंजस मुलगी. तिचा भाऊ घरातून निघून गेलेला. त्यात हिचे सहामहीचे पेपर चालू होते. घरात खूप तणाव होता. आई दिवसदिवस रडत होती. शाखेतून ताई संपर्काला गेल्या. तिचा अभ्यास त्या सर्व वातावरणात होत नव्हता. सर्व नातेवाईक तिला आमच्याकडे अभ्यासला चल असा आग्रह करत होते. मात्र ती कुणाकडेच जायला तयार नव्हती. ताईने तिला घरी न्यायचे असे ठरवले. ती लगेचच तयार झाली. सर्व नातेवाईक म्हणत होते, ही काय जादू आहे?

एक पालक. घरात कुल्फीची गाडी. जेमतेमच धंदा होतो. त्या मुलीची आई आता राख्या तयार करण्याचे काम करते. ताईसाठी काय करू अन् काय नको असं त्यांना होत होतं. गावावरून आल्यावर ताईसाठी त्यांनी फळं पाठवून दिली. अतिशय प्रेम आहे. वर्धिनीवर खूप विश्वास आहे. वर्धिनीत यायला लागल्यापासून मुलीत जे वदल झाले, त्याचा खूप अभिमान वाटतो. ती मुलगी आज धिटाईने सर्व कामे करते, हे वघून त्या आनंदून जातात.

वर्षभरात खूप अनुभव आले. या अनुभवांतून खूप शिकायला मिळाले. अजूनही काम वाढवायला हवं असं वाटतं.

**दि. १२ जून १८५८ : बाबासाहेब नरगुंदकर भावे यांना बेळगावला फाशी.**
**दि. २० ऑगस्ट १८६२ : रावसाहेब पेशवे यांना कानपूरच्या तुरुंगात फाशी.**

## शाखा विभाग ( मुले )

*मुलांच्या सहा शाखा असून या शाखांमध्ये दैनंदिन नित्य शाखेत होणाऱ्या कार्यक्रमांव्यतिरिक्त वर्षभर अनेक उपक्रम होत असतात. याही वर्षात अनेक उपक्रम झाले. त्यांचा हा थोडक्यात वृत्तांत -*

१) **सुटीमधील उपक्रम** - परीक्षा संपल्यानंतर निवासी शिबिरानंतरच्या काळात दैनंदिन शाखेत अनेक उपक्रम घेतले जातात. यावर्षी सुट्टयांच्या कालावधीत रामकृष्ण शाखेने ‘पुणे दर्शन’ उपक्रम एक आठवड्यासाठी घेतला होता. शाखेतील मुलांना पुणे शहराची, शहराच्या विविध भागांची ओळख व्हावी म्हणून सायकल फेरीचा कार्यक्रम आखला होता. दररोज सकाळी ६.०० वाजता शाखेतील वर्धक सायकल फेरीला निघायचे. त्यांच्या समवेत दोन-तीन युवक कार्यकर्ते असायचे. दररोज शहराच्या एका भागात जाऊन तेथील महत्त्वाची ठिकाणे पहाणे व जाण्याचा मार्ग समजावून घेणे असा या उपक्रमामागे उद्देश होता. अन्य शाखांवर जाहिरात स्पर्धा, कल्पना परिस्फोट, हस्ताक्षर स्पर्धा, निबंध स्पर्धा, वादविवाद, प्रश्नमंजूषा, विमान पडते आहे, नाट्यस्पर्धा, अशा विविध विषयांच्या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या.

२) **वनस्पती संकलन प्रकल्प** - चार भिंतीबाहेरच्या जगात उघड्या डोळ्यांनी हिंडले, तर कितीतरी गोष्टी बघायला, अनुभवायला मिळतात. सृष्टीतल्या चमत्कृती पहाता येतात. योगानंद शाखेने सिंहगडाच्या पदभ्रमणाच्या कार्यक्रमाबरोबरच सिंहगड परिसरात सापडणाऱ्या वनस्पतींचे नमुने गोळा करण्याचा प्रकल्प मुलांना दिला होता. मग काय, मुले वनस्पतींचे वेगवेगळे नमुने गोळा करण्यासाठी अक्षरशः किती तरी वेळ भटकत राहिली. पहाता पहाता विविध प्रकारच्या वनस्पतींचे अनेक नमुने मुलांनी गोळा केले. गोळा केलेल्या वनस्पती सिंहगडाच्या कोणत्या भागात सापडल्या, याच्या नोंदी घेतल्या गेल्या. वनस्पती विषयाचे तज्ज्ञ डॉ. वा. द. वर्तक यांनी या वनस्पती कोणत्या आहेत, तसेच त्यांची वैशिष्ट्ये काय आहेत, ती मुलांना सांगितली. त्या सर्वांच्या नोंदी मुलांनी घेतल्या. या धडपडीत काही दुर्मिळ वनस्पती सिंहगड परिसरात असल्याचे लक्षात आले. या वनस्पतींच्या नमुन्यांचे, तसेच दुर्मिळ शस्त्रे या विषयावरचे एक प्रदर्शन शाखेने नंतर भरवले. कारगिल युध्दानंतर ‘कारगिल’ या विषयावर असलेल्या माहिती संकलनाचाही एक प्रकल्प शाखेने पूर्ण केला.

३) **पदभ्रमण** - या वर्षी शाखांनी सिंहगड, तोरणा, पुरंदर, राजमाची, लोहगड, नीलकंठेश्वर अशा ठिकाणी पदभ्रमणासाठी वर्धकांना नेले होते. पदभ्रमंती बरोबरच ऐतिहासिक कथा ऐकताना वर्धकांचे मन नकळतच त्या वातावरणात जाते आणि मग छत्रपतींच्या काळात शूर मावळा ज्या आवेशाने चालत असेल, अशा थाटात पावले पडायला लागत. आपण किती उंचावर चढलो, किती चाललो याचाही विसर पडे.

४) **व्याख्याने** - शाखांवर झालेल्या विविध व्याख्यानसत्रांपैकी काही व्याख्यानांचे विषय खालीलप्रमाणे होते.

| | |
|---|---|
| **विदेश वास्तव्यातील अनुभव** | - श्री. पराग जगताप |
| **वैयक्तिक नियोजन** | - श्री. विलास कुलकर्णी |
| **प्रश्नपत्रिका सोडविण्याचे तंत्र** | - श्री. राजेश देशमुख |
| **त्रिसूत्री** | - श्रीमती पुष्पाताई नडे |
| **विजयाचे महत्त्व** | - श्री. संजय तांबट |
| **कारगिलच्या भूमीत** | - श्री नितीन वेल्हे |
| **प्राण्यांच्या सवयी** | - डॉ. प्रभाकर देवरे |
| **गर्जा जयजयकार क्रांतिचा** | - श्री. कवठेकर सर |

**इ. स. १८७९ : वासुदेव बळवंत फडके यांच्या रणयज्ञाचा प्रारंभ.**
**फेब्रुवारी १८८३ मध्ये त्यांना एडनच्या तुरूंगात एकाकी अवस्थेत मृत्यू.**

**NCC ची आवश्यकता** - श्री.चंदन हयगुंडे

**कोयना भूकंप पुनर्वसनातील अनुभव** - श्री.दि.दा.जोशी

५) **गीता पाठांतर स्पर्धा** - संस्कृत वर्षानिमित्त यावर्षी शाखापातळीवर गीतेच्या बाराव्या अध्याय पाठांतराची स्पर्धा घेण्यात आली. युवक विभाग व युवती विभाग यांच्या अंतर्गत असलेल्या शाखा, तसेच वीर अभिमन्यू बालशाखा व आजोळ प्रकल्प या स्पर्धेत सहभागी होते. या स्पर्धेत राजमाता जिजाऊ शाखेचा पहिला क्रमांक आला.

६) **मासिक प्रबोधन बैठक** - यावर्षी युवक शिबिरानंतर म्हणजे जुलै ९९ पासून महिन्याच्या शेवटच्या रविवारी शाखा व प्रकल्प विभागातील कार्यकर्त्यांसाठी मासिक प्रबोधन बैठकीची सुरुवात झाली. वर्षअखेर झालेले प्रबोधनाचे विषय पुढीलप्रमाणे होते.

१) **आर्य चाणक्य : एक शिक्षक** (चित्रफीत) - श्री. संजय पुरंदरे

२) **कारगिल क्षेत्रातील अतुलनीय शौर्य** - श्री. दादा पारखी

३) **महानायक व तोतोचान या पुस्तकांचा परिचय** - प्रा. शरद वाघ

४) **राष्ट्रीयत्व आणि नागरिकत्व** - श्री. मधुभाई कुलकर्णी

७) **देशरक्षाबंधन** - *रक्षाबंधनाच्या निमित्ताने गेल्या वर्षी स्वदेशी विषयाला प्राधान्य देऊन रक्षाबंधनाचा कार्यक्रम वर्धकांनी साजरा केला होता. या वर्षी 'देशरक्षा' ही केवळ सैन्याची जवाबदारी नसून नागरिक म्हणून आमचीही आहे, हा भाव जागवण्याच्या हेतूने घरोघरी संपर्क करण्याचे ठरविण्यात आले. या निमित्ताने खालील संकल्पपत्राचे वितरण पाच हजार घरी करण्यात आले.*

## 'देशरक्षा'बंधन

***हे वीर जवानांनो ! कारगिलमधील युध्दात अतुलनीय पराक्रमाने आणि बलिदानाने तुम्ही देशाच्या सीमेचे रक्षण केलेत. तुम्हाला आमचे लाखो प्रणाम! देशाच्या सीमेच्या आतही वेगवेगळ्या रुपात अनेक शत्रू आहेत. आज राखीपौर्णिमेच्या निमित्ताने या शत्रूंपासून देशाचे रक्षण करण्याचा संकल्प जबाबदार नागरिक म्हणून आम्ही करीत आहोत. आमचा संकल्प असा आहे की आम्ही -***

**** मुलामुलींना शिक्षणासाठी प्रोत्साहन देऊ.***

**** घर आणि परिसर स्वच्छ ठेऊ.***

**** भ्रष्टाचाराला साथ आणि प्रोत्साहन देणार नाही.***

**** साधेपणानेच राहू.***

**** देशाच्या संस्कृतीचे रक्षण करु.***

**** देशविघातक शक्तींविरुध्द ठाम उभे राहू.***

***भारतमाताकी जय !***



*'स्व'-रूपवर्धिनी, पुणे-४११०११*

इ.स. १८७२ : पं. रामसिंह कुका यांचे पंजाबात उत्थान.
१८८५ मध्ये त्यांचे ब्रह्मदेशातील तुरूंगात बलीदान.

# वीर अभिमन्यु बालशाखा वृत्तांत

सौ. मनिषा शेळके

संक्रांत उत्सवात यावर्षी बालशाखेतील मुलांनी 'ॐकार स्वरूपा' या गाण्यावर दीपनृत्य बसविले होते. श्रीमती प्राचीताई जोशी यांनी त्यासाठी खूपच मेहनत घेतली होती.

२६ जानेवारी या दिवशी बालशाखेवर झेंडा वंदनाचा कार्यक्रम झाल्यानंतर मुलांच्या दोन गटात स्पर्धा झाल्या. मे महिन्यात उन्हाळी शिबिर नवीन मराठी शाळेत झाले. शिबिराचा प्रमुख उद्देश मुलांना स्वावलंबी बनविणे, स्वतःचे काम स्वतः करण्याची सवय लावणे हा होता. जून महिन्यामधे ९०% पेक्षा अधिक गुण मिळालेल्या मुलांचा 'गुणगौरव' कार्यक्रम संपन्न झाला.

**गुरूपौर्णिमा** :- दरवर्षीप्रमाणे यंदाच्या वर्षीही गुरूपौर्णिमा शाखेत साजरी करण्यात आली. मुलांनी गुरू शिष्यांच्या छान गोष्टी सांगितल्या. या कार्यक्रमामध्ये प्रमुख पाहुणे श्री. प्रवीण महामुनी होते. त्यांनी अतिशय सुंदर गोष्ट सांगून गुरूपौर्णिमेची माहिती व महत्त्व सांगितले.

आषाढी एकादशीला बालशाखेतील मुले बालवाडीच्या मुलांबरोबर पालखी मिरवणुकीमध्ये सामील झाली होती. मुलांनी वारकरी संप्रदायातील विविध प्रकारचा पोषाख केला होता. यावेळी बालशाखेतील मुलांनी पालखीबरोबर रिंगण केले होते.

१५ ऑगस्ट या दिवशी झेंडावंदन झाल्यावर विविध स्पर्धा घेण्यात आल्या.

**रक्षाबंधन** :- यावर्षी शाखेने रामकृष्ण शाखेतील मोठ्या गटातील मुलांबरोबर वेगवेगळ्या पेठेत जाऊन घरोघरी राखी व देशरक्षाबंधनाचे संकल्पपत्र दिले. त्यातील संदेश प्रत्येकाला समजावून सांगितला. लोकांनी चांगला प्रतिसाद दिला.

**गणपती उत्सवः**- गणपती उत्सवात यावर्षी टिपरीपथक श्री. समीत आणि श्री. अभिषेक यांनी खूप परिश्रम घेऊन पथक बसविले.

**कोजागिरी पौर्णिमा** :- बालशाखेतील मुलांच्या पर्वतीवर विविध प्रकारच्या स्पर्धा झाल्या. मुलांना आदल्या दिवशीच शाखेवर बोलवले होते आणि पहाटे सर्वजण चालत पर्वतीवर पोहोचले. दिवाळीच्या सुटीमधे मुलांना संभाजी उद्यानामध्ये किल्ल्याचं प्रदर्शन पाहण्यास नेले होते. 'पुढच्या वर्षी आम्हीही भाग घेऊ' असे मुलांनी किल्ले पाहून उद्गार काढले.

यावर्षी दिवाळी शिबिर ज्ञानदा प्रशाला, कर्वेनगर या शाळेत संपन्न झाले. या शिबिरामध्ये मुलांना बारा प्रांतांची माहिती देण्यात आली. यावेळी हा प्रथमच प्रयोग होता. बारा प्रांतांची माहिती म्हणजे सामाजिक, भौगोलिक, हवामान, वेशभूषा, भाषा, मुख्य अन्न वगैरे माहिती मुलांना देण्यात आली. वर्धिनीच्या युवक युवतींनी खूपच छान माहिती दिली. त्या त्या प्रांताची गाणी मुलांना सांगितली व मुख्य म्हणजे शिबिर प्रमुखाने या सर्व सत्रांवर आधारीत एकाशेपन्नास प्रश्न तयार करून प्रश्नमंजूषा कार्यक्रम घेतला. या प्रश्नमंजूषेमध्ये मुलांनी ९०% प्रश्नांची अगदी बरोबर उत्तरे दिली. प्रश्नमंजूषेचा हा कार्यक्रम अगदी चुरशीचा झाला.

या शिबिराच्या समारोपप्रसंगी शिक्षणक्षेत्रातील एक तज्ज्ञ श्री. पु.ग. तथा भैय्यासाहेब वैद्य यांचे मार्गदर्शन लाभले.

❋ ❋ ❋

**दि. २२ जून १८९७ : रँड व आयर्स्ट यांचा चाफेकर बंधूकडून वध.**

# आजोळ

**शुभेच्छा कार्यक्रम -** आजोळ प्रकल्पाने यंदा एक वेगळा उपक्रम केला. कल्पना होती श्री. सु. म. जोशी सरांची. त्यानुसार आजोळ प्रकल्पात येऊन गेलेल्या व १९९९ मार्चच्या शालांत परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना श्री. सु. म. जोशी सर व श्री. कवठेकर सर समक्ष भेटून शुभेच्छा देण्यासाठी गेले होते. एकूण १९ विद्यार्थी-विद्यार्थीनींशी संपर्क झाला.

**पाणपोई :** गेली चार वर्षे आजोळ प्रकल्पाकडे दि. १४ एप्रिल रोजी श्रध्देय डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिवशी 'स्व'-रूपवर्धिनीच्या पाणपोई उपक्रमाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. यंदाही ही जबाबदारी आजोळ प्रकल्पातील सर्व विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी उत्तम रीतीने उचलली. सुमारे तीन हजार नागरिकांनी पाणपोईचा लाभ घेतला,

**सहल :** एप्रिलमध्ये तुळापूरआळंदी अशी एक दिवसाची सहल आयोजित केली होती. प्रथम तुळापूर येथील मंदिरात उपासना झाली. नंतर छत्रपती संभाजी महाराजांना आदरांजली अर्पण करण्यात आली. सर्वजण संगमावर विहाराकरिता जाऊन आले. त्यानंतर बरोबर आणलेल्या डब्यांचा आस्वाद घेऊन आळंदीला प्रयाण केले. ज्ञानेश्वर माऊलींच्या दर्शनानंतर परतीचा प्रवास सुरू झाला. वाटेत एका विस्तीर्ण वटवृक्षाच्या सावलीत भेळ व कलिंगडाचा पुरेपूर 'आस्वाद' घेऊन सायंकाळी सहापर्यंत वर्धिनीत पोचलो.

**गुरूपौर्णिमा :-** विद्यार्थ्यांनी गुरूशिष्य कथा सांगितल्या. श्री. कवठेकर सरांनी जॉर्ज कार्व्हरचे चरित्र सांगितले. 'स्वत:तील सत्प्रवृत्त 'मी' ला गुरू मानून कार्यरत व्हायला पाहिजे' असे सूत्र या कथेद्वारे मांडले.

**टिळक पुण्यतिथी :** यंदाची टिळक पुण्यतिथी जरा वेगळ्या नियोजनाने साजरी केली. मुलांचे तीन गट पाडून त्यांना लोकमान्य टिळकांचे स्वराज्य, शिक्षण व राष्ट्र या विषयांवरील विचारांचे संकलन करून

### राखी - अस्वस्थ करणारी आणि आनंद देणारी

काहींनी रस्ते तयार करणाऱ्या लहान लहान मुलांना राख्या बांधल्या. मुली शाखेत सांगत होत्या, "ताई त्यांना राखी बांधली , तेव्हा आनंद वाटत होता आणि वाईटही वाटत होते. आमच्या एवढेच त्यांचेही हात होते. आमच्या हातात देशरक्षाबंधनाची राखी होती. त्यांच्या हातात मात्र कुदळी फावडी होत्या." देशरक्षा बंधनाच्या संकल्प पत्रावर 'मुलामुलींना शिक्षण द्या', असा एक मुद्दा होता. हाच मुद्दा मुलींच्या मनात येत होता. त्या मुली शाखेत आल्यावर म्हणत होत्या 'ताई ! ती मुलं कशी शिकणार? त्यांना कोण शिकवणार?' मुलींना याच विचाराने अस्वस्थ केले होते. आणि त्या कामगार मुलांच्या चेहऱ्यावर मात्र एवढ्या अनाहूत बहिणींच्या रक्षावंधनाचा अनपेक्षित लाभ झाल्याचा आनंद होता.

**दि. १८ एप्रिल १८९८ ला दामोदरपंत चाफेकर, ८ मे १८९९ ला वासुदेवराव चाफेकर, १० मे १८९९ ला रानडे व १२ मे १८९९ ला बाळकृष्णपंत चाफेकर यांना फाशी.**

मांडण्यास सांगितले होते. मुलांनी तयारी करून हे विषय मांडले. श्री. कवठेकर सर यांनी लोकमान्य टिळकांसारख्या अलौकिक गुरूची शाबासकी सी. डी. देशमुखांसारख्या अलौकिक शिष्याला ज्यायोगे लाभली, ती प्रसंगकथा सांगितली.

**रक्षाबंधन :** गतवर्षाची राखी 'स्वदेशी व्रताची राखी' होती. तर यंदाची 'देशरक्षा-बंधनाची राखी' होती. आजोळकडे कमला नेहरू रूग्णालय, सणस कन्या विद्यालय व जावळे चौक हा परिसर रक्षाबंधनाकरिता आला होता. या परिसरातील सुमारे दीड हजार नागरिक बंधुभगिनींशी 'देशरक्षाबंधन' या नावाचे संकल्पपत्र देऊन संपर्क साधला.

**दहीहंडी :** यंदाची दहीहंडी आजोळच्या विद्यार्थ्यांनी पूर्णपणे स्वतःहून सर्व खरेदी करून, सजावट करून बांधली होती. हंडी फोडणं आणि नंतरचा गोपाळकाला मस्त रंगला.

**नवरात्र :** प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही आजोळच्या विद्यार्थिनींचा 'भोंडला' जोशात रंगला. यंदाच्या कार्यक्रमाची दोन वैशिष्ट्ये होती. मुलांना केवळ मुलींकरिता असलेल्या या उपक्रमात सहभागी होता येत नाही म्हणून मुलांच्याकरिता दिवाळी भेटकार्ड तयार करण्याची स्पर्धा घेतली. भोंडल्याच्या गाण्या-नाचण्याच्या गदारोळातही या छोट्या कलावंतांची समाधी अभंग राहिली होती. शेवटच्या खिरापतीच्या अल्पोपहारालाही त्यांना जरा जबरदस्ती करूनच आणावे लागले. दुसरे वैशिष्ट्य म्हणजे आजोळच्या मुलींइतक्याच उत्साहाने कार्यालयातील, ग्रंथालयातील, प्रकल्पातील महिलाही या भोंडल्यात सहभागी झाल्या होत्या.

'स्व'रूपवर्धिनीचे काम अनुभवण्यासाठी कॅनडातून श्री. नीलेश काविया व सौ. सोनल काविया 'स्व'-रूपवर्धिनीच्या संपर्कात दीड-दोन महिने राहिले होते. आजोळच्या मुलांच्या इंग्रजी संभाषणाचा सराव करून देण्यासाठी दररोज दुपारी दीड ते अडीच असा एक तास ते घेत होते. हा उपक्रम दीड महिना चालला. या उभयतांच्या व आजोळच्या मुलांच्या गुरू-शिष्य नात्याची वीण घट्ट विणली गेली होती.

**शिबिर !**

**छे ! छे ! घरच !!**

शिबिर व्यवस्थित सुरू झालं. पहिल्या दिवसाचे कार्यक्रम व्यवस्थित पार पडले. पण दुसऱ्या दिवशी मुलींचा घरी जाण्यासाठी आग्रह सुरू झाला. राग आला. पण तो आवरून, थोडं रागावून, थोडं समजावून सांगितलं की 'हे शिबिर का, कशासाठी'. मग मात्र स्वतःची चूक लक्षात येऊन सर्वजणी रडायला लागल्या. आणि ज्या चार मुली घरी जाण्याबाबत जास्त त्रास देत होत्या . त्या तर येऊन पाया पडल्या व रडू लागल्या. आणि म्हणू लागल्या की, 'आमचं चुकलं!' त्या संध्याकाळी कोणीच जेवायला तयार नव्हतं. सर्वच जण रडत असल्यामुळे प्रत्येकीला समजावून घास भरवावा लागला.

**२० जुलै १९०५ : वंगभंग घोषणा व पुण्यात विलायती कापडाची होळी.**

# शिबिरांचा वृत्तांत

**शाखा विभाग (मुली)** - दिनांक २१ एप्रिल ते २५ एप्रिल या काळात कर्वे स्त्री शिक्षण संस्था, हिंगणे येथे मुलींचे शिबिर झाले. शिबिराचे विषय खालीलप्रमाणे होते

**मोठा गट :- ओळख देशप्रश्नांची**
**छोटा गट :- धडपडणारी माणसे**

शिबिरातली एकूण संख्या ऐंशी होती. शिबिरात पद्य स्पर्धा, वादविवाद स्पर्धा व अन्य स्पर्धा झाल्या. त्यांचे विषय पुढीलप्रमाणे होते.-

**लहान गट :-** आईने नोकरी करावी की करू नये?

**मोठा गट :-** अणुचाचण्या होणे योग्य का अयोग्य ३) अभिरूप न्यायालय ४) प्रश्नमंजूषा ५) नाट्य स्पर्धा ६) टेलिमॅच ७) लंगडी ८) कबड्डी ९) खोखो

शिबिरात खालीलप्रमाणे सत्रे झाली -

**लहान गट**

१) श्री.अनिल गोडबोले - लता मंगेशकर
२) श्री. पोरे सर - कर्मवीर भाऊराव पाटील
३) सौ. बागेश्री पोंक्षे - अंधेर गुरूजी
४) सौ. अंजली देशपांडे - डॉ. बावसकर
५) सौ. संगिता भंडगे - सावित्रीबाई फुले
६) श्री. कवठेकर सर - स्वातंत्र्यवीर सावरकर

**मोठा गट :**

१) श्री. शरदराव कुंटे - दहशतवाद
२) श्री. आनंद लेले - स्वदेशी व आर्थिक समस्या
३) श्री. विवेक कुलकर्णी - शिक्षण समस्या
४) श्री. दादा पारखी - संरक्षण समस्या
५) कु. रोहिणी तेंडूलकर - धर्मांतर समस्या
६) सौ. सुचेता अडके - बेकारी समस्या
७) श्रध्दा मोरगावकर - कला सत्र 'अभिव्यक्ती'
८) श्री.समीर भाटे - कला सत्र अभिव्यक्ती
९) श्री. जयंत कवठेकर - श्रीमती कुसूमताई नारगोळकर व श्रीमती मालतीबाई बेडेकर यांची प्रेरक जीवनकार्ये

**विशेष उपक्रम :-** शिबिरात सुरवातीलाच सर्व शिबिरार्थींना तीन विषय देण्यात आले होते. किमान पाच मिनिटे या पैकी एका विषयावर प्रत्येकाने बोलले पाहिजे, असे सांगितले होते.

विषय :- १) आवडता शास्त्रज्ञ २) आवडता नेता ३) आवडता लेखक

यामुळे अनेक विद्यार्थिनींचे वाचन झाले. अभ्यास झाला, तसेच मोठ्या व लहान मुलींमध्ये धीटपणा आला.

आदर्श गट निवडला जाताना परीक्षक कोणाच्याही नकळत गुण देत असत. या शिबिरात ते गुण देण्याचे काम परीक्षकांनी तर केलेच; पण त्याच बरोबर ते काम गटप्रमुखांनीसुध्दा केले. रोज फलकावर गटप्रमुख एकत्र येऊन आपापल्या गटांचे परिक्षण करून गुण लिहीत. त्यामुळे त्यांच्यामधील प्रामाणिकपणाही सिध्द झाला.

शिबिराच्या समारोपाकरिता सौ. उर्मिला नातू, पर्यवेक्षिका, भारत इंग्लिश स्कूल, या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांनी सर्वांना सुंदर मार्गदर्शन केले. समारोपानंतर त्यांनी सर्व युवतींना एकत्रित करून जर्मनीच्या भेटीचा व तिथल्या शाळाभेटींचा उद्बोधक व रंजक वृत्तांत सांगितला.

**१ जानेवारी १९०० : नाशिकला सावरकरांनी मित्रमेळ्याची व १९०४ मध्ये 'अभिनव भारत'ची स्थापना केली.**

**'साहसी सफरी' शिबिर** - ३० ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर १९९९ या कालावधीत भगिनी निवेदिता, राजमाता जिजाऊ आणि आजोळ प्रकल्पातील वर्धिकांचे शिबिर संपन्न झाले. या शिबिरात सौ. सुधाताई गोखले, श्री. विजय ढमढेरे, सौ. वासंतीताई घैसास, डॉ. चंद्रशेखर देसाई, सौ. शोभाताई कर्वे, सौ. माधुरी सौंदलगीकर, श्री. प्र. के. घाणेकर, श्री. सुहासराव काणे, आणि कु. सुवर्णा साठे यांची प्रेरणादायी प्रवासवर्णन सत्रे झाली. प्रवासात येणाऱ्या अडचणी या अडचणी न राहता खूप काही शिकवून जाणारे अनुभव बनतात आणि त्यातून माणसे कशी घडतात, याचे विलक्षण प्रेरणादायी अनुभव या शिबिरामुळे सर्वांना आले.

---

## शाखा विभाग (मुले)

१) **ग्रामशिबिरे :-** 'स्व'रूपवर्धिनीची फिरती प्रयोगशाळा ही मुळशी खोऱ्यातील पाच गावांत व हवेली तालुक्यातील दोन गावांत गेली तीन वर्षे कार्यरत आहे. या शाळांतील विद्यार्थ्यांचे सुट्टीतील 'व्यक्तिमत्व विकास शिबिर' वर्धिनीतर्फे गेली दोन वर्षे त्या त्या गावात जाऊन घेतले जाते. व्यवस्था व सोयीच्या दृष्टीने यावर्षीपासून एका गावात सर्व गावांतील विद्यार्थ्यांना एकत्रित करून त्यांचे शिबिर घेण्याचे ठरले. तसेच स्वतःच्या गावपरिघाबाहेरील विश्व त्यांना अनुभवता यावे, हाही एक उद्देश होताच.

अ) उन्हाळी सुट्टीतील शिबिर शिवछत्रपती विद्यालय, पौड येथे झाले. अर्थात विषय होता 'शिवचरित्र'. माले, खेचरे, चाले, कोळवण, काशीग व आंबेगाव या गावांतील आठवी ते दहावीतील पंचाहत्तर विद्यार्थी विद्यार्थिनी या शिबिरात सहभागी झाले. हे वेगवेगळ्या गावांतील विद्यार्थी एकमेकांना प्रथमच पाहात होते. पण जिवाशिवाचं नात जुळायला कितीसा वेळ लागणार? महाराजांचे हे सर्व मावळे जणू स्वराज्याच्या मोहिमेसाठीच एकत्र आले होते!

अत्यंत प्रतिकूल परीस्थितीत बालशिवबाने सवंगडी कसे जोडले, स्वराज्याची स्थापना कशी झाली, चारही पातशाह्यांना महाराजांनी कसे नेस्तनाबूत केले. हिंदवी स्वराज्याचे सिंहासन कसे निर्माण झाले. हे विषय सर्वश्री मोहन शेटे, मंदार परळीकर, डॉ. प्रदीप आगाशे, दि. दा. जोशी, शिरीष पटवर्धन व ज्ञानेश पुरंदरे यांनी श्रोतवृंदासमोर आपल्या वक्तृत्व कौशल्याने साक्षात उभे केले. गटकार्याचा विषय होता आदर्श गावाची प्रतिकृती बनविणे. यात विद्यार्थ्यांनी अत्यंत कल्पकतेने सुनियोजित आदर्श गावाची प्रतिकृती मैदानातील माती, पाने, फुले, झाडांच्या फांद्या, विटा, पुस्तकांचे पुठ्ठे इत्यादींचा वापर करून उभी करून दाखविली. या रचनेत लांबरूंद, सरळ रस्ते, गोबरगॅस संयंत्रे, सूर्यचुली, पवनचक्की, सामुहिक शेती प्रकल्प, गांडूळ खत प्रकल्प, फळबागायत, पाणी अडवा पाणी जिरवा योजनेतील विविध प्रकल्प, जलशुध्दीकरण केंद्र, समाज मंदिर, पाठशाळा, मैदाने, व्यायामशाळा, सहकारी संस्था, कुटुंबकल्याण व आरोग्य केंद्रे हे सर्व दाखवले होते.

प्रसंगनाट्यस्पर्धेपूर्वी बरोबर वीज गेली. मग काय ढणढणत्या मशाली आणि विजेरीच्या प्रखर झोतांमध्ये सादर होणारी नाटके खरोखरीच सर्वांना शिवकालामध्ये घेऊन गेली.

योगायोगाने शिबिराच्या काळातच एक दिवस शिवजयंती होती. त्या निमित्ताने झांज, लेझीम, ढोल

**१९०६ ला बंगालमध्ये बारीन्द्रकुमार घोषांनी युगांतर समितीची व पुलिन बिहारीदास यांनी अनुशीलन समितीची स्थापना केली.**

ताशांच्या गजरात शिबिरार्थींनी शिवप्रतिमेची भव्य मिरवणूक पौड गावातून काढली. गावकऱ्यांनी सडा-रांगोळ्या काढून मिरवणुकीचे स्वागत केले. 'जयभवानी' 'जयशिवाजी' या घोषणांनी गाव दुमदुमले होते. वर्धिनीचे ध्वजदल गावकरी प्रथमच पाहात होते. आपल्याच गावातील मुले आणि मुलीसुध्दा झांज खेळताना, भगवा ध्वज नाचवताना पाहून त्यांना खूप अप्रूप वाटत होते. प्रमुख वक्ते श्री. मोहनराव शेटे यांनी शिवप्रतिमेला पुष्पहार घालून ग्रामसभेला संबोधित केले. शिवशाही ही लोकांच्या बळावर उभी राहिली होती. हे त्यांनी शिवचरित्रातील विविध प्रसंगातून दाखवून दिले. भारतीय लोकशाही जर बळकट करायची असेल, तर महाराजांच्या मावळ्यांप्रमाणे सर्वांनी कर्तव्यनिष्ठ रहायला पाहिजे असे आवाहन त्यांनी शेवटी केले. श्री. अजित नाईक यांनी शिबिरप्रमुख म्हणून काम पाहिले. शिबिर संपले तरी घरी जायला कोणाचे मन होत नव्हते.

दिपावली ग्रामशिबिर भुकूम येथील प्रबोध उद्योगच्या निसर्गरम्य संकुलात पार पडले. यामध्ये वर्धिनीच्या परिवारात समाविष्ट झालेल्या बावधन येथील मोहोळ विद्यालयाचे विद्यार्थी विद्यार्थिनीदेखील प्रथमच सहभागी होत होते. या संपूर्ण शिबिराचे संयोजन संचालन विवेकानंद शाखेच्या युवक विभागाने केले. शिबिरप्रमुख होते श्री. राजू येळवंडे. सर्वांना हे शिबिर आवडण्याचे मुख्य कारण याची निवासव्यवस्था राहुट्यांमधे होती. केवळ पाच मिनिटांच्या कालावधीत मोकळ्या जागेवर आपले सुंदर कापडी घर तयार होते आणि ऐन थंडीत स्वतःच्या हातांनी उभारलेल्या या राहुटीत रहायला काय मजा येते! याची अनुभूती शिबिरार्थींनी घेतली. शिबिरात आलेले मान्यवर व्याख्याते व त्यांचे विषय पुढीलप्रमाणे होते.

१) **'स्व'रूपवर्धिनीच्या कार्याचा परिचय व अमेरिका प्रवासातील अनुभव कथन** - श्री. ज्ञानेश पुरंदरे
२) **विद्यार्थ्यांपुढील आव्हाने** - श्री. रामभाऊ डिंबळे
३) **स्त्रीशक्ती- राष्ट्रशक्ती** - श्रीमती. पुष्पा नडे
४) **कष्टातून समृध्दीकडे** - श्री. विश्वास कचरे
५) **स्थानिक स्वराज्य संस्था** - श्री. यशवंत ठकार
६) **ग्रामीण वशहरी जीवन** - श्री. प्रदीप आगाशे
७) **ग्रामविकास योजना** - श्री. अरूण हुपरीकर

श्री. विश्वासराव कचरे यांचा जीवनपट व त्यांची मातीवरची माया सर्वांना खूप भावली. ते खास सोलापूरहून शिबिरासाठी आले होते. मुलाखतीच्या माध्यमातून त्यांचा सारा जीवनपट मुलांपुढे साकारला गेला व सर्वजण भारावून गेले. अत्यंत खडतर परिस्थितीत त्यांनी शेतीस प्रारंभ केला. रेताड, मुरमाड, दुष्काळी जमीन हे त्यांचे कार्यक्षेत्र. त्या मातीत त्यांनी अक्षरक्षः नंदनवन फुलवले आहे. शुन्यातून सुरवात करून आज त्यांच्याकडे सुमारे पावणेदोनशे एकर फळबागायत आहे. संपूर्ण जगभरातून त्यांच्या डाळिंबांना प्रचंड मागणी आहे. त्यांच्या निवासस्थानाचेही नाव 'कष्टाची भाकर' असे अत्यंत समर्पक आहे. त्यांच्या सुमारे दोन तास चाललेल्या मुलाखतीतून यशस्वी जीवन जगण्याची एक प्रखर प्रेरणा सर्वांना मिळाली. या शिबिराचा समारोप मा. श्री. कृ. ल. पटवर्धनसर यांच्या मार्गदर्शनाने झाला.

२) **उन्हाळी शिबिरे :**

(अ) मोठा गट (८वी ते १०वी)

स्थान :- ज्ञानदा प्रशाला **विषय :- क्षेत्र परिचय**

शिबिरप्रमुख :- मंदार रायरीकर

शिक्षण पूर्ण झाल्यानंतर भविष्यात ज्या विविध क्षेत्रात आपल्याला पराक्रम करावासा वाटतो त्या क्षेत्रांची सविस्तर माहिती जर विद्यार्थीदशेतच झाली,

**१८ ऑगस्ट १९०७ : मॅडम कामांनी पहिला भारतीय राष्ट्रध्वज जर्मनीत स्टुटगार्ट येथे आंतरराष्ट्रीय सोशॅलिस्ट काँग्रेसमध्ये फडकवला.**

तर वाटचाल अधिक अचूक होऊ शकेल. म्हणून शिबिराचा विषय होता 'क्षेत्र परिचय'

विविध क्षेत्रांमध्ये काम करून ज्यांचे अनुभवविश्व मोठे झाले आहे, अशा खाली नमूद केलेल्या नामवंत व्यक्तींनी या शिबिरात येऊन मार्गदर्शन केले.

१) **वैद्यकीय** .... डॉ. धनंजय केळकर
२) **संगणक** .... कु. आदिती भावे
३) **निसर्गोपचार** .... डॉ. परांजपे
४) **सहकार** .... श्री. मयुरेश सोवनी
५) **आयुर्वेद** .... वैद्य रा. ब. गोगटे
६) **बँकिंग** .... श्री. श्याम चव्हाण
७) **शेती** .... श्री. जी.डी. पाटील
८) **सेवा क्षेत्र** .... श्री. वसंत कानेटकर
९) **स्पर्धा परीक्षा** .... कु.छाया गायकवाड
१०) **क्रीडा** .... श्री. महेश जोशी


प्रत्येक व्याख्यानानंतर सुमारे अर्धा-पाऊण तास प्रश्नोत्तरे चालायची. विद्यार्थ्यांची या विषयातील जिज्ञासा पाहून सर्व वक्त्यांना समाधान वाटले. आत्तापासून या क्षेत्रांची माहिती घेऊन त्या क्षेत्रापुढील आव्हाने समजावून घेऊन त्यादृष्टीने अभ्यास करण्याची प्रेरणा या शिबिराद्वारे विद्यार्थ्यांना मिळाली.

## ज्ञानविज्ञान शिबिर

### (५वी ते ७वी, कालावधी २३/४ ते २७/४/९९)

बालवयात अनेक गोष्टींचे कुतूहल मनात असते. हे असे का? हा प्रश्न अनेक वेळा मनात रूजत असतो. या कुतूहलातून जिज्ञासा जागावी या हेतूने निसर्ग, विज्ञान यातील गमतीजमतीबरोबरच ज्या व्यक्तिमत्वांच्या जीवनावर योग्य परिणाम होतो, अशा श्रेष्ठ संतांच्या चरित्र-कथनाची सत्रे ज्ञानविज्ञान शिबिरामध्ये आखली होती. याच बालवयात छोटे छोटे छंद जडतात. या छंदाला नीट दिशा मिळावी म्हणून ज्यांनी काही आगळेवेगळे छंद जोपासले आहेत, अशांच्या अनुभव-कथनाच्या सत्रांनीही शिबिरार्थी विद्यार्थ्यांमध्ये उत्साह वाढविला. या शिबिरात झालेले विषय :-

**गट्टी गणिताशी** - श्री. मुरलीधर गोडसे
**देशोदेशीचे ध्वज** - श्री. श्रीकांत जोशी
**नाणी व स्टॅम्पस्** - श्री. कर्णिक
**सर्प -समज/गैरसमज** - श्री. राम भूतकर




**ओळख वनस्पतींची** - डॉ. वर्तक
**प्राण्यांच्या सवयी** - डॉ. देवरे
**विज्ञानातील गमती जमती** -डॉ. पुणतांबेकर

**संतचरित्रे**

**संत रामदास** - डॉ. ग. प्र. परांजपे

**११ एप्रिल १९०८ : खुदिराम बोस यांनी मुझफरपूरला बॉंबचा पहिला प्रकट स्फोट केला. ११ ऑगस्टला त्यांना फाशी.**

**संत एकनाथ** - सौ. परांजपे
**संत गाडगे महाराज** - श्री. बसर्गेकर

**व्यवस्थापन कौशल्य शिबिर**

वर्धिनीच्या शाखांचे संचालन युवक कार्यकर्ते करीत असतात. अशा कार्यकर्त्यांची रोज काम करताना कसरत होत असते. महाविद्यालयातील शिक्षण, अभ्यास किंवा नोकरी, वर्धिनीच्या शाखांचा दैनंदिन कार्यक्रम, सहली, शिबिरे, बैठका या सर्व गोष्टी करताना होणारी धावपळ पहाण्यासारखी असते. मग शाखांवर अनौपचारिक गप्पात नियोजनाचा सहज विषय निघतो. नियोजनाशिवाय कोणतेही काम करणे योग्य नाही हे पटते; पण हे नेमके कसे करायचे हे सुचत नाही. विविध व्यवस्थापनकौशल्यांची व्यक्तिगत व सामाजिक अशा दोन्ही क्षेत्रात गरज आहे. म्हणूनच यावर्षी ९ ते १२ जून ९९ या कालावधीत झालेलया युवक शिबिरामध्ये विविध व्यवस्थापन कौशल्ये हा महत्वाचा विषय होता. डॉ. जॉर्ज जुडा, कै. दादा पारखी व डॉ. श्रीकांत भोजकर यांची Time Management, Career Management , Life Management या विषयांवर मार्गदर्शन सत्रे झाली. या शिबिरात प्रेरणा सत्रेही झाली. ती पुढीलप्रमाणे :

**ज्ञानेश्वरी तुमच्यासाठी** - श्री. विवेक घळसासी
**व्यक्तीजीवना लगाम घालू** - श्री. मिलिंदराव ओक
**नव्या युगाची नवआव्हाने** - श्री. राम डिंबळे

निवासाला एकत्र जमल्यावर गप्पांचा फड रंगतोच. निवासी शिबिरातही रात्री ११-१२ शिवाय कोणी झोपतच नाही. म्हणून या शिबिरात रात्री ११ ते १२ या वेळात एका सत्राची रचना केली होती. या सत्रांमध्ये 'पालकप्रश्न ' समाधान, वर्धिनीच्या कार्याचा परिचय, नवे कार्यकर्ते जोडणे या विषयावर झालेल्या चर्चा रंगल्या व विषयसूत्राला पूरक असे अनेक मुद्दे सर्वांसमोर आले.

व्यवस्थापन कौशल्य याच विषयावर युवती कार्यकर्त्यांचेही शिबिर झाले. व्यवस्थापन कौशल्याच्या सत्रांव्यतिरिक्त काश्मीर समस्येसंबंधी कॅप्टन श्री. सनत भाटे यांचे सत्र झाले.

***वटवृक्षाचे पूजन असे करू या.***



वटपौर्णिमेच्या दिवशी वटवृक्षाची मनोभावे पूजा करणाऱ्या महिला सर्वत्र दिसतात. हा सण साजरा करताना अलीकडे त्यामध्ये एक वाईट प्रथा पडू लागली आहे. घरच्या घरी पूजा करता यावी म्हणून वटवृक्षाच्या फांद्या तोडून बाजारात विक्रीसाठी येतात. या तोडलेल्या फांद्यांची मग पूजा होते. सणामधला हा दोष जायला हवा. पर्यावरणाचे रक्षण ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे याची जाणीव आपल्या विद्यार्थ्यांच्या घराघरातून व समाजामध्ये निर्माण करण्याचा एक प्रयत्न म्हणून या सणांच्या निमित्ताने सणांच्या एक दोन दिवस आधी वर्धिनीच्या बालवाडी व बालचमूंची एक 'पर्यावरण फेरी' काढण्यात आली.

**२३ जुलै १९०८ : लो. टिळकांना मंडालेच्या तुरूंगात सहा वर्षांची शिक्षा.**

## युध्द व युध्दशास्त्र अभ्यास शिबिर


'रात्रंदिन आम्हा युध्दाचा प्रसंग' असे संत तुकोबारायांनी वेगळ्या संदर्भात जरी म्हटले असले, तरी आपल्या देशाची आत्ताची स्थिती पहाता अनेक आघाड्यांवर, विविध रूपात छुपे युध्द चालूच आहे असे जाणवते. या पार्श्वभूमीवरती ८वी ते १०वीच्या वयोगटातील वर्धकांचे हिवाळी शिबिर 'युध्द व युध्दशास्त्र' या विषयावर ३१.१०.९९ ते ५.११.९९ या कालावधीत संपन्न झाले. या शिबिरातील विषय व मार्गदर्शक खालीलप्रमाणे होते

१. **किल्ले आणि शिवराय** - श्री. मोहन शेटे
२. **युध्दनीती** - श्री. शिरीष पटवर्धन
३. **युध्दे का लढली जातात?** - श्री. प्रदीपराव आगाशे
४. **काश्मीर समस्या** - प्रा. शरद कुंटे
५. **पहिले व दुसरे महायुध्द** - श्री. रघुनाथ गंगाधर धडफळे
६. **संभाजी महाराज चरित्र** - श्री. ज्ञानेश पुरंदरे
७. **'स्व'संरक्षण नीती** - श्री. सुनील कुलकर्णी
८. **कारगिल व क्षेपणास्त्रे** - श्री. दादा पारखी
९. **प्रत्यक्ष युध्दातील अनुभव** - कर्नल हसबनीस

या सत्रांव्यतिरिक्त फार्म हाऊस, दूध डेअरीला भेट, तुळापूर येथील संभाजी महाराज स्मृती मंदिर भेट, अभिरूप न्यायालय, खजिनाशोध, पद्य, प्रसंगनाट्य स्पर्धा, अशी विविध सत्रे झाली. शिबिरामध्ये फुलगाव येथील शाळेतील विद्यार्थीही सहभागी झाले होते. शाळेचे मुख्याध्यापक श्री. मुल्ला सर, तसेच श्री. तात्यासाहेब कुलकर्णी, श्री. विवेक आठवले व गावाचे सरपंच श्री. नारायण खुळे यांचे शिबिर यशस्वी होण्यासाठी मोलाचे मार्गदर्शन झाले.

## कला - क्रीडा कौशल्य शिबिर

दि. १४ ते १८ नोव्हेंबर १९९९ या कालावधीत ५वी ते ७वी या वयोगटातील वर्धकांचे शिबिर संपन्न झाले. शिबिरार्थींची संख्या १५० होती. वक्तृत्व विकासाच्या दृष्टीने गोष्ट कशी सांगावी, याचे मार्गदर्शन करण्यासाठी श्री. मोहन शेटे व श्री. वंदन नगरकर हे आले होते. गोष्ट वा कथा सांगणाऱ्याचा पेहराव, श्रोत्यांच्या वयानुसार कथेतील शब्दरचना, प्रसंगावधान, आवाजातील चढउतार, कथा सांगणाऱ्यांची उभे रहाण्याची ढब, हातांच्या हालचाली, चेहऱ्यावरील हावभाव या विषयी मार्गदर्शन केले. प्रत्यक्ष शिबिरार्थी मुलांना सर्वांच्या पुढे उभे राहून कथा सांगायला लावल्या. आवश्यक तेथे सुधारणा करून घेतल्या. कथाकथन-कौशल्य-सत्रांचा सुयोग्य परिणाम शिबिर समारोप कार्यक्रमात आणि मनोरंजन सत्रात जाणवत होता.





वक्तृत्व-कौशल्याबरोबरच क्रीडाकौशल्याच्या विकासाचा प्रयत्न या शिबिरामध्ये करण्यात आला. आणि या निमित्ताने ॲथलेटिक्स प्रकारात प्रोत्साहन द्यावे असे काही गुणी विद्यार्थी नजरेत आले. ॲथलेटिक्स, गोळाफेक व भालाफेकीचे तंत्र, खोखो यातील मार्गदर्शनासाठी श्री. पंडित, श्री. जगदीश नानजकर तसेच श्री. अभय व सौ. माधवी मळेकर ह्यांचे सहाय्य लाभले. या शिबिरात अन्यही अनेक सत्रे झाली. यामध्ये विविध गुणदर्शन, अभिरूप न्यायालय, खजिना शोध, प्रेरणासत्रे या सत्रांचा समावेश होता. प्रेरणासत्रामध्ये श्री. श्रीधरपंत फडके, श्री. ज्ञानेश पुरंदरे यांचे मार्गदर्शन लाभले. समारोप सत्रासाठी, बालविकासासाठी गेली अनेक वर्षे सातत्याने काम करणाऱ्या सौ. शोभाताई भागवत उपस्थित होत्या.

**२० व २१ नोव्हेंबर १९०८ : कन्हैय्यालाल दत्त व सत्येंद्र बसू यांना अलीपूरच्या तुरूंगात फाशी.**

# प्रकल्पवृत्त

## फिरत्या चाकावरती ...

✍ कु. लता टिळेकर / सौ. छाया भगत



'स्व'-रूपवर्धिनी व विज्ञानभारती यांच्या संयुक्त प्रयत्नातून गेली चार वर्षे फिरती प्रयोगशाळा व ग्रामविकास प्रकल्प मुळशी व हवेली तालुक्यात राबविला जात आहे. फिरती प्रयोगशाळा व ग्रामविकासाचे काम प्रामुख्याने माले, खेचरे, कोळवण, काशीग, आंबेगाव व बावधन या गावातील शाळांमध्ये चालू असून साप्ताहिक दवाखाना खेचरे, काशीग व आंदेशी येथे चालू आहे. याव्यतिरिक्त दर रविवारची साप्ताहिक शाखा माले, आंदेशी व कोळवण येथे चालू आहे. संपूर्ण वर्षभरातील झालेल्या शैक्षणिक व ग्रामविकासाच्या संदर्भातील आकडेवारीच सांगायची झाली, तर ती थोडक्यात खालीलप्रमाणे देता येईल -

**शैक्षणिक तासिका** - ३०९
**प्रयोग तासिका** - १३३
**ग्रामस्थांबरोबर झालेल्या चर्चा** - ६ गावी १६ वेळा
**मुख्याध्यापकांशी झालेल्या चर्चा** - ६ गावी १५ वेळा
**शिक्षक मार्गदर्शन वर्ग** - ६ गावी २ वेळा
**विद्यार्थ्यांची निवासी शिबिरे** - ६ गावी २ वेळा
**इ.१०वी - विशेष मार्गदर्शन वर्ग** - एकूण ४
**गोळी खत प्रत्यक्ष उपयोगात आणणारी खेडी** - एकूण २
**आरोग्य तपासणी शिबिरे** - (विद्यार्थ्यांसाठी) २
**पशु आरोग्य मार्गदर्शन शिबिरे** - १

**शिबिरांव्यतिरिक्त वर्षभरातील विशेष कार्यक्रमः-**

**१) शिक्षक मार्गदर्शन वर्ग** - डिसेंबर ९८ व सप्टेंबर ९९ या महिन्यांमध्ये तीन तीन दिवसांचे शिक्षक मार्गदर्शन वर्ग घेण्यात आले. संपर्कातील खेड्यांमधील तसेच अन्य खेड्यांमध्ये विषेषतः ८वी ते १०वी च्या विद्यार्थ्यांना इंग्रजी, गणित व शास्त्र हे विषय शिकवणाऱ्या त्या त्या शिक्षकांसाठी विशेष मार्गदर्शन वर्ग घेण्यात आले. सप्टेंबर ९९ मध्ये झालेल्या शिबिरात पुणे शहरात नव्याने शिक्षक म्हणून नोकरीला लागलेल्या काही शिक्षकांनाही उपस्थित रहाण्याची परवानगी दिली होती. ९वी १०वी मधील काही प्रयोगांची मांडणी कशी करावी, तसेच सोप्या पध्दतीने मुलांना प्रयोग कसे समजावून सांगावे याचे प्रशिक्षण वर्गात देण्यात आले. शिबिरार्थी शिक्षकांना एस. पी. महाविद्यालयाच्या जीवशास्त्र प्रयोगशाळेत नेऊन या विषयाशी संबंधी काही प्रतिकृती व नमुने दाखवण्यात आले. गणित व शास्त्रासारख्या विषयात विविध प्रमेय, सूत्रे ही गाणी व ओव्यांच्या चालीवर कशी लक्षात ठेवता येतात व विद्यार्थ्यांचा सहभाग कसा उत्स्फूर्त मिळतो याविषयी मार्गदर्शन देण्यात आले. इंग्रजी विषयात प्रामुख्याने Letter writing, comprehension & Grammer या संदर्भात, तसेच शाब्दिक खेळांच्या माध्यमातून इंग्रजी विषयासंबंधीची

**८ जून १९०९ : बाबाराव सावरकर यांना जन्मठेप.**

रूची कशी वाढवता येते, यासंबंधी सप्रयोग मार्गदर्शन करण्यात आले. इंग्रजी प्रश्नपत्रिका लिहिताना होणाऱ्या चुका टाळण्यासाठी काय करावे, याचीही माहिती उपस्थित शिक्षकांना देण्यात आली.

**रोकडी प्रचिती** - शहरातील विद्यार्थ्यांसारखे टेस्ट सिरीज, संदर्भ पुस्तकांची सहज उपलब्धता, अभ्यासाबाबतही काळजी घेऊ शकतील असे सुशिक्षित पालक अशी कोणतीही उपलब्धता नसताना उपजत बुध्दिमान असलेली या दुर्गम भागातील मुलेही १० वी-च्या परीक्षेत उत्तम गुणांनी उत्तीर्ण होतात, असे अनुभव येत आहेत. सतत पाठीशी उभे असलेले शाळेतील शिक्षक, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, आणि शाबासकी देणारे कार्यकर्ते यांच्यामुळे माले या गावातील १०वी मधील विद्यार्थी शरद थोरवे हा १०वीच्या परीक्षेत ८७% गुण मिळवून उत्तीर्ण झाला. केवळ एकाचे गुण वाढले असे झाले नाही, तर संबंधित शाळांचे १०वीचे निकालही उत्तम लागत आहेत. माले येथील शाळेचा ७४% तर काशिग व खेचरे गावांचा अनुक्रमे ८४% व ७५% निकाल लागला.

२) **ग्रामसंपर्क** - महिला दिनाच्या निमित्ताने ८ मार्च रोजी चिखलगाव येथील साधना व्हिलेज या संस्थेच्या माध्यमातून महिलांशी बेअर फूट टेक्नॉलॉजी संदर्भात चर्चा करण्यात आली. तसेच १८ मार्च ९९ रोजी डॉ. देवरे यांचे पशुसंवर्धनासंबंधी अतिशय माहितीपूर्ण असे व्याख्यान झाले. उपस्थित महिलांनी अनेक प्रश्न विचारून या विषयातील आवश्यक अशी माहिती करून घेतली

३) **साप्ताहिक दवाखाना** - या वर्षाच्या सुरवातीला फक्त खेचरे या गावी साप्ताहिक दवाखाना सुरू होता. ऑक्टोबर ९९ पासून काशीग व आंदेशी या दोन गावी दवाखाना सुरू करण्यात आला आहे. ॲलोपॅथी औषधांबरोबरच होमिओपॅथी औषधांचाही उपयोग यासाठी केला जातो. डॉ. सुधीर डोंगरे तसेच डेक्कन जिमखाना लायन्स क्लब यांचे वतीने लागणाऱ्या औषधांसाठीची मदत पुरवण्यात आली. डॉ. मीनल नडे, डॉ. सौ. दड्डी, तसेच डॉ. सौ. कोठारे यांच्यासारख्या तज्ज्ञ डॉक्टर्स या केंद्रासाठी अत्यंत सेवाभावी वृत्तीने सहभागी झालेल्या आहेत. या साप्ताहिक दवाखान्याचा महिला रूग्णांना विशेष उपयोग होतो आहे.

४) **१०वी - १२ वी नंतर काय ?** - हा सार्वत्रिक प्रश्न आहे. नेमके मार्गदर्शन मिळाले नाही, तर अनेक अडचणी निर्माण होतात. ग्रामीण भागातील मुलांना तर अशा मार्गदर्शनाची निश्चितच आवश्यकता आहे. १०वी १२वी नंतर किती क्षेत्रात संधी आहे, विशेषतः शेतीशी पूरक असे कोणते अभ्यासक्रम आहेत, यासंदर्भात मार्गदर्शन करण्यासाठी एक वरीष्ठ शासकीय अधिकारी श्री. अरविंद देशपांडे यांच्या मार्गदर्शनाचा एक कार्यक्रम २८/८/९९ रोजी माले येथे झाली. चार गावातील सुमारे ८० विद्यार्थी या कार्यक्रमाला उपस्थित होते.

**भविष्यकाळातील सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ**

८वी च्या वर्गावर ताई तास घेत होत्या. सूक्ष्मजीवांच्यामुळे होणाऱ्या आजारासंबंधी तपशीलवार माहिती मुलांना त्यांनी सांगितली. एवढ्यात एक विद्यार्थी उभा राहिला आणि नम्रपणे म्हणाला "ताई, जर हवेत, पाण्यात, सगळीकडेच सूक्ष्मजीव असतील तर शाळेशेजारच्या सांडपाण्यातील सूक्ष्मजीव आम्हाला बघायला मिळतील का?" "का नाही?" असे ताईंनी म्हणायचा अवकाश वर्गातील दोन विद्यार्थी धावले आणि सांडपाण्यातील थोडे पाणी वर्गात घेऊन आले. सूक्ष्मदर्शी यंत्राखाली त्या पाण्यातील सूक्ष्मजीव पहाण्यात सर्वजण रंगून गेले. त्यांच्या इवल्याशा डोळयांमध्ये 'उद्याचे सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ' जणू दिसत होते.

**१ जुलै १९०९ : मदनलाल धिंग्रा यांनी कर्झन वायलीला लंडनच्या जहांगीर हॉलमध्ये ठार केले.**
**धिंग्रा यांना १६ ऑगस्ट १९०९ ला फाशी.**

## संगणक विभाग

'संगणक साक्षरता' हा या काळातील परवलीचा शब्द बनला आहे. या माध्यमातून मोठया प्रमाणावर साक्षरतेचा प्रसार कसा करता येईल, याचा विचार या विषयातील तज्ज्ञ करीत आहेत. मॉरीस मेमोरियल ट्रस्टने शाळा व महाविद्यालयांना संगणक भेट द्यायचे ठरवून जवळजवळ ३०० संगणक अनेक शाळा महाविद्यालयातून देणगी स्वरूपात दिले आहेत. याच न्यासाने या वर्षी सहा संगणक वर्धिनीला देणगी स्वरूपात दिले. याचा तसेच के. व्ही. डेव्हलपमेंट यांनी देणगी स्वरूपात दिलेल्या डी.टी.पी. युनिटचा उपयोग करून छोट्या छोट्या कालावधीचे अभ्यासवर्ग सुरू करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांच्या संगणक प्रशिक्षणाचा उद्देशही डोळयासमोर आहे. या संगणक विभागाचा शुभारंभ रविवार दि. १०/१०/९९ रोजी झाला. मॉरीस मेमोरियल न्यासाचे एक विश्वस्त श्री. एस. आर. भट यासाठी मुद्दाम उपस्थित होते. त्याचबरोबर दोन छोट्या अभ्यासक्रम वर्गांनी या विभागाची सुरूवात झाली असून हळूहळू या विभागाचा पूर्ण वेळ उपयोग करण्याच्या दिशेने विचार सुरू झाला आहे. या संगणक विभागासाठी जे विद्युतीकरणाचे काम करावे लागले, ते जिनियस मार्केटिंग सिस्टिमचे श्री. घारपुरे यांनी विनामूल्य करून कार्यकर्त्यांचा उत्साह अधिकच वाढविला.

### ताई तुम्हीपण स्वेटर घाला ना !

थंडीच्या दिवसात मुलांना त्रास होऊ नये म्हणून मी माझ्या गटातील सर्वांना स्वेटर व कानटोपी घालून येण्याचा आग्रह धरते. एक दिवस माझ्या गटातील अभिजित व प्रियांका मला म्हणाले, "ताई सर्दी होऊ नये म्हणून तुम्ही आम्हाला स्वेटर व कानटोपी घालायला सांगता मग तुम्ही का नाही घालत? अशाने तुम्हाला सर्दीचा त्रास होईल ना !" मुलांच्या हट्टासाठी मलाही स्वेटर घालणे आवश्यक झाले.

*With Best Compliments From :*

**ADEPT RECORDING INSTRUMENTS (P) LTD,**

Plot No. 4, S. No. 17/ 1 – B, Kothrud Industrial Estate,

Kothrud, Pune - 411 029. ☎ 5431124, 5440480, 5464551

**२१ डिसेंबर १९०९ : नाशिकच्या विजयानंद थिएटरमध्ये अनंतराव कान्हेरे यांनी कलेक्टर जॅक्सनला ठार मारले. १९ एप्रिल १९१० ला कान्हेरे, कर्वे, देशपांडे यांना ठाण्याच्या तुरूंगात फाशी.**

# पाकोळी बालवाडी

रोजच्या आनंददायी अशा शिक्षण उपक्रमाबरोबरच या वर्षभरात अनेक उपक्रम बालवाडी विभागाने साजरे केले. त्याचा हा वृत्तांत-

१) **वटपौर्णिमा** - 'वृक्षतोड थांबवा, रोपे वाढवा' 'वनराई - देशाची संपत्ती' असे विविध घोषणाफलक हातात धरून बालवाडीतील पाकोळ्यांची प्रबोधन फेरी निघाली. रस्त्यातून येणारे-जाणार कुतूहलाने या उपक्रमाकडे पहात होते, थांबून माहिती घेत होते. या प्रबोधन फेरीचा समारोप एका मोठ्या वटवृक्षाच्या सावलीतच झाला. पुष्पाताईंनी गोष्टीतून झाडाचे महत्व मुलांना सांगितले. अनेक मुलांनी आपल्या आईजवळ प्रत्यक्ष वटवृक्षाची पूजा करण्याचा हट्ट धरला.

२) **आषाढी एकादशी** - विठ्ठल, रखुमाई, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम अशांचा पेहराव करून बालकांची एक दिंडी रस्त्यावरून वाजत गाजत नेली. विठोबा-रखुमाईच्या नामघोषाबरोबरच ज्ञानेश्वर माऊलींचा जयजयकार दुमदुमत होता. दिंडीचा समारोप परिसरातील एका विठ्ठलमंदिरात झाला. या समारोपाच्या वेळी बालवाडीमधील एका बालाने छोटेसे कीर्तन केले. या छोट्या कीर्तनकार बुवांचा हार घालून मंदिराच्या पूजाऱ्यांनी सन्मान केला. ही दिंडी पहाणाऱ्या काहींनी म्हटले की, आज देवळात दर्शनाला गेलो नाही; पण प्रत्यक्ष पांडुरंगाचेच दर्शन या दिंडीमुळे आम्हाला घडले.!

३) **गुरूपौर्णिमा** - बालवाडीच्या मोठ्या गटातील मुलांनी पौराणिक कथा-योग्य असे कपडे परिधान करून-सादर केल्या. बालवाडी विभागाच्या प्रमुख श्रीमती पुष्पाताई नडे यांनी छोट्या छोट्या गोष्टीतून गुरूचे महत्व मुलांना समजावून सांगितले, सर्व मुलांनी मग आपल्या ताईंना वाकून नमस्कार केला.

४) **नागपंचमी** - वारूळाच्या व नागोबाच्या प्रतिकृतिसमोर सर्वजण फेर धरून नाचले. मग सगळ्यांनी नागोबाची पूजा केली.

५) **लो. टिळक पुण्यतिथी** - सौ. अर्चनाताई नायडू यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकमान्यांना आदरांजली वाहण्याचा कार्यक्रम झाला. सौ. अर्चनाताईंनी लोकमान्यांच्या बालपणातील काही गोष्टी मुलांना सांगितल्या.

६) **स्वातंत्र्यदिन** - झेंडावंदनाबरोबरच बालवाडीमधील कुमार सरोज याने केलेले छोटेसे भाषण हे या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य होते.

७) **जन्माष्टमी व गोपाळकाला** - पाळण्याचे सुशोभन करण्यात आले होते. सर्व गोपगोपी नटून आले होते. खोडकर बाळकृष्णाच्या गोष्टींनी मुलांचे मनोरंजन झाले. नंतर दहीहंडी फोडण्याच्या कार्यक्रमातील सर्वांचा उत्साह पहाण्यासारखा होता.



८) **नारळी पौर्णिमा** - कोळ्यांच्या जीवनातील एका छोट्या प्रसंगाचे सादरीकरण मुलांसमोर करण्यात आले. तस्लीमताई, वर्षाताई व मनिषाताई यांनी यासाठी विशेष मेहनत घेतली. नंतर एका गटाने कोळीनृत्य सादर केले. राखी बांधण्याचा कार्यक्रम नंतर सर्व गटांमध्ये करण्यात आला.

९) **नवरात्र** - बालवाडीच्या तीनही गटाचे वेगवेगळे भोंडले झाले. मोठ्या गटातील मुलामुलींनी जोगवा सादर केला. त्यातील सरोज व प्रियांका यांचा अभिनय दाद देण्यासारखा होता.

१०) **दिवाळी** - पहिल्यांदा दिवाळीतील प्रत्येक दिवसाचे महत्व मुलांना सांगितले गेले. नंतर प्रत्येक शिक्षिकेने आपापल्या गटांना वर्गात नेऊन तेथे किल्ल्यांची छान प्रतिकृती बनवली. रांगोळ्या काढल्या, इमारतीचे, वर्गांचे सुशोभन केले, भरपूर फटाके उडविले. प्रत्येक मुलाला दिवाळीनिमित्त एक भेटकार्ड व आकाशकंदील भेट देण्यात आला.

**१२ फेब्रुवारी १९१० : माणिकताला खटल्यात बारीन्द्र घोष, उल्हासकर दत्त, उपेंद्र यांना जन्मठेप. योगी अरविंद घोष यांची मुक्तता.**

# महिला विभाग उपक्रम वृत्त

## रूग्ण परिचर्या अभ्यासक्रम (होम नर्सिंग)

'स्व'-रूपवर्धिनीमध्ये 'रूग्ण परिचर्या अभ्यासक्रम' (होम नर्सिंग) गेली काही वर्षे चालू आहे. यावर्षी चौदा मुलींनी या अभ्यासक्रमात प्रवेश घेतला. प्रथमोपचार, मानसशास्त्र, आहारशास्त्र, शरीरविज्ञान, बालरूग्ण परिचर्या, वैद्यकीय परिचर्या, प्रसूतीशास्त्र, कुटुंबनियोजन व कुटुंबकल्याण हे विषय या वर्गात शिकविले जातात. या विषयांच्या अभ्यासानंतर सप्टेंबर महिन्यापासून प्रात्याक्षिके सुरू झाली. पोषक आहारासंबंधीचे प्रात्याक्षिक संस्थेच्या इमारतीत, तर रूग्णसेवाकला (नर्सिंग आर्ट) व प्रसुतीशास्त्र यांची प्रात्याक्षिके के.ई.एम् हॉस्पिटलमध्ये देण्यात आली. आले. विद्यार्थिनींच्या एकूण कामाचे तेथील ज्येष्ठ सिस्टर्सनी कौतुक केले. या वर्गाला हे निश्चितपणे भूषणावह आहे.

* * *

## प्रौढ साक्षरता वर्ग

गेली काही वर्षे महिलांसाठी प्रौढ साक्षरता वर्ग वर्धिनीत चालू आहे. आतापर्यंत या वर्गात तीस ते चाळीस महिला शिकून साक्षर झाल्या आहेत. हा वर्ग दुपारी एक ते चारपर्यंत 'स्व'-रूपवर्धिनीत चालतो. या वर्षी या वर्गामध्ये सुमारे तीस पस्तीस महिला येत आहेत. त्यांना चांगले लिहिता-वाचता येऊ लागले आहे. त्या गोष्टींची पुस्तके, हिशेब, वर्तमानपत्र चांगले वाचू लागल्या आहेत. जोडाक्षरे चांगली वाचतात. एक ते शंभर अंक लिहितात. त्या आता वर्गात खूप रमल्या आहेत. तसेच प्रमिला, संगीता, दीपाली, रेश्मा, अन्वरबी अशा अनेक महिलांची प्रगती खूप छान आहे. त्यांची खूप शिकण्याची इच्छा आहे. तसेच काही महिलांनी शिवणक्लासमध्येही नाव घातले आहे. वर्धिनीमध्ये काही कार्यक्रम असल्यास त्यात त्या उत्साहाने भाग घेतात. तसेच पाचवी ते सातवीच्या उर्दू भाषिक मुलींनाही मराठी विषयामध्ये चांगले गुण मिळाले आहेत.

*With Best Compliments From :*

**GURUPRASAD TRANSPORT**

156 Mangalwar Peth, Parage Chowk,
Barane Road, Pune - 411 011. Phone - 627260


- **All types of Transport Service**
- **All over Maharashtra**

**१२ मार्च १९०८ : चिदंबरम् पिल्ले यांचे मद्रास प्रांतात तिनीवल्ली येथे बंड.**
**१७ जून १९११ ला अय्यर यांनी तिथल्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटला ठार मारले.**

## शिवणकला वर्ग

✍ सौ. गुरव

'स्व'-रूपवर्धिनीचा शिवणवर्ग हा स्त्रियांना स्वावलंबी बनवण्याकरिता सुरू झालेला आहे. वर्गात सतत मुलींना, स्त्रियांना सांगितले जाते की, समाजात जर तुम्हाला मान हवा असेल, तर काही ना काही कला तुमच्या हातात असली पाहिजे. मनापासून जर शिकलात, तर तुमच्या हाताला वळण लागेल व शिवणकलेतील बारकावे तुम्हाला समजतील.



वर्धिनीत होणाऱ्या प्रत्येक कार्यक्रमात मुली, स्त्रिया घरातून वेळ काढून येतात. कार्यक्रमात रस घेतात. या मुलींना एरवी घराबाहेर पडायला कधीही वेळ नसतो. परंतु वर्धिनीत कार्यक्रम आहे असे समजल्यावर मात्र स्वतः सर्वजणी उपस्थित राहून काय्रक्रमाचा आनंद लुटतात.

शिवण वर्ग १९९१ पासून सुरू झाला. सहा महिन्यांपर्यंत त्याची मुदत ठेवलेली आहे. परंतु त्यानंतरही सरावासाठी दोन ते तीन महिन्यांपर्यंत मुली येत राहतात. या वर्षी वर्षभरात एकूण ७० ते ८० मुली शिकून गेल्या.

शिवणवर्गात सध्या पंचवीस मुली व स्त्रिया आहेत. एका मुलीच्या घरी इस्त्रीचे दुकान आहे. ती शिवण शिकल्यामुळे इस्त्रीचे काम संपले की कपडे शिवते.

## फॅशन डिझाइन अभ्यासक्रम

✍ सौ. दर्शना त्रिगुणाईत

मी एका खेड्यातून सर्वसाधारण कुटुंबातून आलेली एक युवती. शिवणकामाची फारशी माहिती नसलेली. योगायोगाने माझा 'स्व'-रूपवर्धिनीशी संबंध आला. मी वर्धिनीत सहा महिन्यांचा शिवणाचा अभ्यासक्रम पूर्ण केला. मग फॅशन डिझायनिंगचा कोर्स केला. नंतर मला असे वाटू लागले की आपल्या या ज्ञानाचा, आपल्याला जिथे मार्गदर्शन लाभले, त्याच संस्थेत का उपयोग करू नये? मी लगेचच वर्धिनीत फॅशन डिझाईन कोर्स शिकविण्यास सुरूवात केली. बाहेर मला हा अभ्यासक्रम शिकविण्यासाठी खूप पैसे मिळत होते. परंतु मला यासंबंधी स्वरूपवर्धिनीच्या कार्यकर्त्यांशी बोलले. ह्यांच्या परवनागीने त्या पैशांपेक्षा वर्धिनीचे महत्त्व मला जास्त वाटते.

आतापर्यंत दोनशे ते अडीचशे मुलींनी 'स्व'रूपवर्धिनी मधून शिवणकला शिकून घेतली आहे. ज्या मुली शिवणकाम शिकून गेल्या आहेत, त्या आज दरमहा दोन हजार ते अडीच हजार कमवत आहेत. कित्येक मुली बाहेरचे कपडे शिवून संपूर्ण कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात.

ज्याठिकाणी आपला पाया मजबूत झाला, त्या संस्थेला विसरणे कसे शक्य आहे? माझ्या आयुष्यात वर्धिनी म्हणजे जणूकाही माझा आणि माझ्यासारख्या अनेकींचा आधारस्तंभच आहे.

✤ ✤ ✤

**१९११ : स्वा. सावरकरांना अटक. मार्सेलिस बंदराजवळ त्यांनी भर समुद्रात त्रिखंडात गाजलेली उडी घेतली. २२ मार्च १९११ ला त्यांना दोन जन्मठेपांची शिक्षा.**




'स्व'-रूपवर्धिनीत महिलांसाठी चालणाऱ्या अनेक प्रकल्पांपैकी बालवाडी शिक्षिका प्रशिक्षण वर्ग हा एक प्रकल्प आहे.

गेल्या वर्षीच्या १५ विद्यार्थिनींपैकी सुमारे १२ विद्यार्थिनींना काम मिळाले आहे. तेही मान्यवर शाळांमध्ये ! त्यांच्या पंखात बळ येण्यासाठी, त्यांनी आकाशात उंच भरारी मारण्यासाठी वर्धिनीने केलेले प्रयत्न निश्चितच सार्थकी लागले आहेत.

यंदाही १७ विद्यार्थिनींचा हा वर्ग दिमाखात सुरू झाला. आजच्या शिक्षण पध्दतीने नाकारलेल्या या महिला निष्पाप बालकांच्या सान्निध्यात लगेच रमून गेल्या आहेत व समरसून हा अभ्यासक्रम पूर्ण करीत आहेत. त्यांना तज्ज्ञ अनुभवी शिक्षकांचे मार्गदर्शन मिळते आहे. एका वर्षाच्या कालावधीत प्रशिक्षणार्थी शिक्षिका ही खेळ, कला, हस्तव्यवसाय, जीवनव्यवहार, तसेच इतरही अनेक विषयात निष्णात व्हावी, यासाठी आमची धडपड चालू आहे.

बालशिक्षण परिषदेचा अभ्यासक्रम आम्ही निवडला आहे. या प्रशिक्षणार्थींना बालवाडीच्या वर्गातून रोज प्रत्यक्ष मिळणाऱ्या मार्गदर्शनाला अनेक संस्कारक्षम कार्यक्रमांची जोड दिलेली आहे. उदा. समाजशिक्षण या विषयाच्या माध्यमातून या महिलांना अनेक सामाजिक संस्थांना भेटी देण्यासाठी नेले जाते. श्रीमती सिंधुताई सपकाळ यांचे 'ममता बालसदन केंद्र', महर्षी कर्वे यांची 'स्त्री शिक्षण संस्था', वानवडीची 'अपंग कल्याणकारी संस्था' इत्यादी सामाजिक संस्था भेटीतून त्यांना सामाजिक जाणीव करून दिली जाते. याशिवाय गुरूपौर्णिमा, रक्षाबंधन, लो. टिळक पुण्यतिथी, पालखी, १५ ऑगस्ट, नागपंचमी, दहीहंडी, शारदोत्सव, भोंडला इत्यादी विविध कार्यक्रमांच्या व उत्सवांच्या माध्यमातून या महिलांना संस्कारक्षम बनविण्याचा प्रयत्न असतो.

तसेच वेगवेगळ्या प्रासंगिक घटनांसंबंधी (उदा. कारगील, पावसाच्या कविता) कात्रणे कापून प्रकल्प तयार करायला सांगितले जाते. प्रतिसाद अतिशय छान मिळतो. तसेच या प्रशिक्षणार्थी विद्यार्थिनी अतिशय सुंदर शैक्षणिक साधनेही तयार करायला शिकल्या आहेत. त्या साधनांचे प्रदर्शनही मांडले जाते. त्यांनी तयार केलेल्या शैक्षणिक साधनांचा वापर त्या सराव पाठासाठीही करतात.

**आम्हाला प्रयोग कधी दाखवणार?**

एका गावी तेथील शाळेमधे नेहमीसारखे ८वी ते १०वीच्या विद्यार्थ्यांना प्रयोग दाखवून कार्येकर्ते गाडीत येऊन बसले. इतक्यात त्या शाळेतील ५वी व ६वीचे विद्यार्थी गाडीत शिरले आणि म्हणाले, "ताई, ७वीच्या वरच्या सगळ्यांना तुम्ही प्रयोग नेहमी दाखवता? मग आम्हाला प्रयोग कधी दाखवणार?" त्यांच्या त्या निरागस चेहऱ्यांकडे पाहिल्यावर त्यांचा हिरमोड करणे अवघडच होते. मग गाडीतच मुलांना विज्ञान सुत्रे सांगणारे काही गमतीचे प्रयोग करून दाखविले. हे प्रयोग पाहिल्यावर आनंदाने घोषणा देत मुलांनी वातावरण दणाणून सोडले.

**२३ डिसेंबर १९१२ : लॉर्ड हार्डिंग्ज यांच्या मिरवणुकीवर दिल्लीत बॉंब.**
**५ ऑक्टोबर १९१४ ला यासाठी मा. अमीरचंद, अवधबिहारी, भाई बालमुकुंद व वसंतकुमार विश्वास यांना फाशी.**



# सार्वजनिक गणेशोत्सव आणि सामाजिक बांधिलकी

वर्धिनीच्या प्रत्येक कार्यक्रमाचे शाखाशः विकेंद्रीकरण केल्याप्रमाणे या वर्षीच्या गणेशोत्सवाची संपूर्ण जबाबदारी ही समर्थ रामकृष्ण शाखेकडे होती आणि त्यांनी ती छानप्रकारे पार पडली.

या वर्षीदेखील वर्धिनीचा गणेशोत्सवातील सहभाग हा खूप उत्साहवर्धक होता. नेहमीप्रमाणे याही वर्षी वर्धिनीची पथके ही आकर्षक, चित्तथरारक, ढोल-ताशे-झांजा यांच्या ठेक्यावर तालबध्द पदविन्यास करीत, सर्वांची मनं लक्ष वेधून घेणारी होती. प्रत्येक शाखेच्या पथकांचे प्रकारही खूप आकर्षक होते.


यावर्षी वर्धिनीची एकूण बारा पथके उत्सवात सहभागी होती.

यावर्षी गणेश चतुर्थीला कल्याण येथे त्याचप्रमाणे सातव्या दिवशी लोणावळा येथे वर्धिनीची पथके जाऊन आली. यावर्षी पहिल्यांदाच युवतीगटाचे ध्वजदलाचे पथक हे पेणमध्ये देवआळी या ठिकाणी खेळण्यासाठी गेले होते.

गणेश चतुर्थी व अनंत चतुर्दशीला ३२ ढोल व २३ ताशे यांसह वर्धिनीचा अकरा ठिकाणी मिरवणुकीत सहभाग होता.

हे सर्व तर दरवर्षीप्रमाणेच झाले; परंतु यावर्षी गणेशोत्सवाच्या माध्यमातून सामाजिक बांधिलकीची भावना कृतीशील करण्याचा एक प्रयत्न वर्धिनीने केला.

सर्व शाखांच्या पथकांचा खेळ हा उत्कृष्ट व्हावा व तो तसा करण्यासाठी चुरस वाढावी म्हणून दरवर्षी शाखांतर्गत स्पर्धा विसर्जन मिरवणुकीपूर्वी आपण घेतो. यावर्षीची स्पर्धाही चुरशीची झाली. यावर्षीच्या या स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे जी गणेशमंडळे मिरवणुकीच्या निमित्ताने वर्धिनीच्या संपर्कात आली होती. अशा सर्व मंडळांच्या प्रमुख कार्यकर्त्यांना ही स्पर्धा बघण्यासाठी खास आमंत्रित केले होते. या सर्वांबरोबर अनौपचारिक गप्पाही झाल्या व त्यांना आवाहन करणारे एक पत्रही यावेळी देण्यात आले. ते पत्र खालीलप्रमाणे होते-



**आपण हे सहज करू शकता !**

या उत्सवाच्या काळात आणि या निमित्ताने देशाची स्थिती व समाजाची आवश्यकता लक्षात घेऊन आपल्यासारखे सामाजिक भान असलेले मंडळ खालील गोष्टी सहज करू शकेल. आपला सकारात्मक प्रतिसाद मिळेल, याबद्दल पूर्ण विश्वास आहे.

१) उत्सवाच्या काळात व मिरवणुकीत श्रींच्या मूर्तीसमोर हिडीस गाणी व नाच टाळावा. त्याऐवजी भक्तिप्रधान वा पराक्रम जागवणारी गाणी लावावीत.

२) आवाजाचा त्रास होणार नाही एवढ्याच मोठयाने गाणी लावावीत,

**१० मे १९१३ : गदर पक्षाची स्थापना. १९ फेब्रुवारी १९१५ ला स्वातंत्र्य प्रयत्न फसला.**
**१५ नोव्हेंबर, १९१६ ला कर्तारसिंह, विष्णु गणेश पिंगळे इ. सात जणांना फाशी व भाई परमानंद आदींना जन्मठेप.**

३) उत्सवाच्या काळात व्यसनमुक्तीला प्रोत्साहन द्यावे. असा जाहीर निश्चय करणाऱ्यांना आरती करण्याचा मान द्यावा,
४) विचार करायला प्रवृत्त करतील असे सुविचार मंडळाच्या आसपास प्रदर्शित करावेत,
५) वर्गणीमधून जसे मनोरंजनाचे कार्यक्रम होतात, तसेच बेकारीची समस्या लक्षात घेऊन व्यवसाय-मार्गदर्शन व व्यवसाय प्रशिक्षण वर्गाचे मंडळामार्फत आयोजन,
६) दारिद्र्यरेषेखाली जीवन जगणाऱ्या किमान एका कुटुंबाला छोटा उद्योग सुरू करण्यास आर्थिक प्रोत्साहन,
७) आपल्या भागातील कर्तृत्ववान व्यक्तींच्या सन्मानाचा व त्यांच्या मुलाखतीचा मार्गदर्शनाचा कार्यक्रम,
८) आपल्या भागातील एखादी नागरी योजना दत्तक घेऊन साकार करणे,
९) भागातील सर्व घरातील निर्माल्य एकत्रित करून खतप्रकल्पात देणे. असे केल्याने नदीतील पाण्याचे प्रदुषण टळेल,
१०) सामाजिक ऐक्याने दर्शन घडवणाऱ्या कार्यक्रमांचे आयोजन,

आपल्या प्रतिसादाच्या प्रतिक्षेत ...

पत्राचा मजकूर वाचल्यावर अनेकांच्या प्रतिक्रिया उत्साह वाढविणाऱ्या होत्या. या प्रतिसादामुळे असेच एकेक पाऊल पुढे टाकीत हा उत्सव आणखी सामाजिक करण्याचा संकल्प नकळतच कार्यकर्त्यांच्या मनामधे पक्का झाला.

**मिरवणुकीत सामील होऊ ; पण ओंगळ नाचणे सहन करणार नाही !**

गेली १५ वर्षाहून अधिक काळ सार्वजनिक गणेशोत्सवाच्या मिरवणुकीत वर्धिनीची पथके सहभागी होतात. ज्या मंडळांच्या मिरवणुकीत वर्धिनीची पथके सामील होतात, त्या मंडळांना वर्धिनीच्या ज्या अटी मान्य कराव्या लागतात, त्यात प्रामुख्याने मिरवणुकीचा दर्जा चांगला रहावा, मांगल्याचे वातावरण निर्माण व्हावे हा हेतू डोळ्यासमोर ठेऊन नक्की केलेल्या आहेत. नशापाणी करून कोणी नाचणार नाही, ओंगळ नाच मिरवणुकीत होणार नाहीत, अशा अटी यामध्ये आहेत. या वर्षी एका मंडळाच्या मिरवणुकीत वर्धिनीच्या पथकांचा बहारदार खेळ चालू होता. मिरवणूक संपण्याच्या टप्प्याजवळ आली होती. आणि त्याच वेळेला ह्या मंडळाच्या तरूण 'कार्यकर्त्या' मंडळींना रस्त्यावर ओंगळनृत्य करण्याची लहर आली. ऐकूसुध्दा नये अशा गाण्यांवर बीभत्स नाचणे सुरू झाले. हे दिसताच अत्यंत शिस्तीत, जोशपूर्ण खेळ करणारी वर्धिनीची पथके बाहेर थांबली. पथक प्रमुखाने आज्ञा दिल्याबरोबर मिरवणुकीतून ही पथके बाहेर पडली. मंडळांचे काही कार्यकर्ते अवाक झाले. मंडळाच्या अध्यक्षांनी पथकप्रमुखाला खेळ पुन्हा चालू करण्याची विनंती केली. पथक प्रमुखाने ठामपणे सांगितले, 'वर्धिनीच्या अटींची तुम्हाला कल्पना आहे. त्यामागचा हेतूही माहिती आहे. असे ओंगळ नाचणे जिथे असेल, तेथे आम्ही एक क्षणही खेळणार नाही. नियम फक्त कागदावर लिहीण्यासाठी घातले नाहीत. आमची पथके आता यानंतर सहभागी होणार नाहीत.' 'कार्येकर्ते' मान खाली घालून निघून गेले.

**१७ मार्च १९१७ : लाहोर कटाच्या दुसऱ्या खटल्यात बलवंतसिंह, डॉ. मथुरासिंह आदी नऊ जणांना फाशी व बेचाळीसजणांना जन्मठेप.**

## इतिहास घडवणारी मिरवणूक

दुपारी पावणे दोन वाजता पेणमधे गाड्या पोचल्या. दोन अडीच तास उशीरा पोचलो. सुग्रास अन्न ऐंशीजणांची वाट पहात होते. उत्तम जेवण. उत्तम निवास. रहात्या घरातल्या खोल्या रिकाम्या करून दिलेल्या. युवतींकरता आणि युवकांकरिता स्वतंत्र व्यवस्था. जणू शिबिरच. एक दिवसाचं. पेणमधल्या देवआळीकरांच्या आतिथ्यशीलतेनं चिंब भिजलेलं.

जेवणं उरकली. लगेचच सर्वांनी वर्धिनीचा गणवेश चढवला. श्रीगणरायाचं दर्शन घेऊन उत्सवाच्या लोकमान्य टिळकमंडपात ॐकार उपासना आणि प्रार्थना झाली. युवतींचं ध्वजदल, बालांचे झांजपथक आणि युवकांचे वादनपथक कंबरेला शेले कसून सिध्द झालं.आजूबाजूला गच्च दाटलेली गर्दी. मिरवणुकीला प्रारंभ झाला. प्रथम पालख्या निघाल्या. थाटामाटात. त्यामागे रथ. नंतर वर्धिनीचं पथक. ठेवणीतल्या साड्या, अलंकार, आभूषणे यांनी सजलेल्या देव ओळीतल्या महिला. त्यामागे श्रीगणरायांची मूर्ती.

युवतीचं ध्वजपथक आणि कुमारांचं झांजपथक वादनपथकाच्या तालावर आपापल्या पथकाच्या विविध रचना सादर करीत होते. चौकाचौकातून रचना प्रकार बदलत होते. त्या नादधुंद वातावरणात मग उत्सव-मिरवणूक केवळ एका देवआळीची राहीलीच नाही; साऱ्या पेण गावाचीच झाली. महिला पोलिसांचं युवती पथकाला उत्स्फूर्त सहाय्य होतं. वाटेत नागरिकांकडून साऱ्या मिरवणुकीला कोकम सरबताचा उत्स्फूर्त आग्रह होता. मिठाई दुकानदारांनी पेढ्यांची ताटं उत्स्फूर्तपणे रिती केली होती. विशेष म्हणजे वर्धिनीनं गुलालाचा वापर होऊ नये, असा आग्रह धरल्यावर संपूर्ण मिरवणूकभर पाच तासपर्यंत गुलालाऐवजी गुलाबाच्या पाकळ्यांचा अखंड वर्षाव चालला होता.

अनंतचतुर्दशींच्या दुसऱ्या दिवशी आयोजित केलेल्या या मिरवणुकीनं 'पेणला खरंच एक इतिहास घडला!' अशी उत्स्फूर्त प्रतिक्रिया होती मिरवणुकीतल्या एका प्रेक्षकाची. काही जण असंच काही शब्दांनी बोलले आणि बरेच जण नुसत्या नजरेन. पथकातले वर्धकही या प्रतिसादानं भारावले होते. त्यांची प्रतिक्रिया होती, 'पेणसारख्या अपरिचित गावात मिळालेला हा सुंदर प्रतिसाद अगदी घरातल्या माजघरात झालेल्या कौतुकासारखा वाटला!'

अनंतचतुर्दशीच्या दिवशी, तुळशीबागेचा गणपती, श्रीमंत दगडुशेट हलवाई गणपती आणि आता पेणची मिरवणूक असं एकूण चौदापंधरा तासांचं वादन करून वर्धिनीच्या युवकांच्या वादनदलानंही 'स्व'-रूपवर्धिनीच्या लौकीकात भर घालणारा 'एक इतिहासच' 'वाजत-गाजत' घडवला होता.

...रात्री साडेनऊदहाला पेणहून निघालो. आणि एक वाजता पुण्याला पोचलो. निघताना जागे होतो. ...... आणि पोचल्यावर जागे झालो.

* * *

* *

*

**१९१५ : सुफी अंबाप्रसाद यांचे इराणच्या रणक्षेत्रात, यतीन्द्रनाथ मुखर्जी यांचे बालासोरच्या अरण्यात व ब्रह्मदेश मधील बंडात बंडनेते पं. सोहनलाल पाठक व हरनामसिंग यांचे बलिदान.**

# ओढ मातृभूमीची...

*श्री. निलेश व सौ. सोनल काविया हे दाम्पत्य कॅनडामध्ये नोकरीला होते. कॅनडातच ते लहानाचे मोटे झाले. महाराष्ट्र सेवा समिती ही संस्था कॅनडामधील भारतीयांच्या मनामध्ये आपल्या देशासंबंधी आस्था जागवते. भारतातील अनेक सामाजिक संस्थांना भरघोस अर्थसहाय्य मिळवून देते. या कामामध्ये अग्रणी असणारे वर्धिनीचे हितचिंतक डॉ. जगन्नाथ वाणी यांनी वर्धिनीच्या प्रकल्पासंबंधी बनवलेली एक चित्रफीत काविया दाम्पत्याने पाहिली होती. आपल्या मातृभूमीशी आपलं नातं अधिक घट्ट करायचे असेल, तर आपला देश, आपली संस्कृती याचा जवळून अभ्यास केला पाहिजे, अशा भावनेने या दाम्पत्याने आपल्या नोकरीचा राजीनामा दिला. किमान एक वर्ष भारतामध्ये राहून ही ओळख करून घेण्याच्या निर्धाराने ते भारतात आले. 'स्व'-रूपवर्धिनीच्या कामाची थोडीशी ओळख चित्रफीतीद्वारा झाली होतीच. हे काम जवळून पहावे व सहभागी व्हावे असा त्यांचा संकल्प होता. या कामात काही काळ प्रत्यक्ष आर्थिक योगदान देण्याच्या हेतूने काही देणग्या त्यांनी स्वतः गोळा केल्या. प्रत्यक्ष डिसेंबर १९९९ या कालावधीत आजोळ प्रकल्पात, ऑक्टोबरमध्ये दिवाळी शिबिरात दोघांनीही सक्रीय काम केले. २२ डिसेंबर रोजी पुढच्या प्रवासाला निघताना वर्धिनीसंबंधी त्यांच्या ज्या भावना होत्या, त्या त्यांच्याच शब्दात पुढे देत आहोत -*

We have been honoured beyond words to be a small part of the 'Swa'-roopwardhinee experience. We heard about 'Swa'-roopwardhineee through Dr. J.K. Wani of MSSO in Canada and came to Pune with an open mind. Our visit was motivated by the need to better understand the role of social organisations serving people in the lower socio-economic sector. We have been with Wardhinee for the past six weeks. Our limited involvement has included interacting with children in an Ajole program, observing camps and Shakhas (daily programs) and developing friendships with volunteers at the centre. We have been touched by the 'Swa'roopwardhinee's holistic approach towards the development of children.

The centre's philosophy not only has a deep sense of humanity, it portrays a way of being and exemplifies a way of life. We have been inspired by every conversation we have had with the founder, Mr. K.L. Patwardhan. It has been more than an honour to learn from him and many others like him. Mr. Patwardhan firmly believes that one should give in a way that does not create dependency. This principle is certainly present at 'Swa'-roopwardhinee where future compassionate leaders are continually nurtured. In this way, the founder has created a social organization that will continue in action, spirit and philosophy for many generations.

In the words of K. L. Patwardhan, "Swa'-roopwardhinee is a concentrated effort on the selected few with the intention of creating selfless social workers and examples for others to follow". Part of the concentrated effort involves knowing and understanding the child's background and family situation as well as possible. This is

१५ जून १९१८ : तारिणी मुजुमदार, नलिनी वाक्ची यांचे डाका येथे हातघाईच्या युध्दात प्राणार्पण.

accomplished through personal interviews and frequent home visits. An effort that enables the centre to know the children as individuals. The selected few come from underprivileged backgrounds. Almost all of them live in single room dwellings often with several other family members. Such conditions are not conducive to the development of the child. Often the children do not even have a place to study. For these young boys and girls, the 'Swa'-roopwardhinee centre is a haven, a place for them to be a part of a larger community; a place for them to study, to have purpose, to give and to receive . 'Swa'-roopwardhinee has been built in the face of reality, filling its rooms and playground with those who need it most.

Living by example, spirituality, selflessness and respect and compassion for others are common threads ever present in all aspects of the centre. The vision of a caring community is continually being fostered and lived out here. The children are surrounded by examples of selfless and compassionate mentors. We have met countless volunteers illuminating goodness and dedication to serve at the centre. Many of them have made incredible personal sacrifices to devote their time and efforts to a cause they believe in. The importance of compassion before individual achievement is exemplified through such role models. This certainly has the effect on children wanting to become 'givers' and not just 'receivers' of society.

Care for others is abundant in the young men and women at the centre. When asked about his after-school hobbies, one boy remarked that working with and helping younger children was his hobby. A very enthusiastic young woman also expressed passion for social work by telling us of the joy she feels in seeing children begin to nurture and care for each other. Success to her meant making a difference for the children.

'Swa'-roopwardhinee is far more than a centre for slum children. It's programs and volunteers serve the community in so many ways. Programs such as vocational training for women, medical health and awareness programs, and family counselling each have their own touching stories.

There is a Buddhist teaching which says "Make of yourself a light for others". 'Swa'-roopwardhinee is a light in which many have found hope, care and loving-kindness. We are deeply grateful for the light the founder, the members and children of the centre have brought onto our own lives. our humble efforts have just begun. Thanks to 'Swa'-roopwardhinee, they will continue through our work in Canada and through our friendship with the centre here in Pune. We have been honoured to have started a lasting relationship with the kind spirits of all at 'Swa'-roopwardhinee.

१९१९ : जालीयनवाला हत्याकांड. याचा सूत्रधार मायकेल ओडवायर याला वीस वर्षांनी १९४० मध्ये, उधमसिंगांनी लंडनच्या भर सभेत ठार केले व स्वतः फाशी गेले.

## सौ. व श्री. काविया यांच्या लेखाचा भावानुवाद

'स्व'-रूपवर्धिनीच्या प्रयोगात सहभागी होण्याचा जो सन्मान आम्हाला मिळाला, तो केवळ शब्दातीत आहे !

महाराष्ट्र सेवा समिती संस्थेचे डॉ. जगन्नाथ वाणी यांच्याकडून आम्ही कॅनडात 'स्व-'रूपवर्धिनीबद्दल प्रथम ऐकलं. आणि स्वच्छ, मोकळ्या मनानं पुण्यात पाऊल टाकलं. आर्थिकदृष्ट्या खालच्या स्तरावर आणि सामाजिकदृष्ट्या दुर्लक्षित असलेल्यांकरिता सेवाभावी संस्थांच सेवाकार्य कसं चालतं, हे जाणून घेणं ही आमची भारतात येण्यामागची प्रेरणा होती.

गेले सहा आठवडे आम्ही वर्धिनीच्या सहवासात होतो. या मर्यादित सहवासात आम्ही वर्धिनीच्या शिबिरात गेलो, दैनंदिन शाखांवर गेलो, आजोळच्या मुलांच्यात मिसळलो. वर्धिनीच्या कार्यकर्त्यांशी दोस्ती केली आणि मुलांच्या विकासाकरता 'स्व-'रूपवर्धिनी मुलांशी जी जवळीक साधते, त्याने आम्ही भारावून गेलो!

'स्व'-रूपवर्धिनीच्या तत्त्वज्ञानात माणुसकीच्या तळमळीची जाण दिसते. तसंच ते तत्त्वज्ञान 'जीवन कसं असावं' याचं चित्र रेखाटते आणि 'जीवन कसं जगावं' याचं दर्शनही घडवते. 'स्व-'रूपवर्धिनीचे संस्थापक श्री. कृ. ल. पटवर्धन यांच्याशी झालेल्या प्रत्येक संभाषणातून आम्हाला प्रेरणा मिळाली. श्री. पटवर्धन आणि त्यांच्यासारख्या अनेकांकडून आम्हाला जे शिकायला मिळाले, ते कोणत्याही सन्मानाहून अधिक आहे. 'परावलंबी बनवणारं दान कोणीही करू नये' असा श्री. पटवर्धन सरांचा ठाम आग्रह असतो. दुःखितांबद्दल, पीडितांबद्दल कणव असणारं भावी नेतृत्व अखंडपणे घडवलं जाणाऱ्या वर्धिनीत हे सूत्र निश्चितपणे पाळलं जातं. या संस्थेच्या निर्मात्यानं अशा रीतीनं या संस्थेची निर्मिती केली आहे की, जिचं कार्य पिढ्यान् पिढ्या प्रत्यक्ष कृती, चैतन्यमय गाभा आणि तत्त्वज्ञान यानिशी अखंडपणे चालू राहील.

श्री. कृ.ल. पटवर्धन यांच्याच शब्दात सांगायचं तर ''स्व-'रूपवर्धिनी म्हणजे निवडक मोजक्या जणांवर सर्व लक्ष केन्द्रित करायचे आणि त्यातून अत्यंत अनुकरणीय आदर्शवत् असे निःस्वार्थी समाजसेवक घडवायचे.' ज्या मुलांवर अशा रीतीनं लक्ष केन्द्रित करायचे, त्यांची सर्व पार्श्वभूमी आणि त्यांची कौटुंबिक स्थिती माहीत करून घ्यायची, समजून घ्यायची. हाही एक भाग असतो. या मुलांच्या घरी वारंवार जाणं आणि त्यांच्याशी गप्पागोष्टी करणं यातून हे घडू शकतं. अशा प्रयासातनं मुलाचं स्वतंत्र व्यक्तिमत्व समजून घेणं शक्य होतं. या निवडक मोजक्या मुलांची घरची परिस्थिती अत्यंत गरीबीची असते. जवळजवळ सर्वजण आपापल्या छोट्या घरात - घरातल्या सगळ्यांबरोबर अगदी दाटीवाटीनं रहात असतात. या सगळ्या गोष्टी या मुलांच्या विकासाला अत्यंत बाधक असतात. घरात अभ्यासालाही जागा नसते. अशा सर्वांसाठी 'स्व-'रूपवर्धिनी ही अभ्यास करण्याची जागा आहे. काही चांगलं कार्य करण्याची जागा आहे. काही चांगलं 'देण्याची' आणि काही चांगलं 'घेण्याची' जागा आहे, एका विशाल समाजाशी नातं जोडण्याची ही जागा

**१२ जानेवारी १९२४ : गोपीमोहन सहा यांना मिस्टर डे यांच्या वधानिमित्त फाशी.**

आहे. खरं म्हणजे 'स्व-'रूपवर्धिनी हा त्यांच्याकरता स्वर्गच आहे ! ज्यांना नितांत आवश्यकता आहे अशांनीच केवळ वर्धिनीच्या वर्गखोल्या आणि खेळाची मैदानं गजबजलेली आहेत. एका निखळ वास्तवाच्या आधारावर वर्धिनी उभी आहे.

अनुकरणीय आदर्शत्व, निर्मळता, निस्वार्थीपणा, समोरच्यांबद्दल आदर आणि कणव या सर्व सद्गुणांचं दर्शन वर्धिनीच्या प्रत्येक उपक्रमातून होतं. 'सर्वांची काळजी वाहणारा समाज' असं स्वप्न इथं प्रत्यक्षात 'जगलं जातं' आणि 'जपलंही जातं.' पूर्णपणे निस्वार्थी आणि हृदयात माया असलेले चांगले मित्र यांची सततची साथसंगत मुलांना लाभते. सत्प्रवृत्तीनं दिपवून टाकणारे आणि समर्पित वृत्तीने काम करणारे अनेक कार्यकर्ते इथे आम्हाला भेटले. त्यांनी विश्वास बसू नये अशा रीतीनं वैयक्तिक त्याग करून त्यांची श्रध्दा असलेल्या या कामाकरिता आपला सगळा वेळ आणि आपले अथक परिश्रम यांनी वाहून घेतले आहे. अशा रीतीनं वैयक्तिक सुखप्राप्तीपेक्षाही समाजाबद्दलच्या तळमळीला प्राधान्य देणारे आदर्श इथे प्रत्यक्ष प्रमाण म्हणून समोर ठेवता येतात. आणि याचा परिणाम इथल्या मुलांना आपण समाजाकडून 'केवळ घेणारे' न बनता समाजाकरिता 'देणारे' बनावे असं वाटायला लागण्यात होतो.

वर्धिनीतले युवक अन् युवती दुसऱ्यांची कमालीची काळजी वाहत असतात. एकाला आम्ही विचारलं 'शाळा सुटल्यावर, तुला कसा वेळ घालवायला आवडतो?' त्यानं सांगितलं, 'लहान मुलांना मदत करायला, त्यांच्याकरता काही तरी चांगलं करायला मला आवडतं.' एका खूप उत्साही मुलीनं समाजसेवेची तळमळ असणारे उद्गार काढले, की 'खरोखर या छोट्या छोट्या मुलांना एकमेकांची काळजी घेताना, एकमेकांकरता आपुलकीनं काही करताना पाहिलं की, मन आनंदानं हरवून जातं!' तिच्या मते मुलांच्यात असं परिवर्तन घडणं हे खरं यश आहे !

'स्व-'रूपवर्धिनी म्हणजे दुर्लक्षित वस्तीत रहाणाऱ्या मुलांकरिता 'एक उपक्रम' याहूनही अधिक काही आहे. आपले कार्यकर्ते आणि उपक्रम यांच्यायोगे 'स्व-'रूपवर्धिनी समाजसेवेचे अनेक परींनी कार्य करीत असते. महिलांकरिता चालणारे व्यवसाय शिक्षण, माता-बाल संगोपन केन्द्र, कुटुंब सल्ला केन्द्र, महिला जागृती, या उपक्रमांशी मन हेलावणारे अनेक प्रसंग निगडीत आहेत.

भगवान बुध्दांचं एक वचन आहे, "तुम्ही इतरांकरिता प्रकाश बना." 'स्व-'रूपवर्धिनी हे असं एक प्रकाशवलय आहे की, जिथे अनेकांना आशेचे किरण, काळजी वाहणारे कुणी अन् अत्यंत प्रेममय जिव्हाळा गवसतो, आमच्या आयुष्यात आम्हाला एक नवी प्रकाशवाट दाखवल्याबद्दल आम्ही 'स्व-'रूपवर्धिनीचे ऋणी आहोत. आमच्या अल्प प्रयत्नांना आम्ही आता प्रारंभ करीत आहोत. कॅनडात आम्ही जे काम करणार आहोत आणि त्यायोगाने आमचा जो मैत्रीचा बंध इथे निर्माण झाला आहे, त्याबद्दल 'स्व-'रूपवर्धिनीला मनःपूर्वक धन्यवाद! 'स्व'-रूपवर्धिनीशी आमचं जे जिव्हाळ्याचं नातं जडलं आहे, त्यानं आम्हीच सन्मानित झालो आहोत !

**२१ फेब्रुवारी १९९५ : सिंगापूर स्वतंत्र. स्वातंत्र्यध्वज फडकला.**

# 'स्व'-रूपवर्धिनी' - आईची आणि माझीही !

✍ आरती वडके, इ. ९वी

'स्व'-रूपवर्धिनी म्हणजे मायेचं घरच ! खरोखर ! एखादी आई जशी आपल्या लेकाला माया प्रेम देते, तशी या 'स्व-रूपवर्धिनीतून माया मिळते. या मायेची मला जाणीव आहे. मला आईसारखी माया मिळाली. केवळ मलाच नाही, तर माझ्यासारख्या प्रत्येक मुलीला 'स्व'-रूपवर्धिनीच्या कार्यकर्त्यांकडून प्रेम,माया,व मदत मिळाली आहे. मिळते आहे.

आमची परिस्थिती अतिशय बिकट अशी होती. वयाच्या दुसऱ्या वर्षापासूनच पुण्यामध्ये आजीने माझा सांभाळ केला. तिची परिस्थिती अतिशय बिकट होती. अशा वातावरणात मी वर्धिनीच्या बालवाडीत प्रवेश केला. परिसाच्या सानिध्यात येऊन जसे लोहाचे सुवर्ण बनते, तसे वर्धिनीच्या सान्निध्यात आल्यावर सुवर्णरूपी संस्कार घडवले जातात. माझ्यासारख्या मुलीवर असेच संस्कार घडवले गेले. झोपडपट्टीतील माझ्यासारख्या मुलीला घडवण्याचं कार्य 'स्व'रूपवर्धिनीनं केले. बालवाडीतला पहिला दिवस होता. तेव्हा मी फार घाबरले होते. परंतु जेव्हा शिक्षकांचा प्रेमरूपी मायेचा हात माझ्या पाठीवरून फिरला, त्याच क्षणी माझी भीती नाहीशी झाली. आणि मी सर्वांशी मोकळेपणाने बोलू लागले. ताई मला त्यांचा डबा अनेकदा खाऊ घालायच्या. परिस्थितीमुळे माझ्याजवळ चांगले कपडेदेखील नसायचे. पण वेळ प्रसंगी मला ताईंनी तीही मदत केली. फक्त त्यांनीच नाही, तर 'स्व'-रूपवर्धिनीतील प्रत्येक कार्यकर्त्याने मला मदतीचा हात दिला. सर्वांनी मला तेवढेच प्रेम व प्रोत्साहन दिले. त्यांच्या या आठवणी अजूनही माझ्या मनात घर करून आहेत.

त्यांनी माझ्या आईलाही मदत केली. आमच्या घरची परिस्थिती फार बिकट होती. तसं आईचं शिक्षण दहावीपर्यंत झाले होते. पण तिला काही काम नव्हते. घरी अगदीच टंचाई होती. पण अशावेळी ''स्व'-रूपवर्धिनीच्याच सान्निध्यात रहायचं' असा तिने निर्धार केला. आणि मग धुणेभांडी करणारी माझी आई हळूहळू होम नर्सिंगचा कोर्स करत प्रगतीपथावर चालू लागली. एवढ्या बिकट परिस्थितीतून केवळ 'स्व'-रूपवर्धिनीने दिलेल्या साह्याच्या आधारे तिनं होम नर्सिंगचा कोर्स केला आणि ती रूग्णांची सेवा मनोभावे करू लागली. आमची परिस्थिती जरा सुधारली. त्यानंतर तिनं ॲक्युप्रेशरचा कोर्स केला.

'स्व'-रूपवर्धिनीने माझ्या आईप्रमाणेच मलाही घडवलं. बालवाडीपासून मी 'स्व'-रूपवर्धिनीच्या सान्निध्यात राहिले. त्यामुळे साहजिकच माझी धाडसी वृत्ती वाढली. अभ्यासामध्ये माझी प्रगती होऊ लागली. प्रत्येक कार्यक्रमात, स्पर्धेत भाग घेण्यासाठी मला वर्धिनीकडून प्रोत्साहन मिळू लागले. आता मी इयत्ता नववीत असून स्वतःच्या पायावर उभं रहाण्याइतकं धाडस माझ्यामध्ये 'स्व'-रूपवर्धिनीमुळे निर्माण झालं आहे.



१९२३ : बब्बर अकाली दल आंदोलन. त्यात कर्मसिंह आदी अकरा जणांचे लढतांना वा फाशी जाऊन बलिदान.

# क्रिया करून करवावी । बहुतांकरवी ॥

✍ सौ. विद्या दीक्षित

'स्व'-रूपवर्धिनीबाबत लिहावे, असे खूप दिवसांपासून मनात होते. पण आता तो योग आला. नाव सार्थ असलेली ही एक स्वयंसेवी संस्था आहे. 'स्व'-रूपवर्धिनी म्हणजेच स्वतःमध्ये कोणते गुण आहेत, ते ओळखून त्या गुणांच्या वाढीसाठी स्वतःहून प्रयत्न करणे. त्यायोगे आपल्या स्वतःच्या पायावर उभे रहाण्याची ताकद मिळवणे आणि त्याचा उपयोग समाजासाठी करणे ही या कामामागील दृष्टी.

इथे काम करीत असताना एका गोष्टीची जाणीव होते की, प्रत्येक कार्यकर्ते एकमेकांशी, तसेच इथे येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीशी, पालकांशी, अतिशय आपुलकीने बोलतात, वागतात. ही संस्था फक्त एक चाकोरीबध्द संस्था नाही, तर ते एक आपुलकीच्या वातावरणाने भारलेलं मोठे कुटुंब आहे. एकमेकांशी हेवेदावे अथवा स्वार्थी प्रकार इथे पहायला मिळत नाही. प्रत्येकजण येतो, आपआपले काम करतो आणि हातातले काम पूर्ण झाले की, पुन्हा दुसऱ्या नव्या कामासाठी सिध्द होतो. स्वच्छ आणि सुंदर असे इथले काम आहे. सुरूवातीच्या काळात काम उभे करताना झालेला त्रास पूर्णपणे सहन करून आपले ध्येय गाठण्यासाठी सर्वजण जिद्दीने उभे राहीले आहेत. माणूस घडविण्याचे कार्य येथे चालू आहे. हे सर्व करीत असताना कामातून कार्यकर्ते निर्माण करण्याचे कार्यही वर्धिनी करीत आहे. आणि महत्त्वाचे म्हणजे माजी विद्यार्थीही वर्धिनीला विसरलेले नाहीत. जाणीवपूर्वक आठवण ठेवून आपल्या परीने जसं शक्य आहे, त्या पध्दतीने ते वर्धिनीसाठी काही करीत असतात. 'क्रिया करून करवावी । बहुतांकरवी ॥, या दासबोधातील ओवीची आठवण या कार्यातून होते.

हे सगळे पाहिल्यावर असे वाटते की, खरेच ! किती अवघड आहे, असे काम करणे ! रोजच्या शाळेव्यतिरिक्त ३६५ दिवस चालू असलेली ही शाळेनंतरची शाळा आहे.

मला इथे येऊन दीड वर्ष झाले. पण असे वाटते की, खूप वर्षापासून आपण इथे आहोत. वर्धिनीच्या कार्यातून प्रेरणा घेऊन आपणही काहीतरी करावे, काहीतरी केले पाहिजे, असे मनापासून वाटते.

## वर्धिनीचा वाहनचालकसुध्दा !

औपचारिक किंवा अनौपचारिक माध्यमातून चालणाऱ्या कार्यक्रमांचे सुयोग्य परिणाम वर्धकांवर, कार्यकर्त्यांवर जसे होत असतात, तसाच ह्या वातावरणाचा परिणाम कामाशी संबंधित प्रत्येक व्यक्तीवरही कळत-नकळत होतच असतो. वर्धिनीच्या वाहनातून उद्योगशिक्षण प्रकल्पातील काही महिलांची सहल चालली होती. या महिलांना प्रवासामध्ये चित्रपटातील गाणी म्हणण्याचा मोह झाला व त्या ती गाणी म्हणू लागल्या. गाडीच्या चालकानं गाडी हळू करीत सर्वांना सांगितले की, अशा प्रकारची गाणी वर्धिनीत म्हटली जात नाहीत, हे तुम्हाला माहिती नाही का? गाडीच्या चालकाने या महिलांना समजावले आणि वातावरणच बदलले.

**१९२५ : दक्षिणेश्वर बॉंब खटला, अनंत हरि मित्र व प्रमोद चौधरी यांना फाशी.**

# मंत्र छोटा तंत्र सोपे ...

✍ मंदार पारगांवकर

**हम करे राष्ट्र आराधन**
**तन से मन से धन से**
**तन मन धन जीवन से**
**हम करे राष्ट्र आराधन !**

हेच वर्धिनीचे मुख्य ध्येय आहे. मातृभमीला उच्च पदावर पोहचवणे, झोपलेल्या समाजाची अस्मिता जागृत करणे, राष्ट्रासाठी, आपल्या पीडित देशबांधवांसाठी सर्वस्वाचा त्याग करणारी तरूण पिढी तयार करणे. कारण
'आनंद दुजांना देणे या परी ते नाही पुण्य,
विसरतात आपुला स्वार्थ होतात जगी ते धन्य,
मातेची मंगल गीते गाऊया होऊनी धुंद'!

स्वतःसाठी सगळेच जगतात. पण दुसऱ्यांना आनंद देण्यात जे सुख आहे, ते कशामुळेही प्राप्त होऊ शकत नाही.

दैनंदिन शाखा हे यासाठी उत्तम माध्यम आहे. कारण येथे वर्धकांना मानसिक व शारीरिक स्वरूपात तयार करण्यासाठी काही छोट्या-छोट्या गोष्टी मुद्दाम घेतल्या जातात. शाखेत घेतली जाणारी प्रत्येक कृती अर्थपूर्ण असते. रोज मुलांकडे दैनंदिनीचा आग्रह धरला जातो. त्रिसूत्रीचे पालन करण्याची अट घातली जाते. ही त्रिसुत्री आहे -

- **सकाळी व रात्री दात घासणे,**
- **आईवडिलांच्या व देवाच्या पाया पडणे,**
- **रोज तीन तास अभ्यास करणे.**

या गोष्टींची पूर्तता करणारा वर्धक हा स्वतःला एक प्रकारची शिस्त लावतो. सायंशाखेत व्यायाम, खेळ होतात, जेणेकरून शारीरिक बळ वृध्दिंगत व्हावे. त्यानंतर प्रार्थना, ॐकार होतो. यात ॐकारातून वर्धकांची एकाग्रता साध्य होते. तर प्रार्थना त्याला नम्रता शिकवते. प्रत्येक चरणातून त्याच्यावर संस्कार होतात. कळत-नकळत प्रार्थनेचा अर्थ त्याच्या अंतःकरणात उमटतो.

प्रार्थनेनंतर अभ्यास. कारण खेळून ताजेतवाने झालेलं मन, ॐकारातून साधलेली एकाग्रता यांचा अभ्यासावर योग्य परिणाम होतो व छान अभ्यास होतो. शनिवारी वर्धकांच्या ज्ञानात भर घालण्यासाठी व्याख्यान घेतले जाते. रविवारी सकाळी मानसिक विकास बैठक ही नावाप्रमाणेच मनाचा विकास करणारी. शाखा सुटताना तीनचार ओळींची छोटी प्रार्थना; पण खूप मोठा अर्थ सामावलेली अशी होते.

**नमो जन्मभूमी जिथे जन्मलो मी ।**
**नमो मातृभूमी जिथे वाढलो मी ॥**
**नमो कर्मभूमी जिच्या सर्व कामी ।**
**झिजो देह माझा, प्रभो प्रार्थतो मी ॥**

वर्धिनीत छान देशभक्तीपर, प्रोत्साहनपर पद्य घेतली जातात. ज्यातून वर्धकांना प्रेरणा प्राप्त होते.

**भारताची या महारथा या सारे मिळूनी ओढूया ।**
**पायी गती अन् हाती शक्ती हृदयी भक्ती जोडू या ॥**
**ध्येय पथावर डोळे खिळवू श्वासामध्ये निश्चय मिळवू ।**
**परस्परांच्या चालीमध्ये एकतानता साधू या ॥**

दिवाळीची सुटी, उन्हाळ्याची सुटी वाया न घालवता शिबिरात घालवली, वापरली जाते. शिबिरांचे विषयही अनेक - शिवरायांचे चरित्र, सामाजिक संस्था भेट, क्रांतीकारकांच्या कथा, थोर व्यक्तींच्या कथा, मोठमोठ्या व्यक्तींच्या मुलाखती, इत्यादी.

**१९२७ : काकोरी खटला. पं रामप्रसाद बिस्मिल यांसह चार जणांना फाशी व दोघांना जन्मठेप.**

अशाप्रकारे प्रत्येक कृती ही वर्धकांच्या विकासासाठी असते. त्यांचे व्यक्तिमत्व विकसित व्हावे, सर्वांगाने ते फुलावं हा यामागचा हेतू. कोणत्याही परिस्थितीत, प्रतिकुल वातावरणावर मात करणारा वर्धक निर्माण करण हेच वर्धिनीचं कार्य आहे.

**वर्धिनीच्या मुलांकडून अपेक्षा काय ?**

निसर्गतः प्रचंड बुध्दिमत्ता, चांगलं घर, सुखी परिवार मिळालेली मुलं शाळा कॉलेजात प्रचंड यश कमवतात. स्वकर्तृत्वावर, बुध्दिमत्तेवर परदेशात जातात. तिथे नोकरी करतात, रहातात. सुख त्यांच्या हातात हात घालून चालते. पद, प्रतिष्ठा, पैसा प्राप्त होतो. समाजात सन्मान मिळतो. गुणी पत्नी वा पती मिळतो. मुलाबाळांचा संसार होतो. निसर्ग नियमाने मृत्यू येतो. जगण्याच्या क्षणाची ही आरास अशीच वाया जाणार! जर आपल्या हातून राष्ट्रसेवा घडली नाही तर ! या सगळ्या गोष्टींत आपले संस्कार विसरून चालतील का ? आपल्या राष्ट्रासाठीची आपली कर्तव्ये दृष्टीआड करून चालतील का? समाजातील आपलेच बांधव गरीबीत आहेत, त्यांचे दुःख विसरून चालेल का ? नाही ! त्रिवार नाही ! ही जाणीव वर्धिनी करून देते.

**बांधवांच्या आर्त हृदयी**
**मेघसे ओसंडूनी,**
**शिंपिती जे प्रेम अपुले**
**असती का ऐसे कुणी !**

देशबांधवांच्या हाकेला 'ओ' देऊन, वर्धिनीचे वर्धक सर्वस्व अर्पायला तयार होतील असे वातावरण येथे आहे. कारण वर्धिनीचे ब्रीदच आहे **'विकसित व्हावे, अर्पित होऊनी जावे !'** आणि वर्धिनी आम्हा सर्वांना हेच शिकवते की,

**'आयुष्याला उधळीत जावे केवळ दुसऱ्यासाठी,**
**या दानाच्या संतोषाला जगी या उपमा नाही**
**जन्म असावा देण्यासाठी हेच मनाला ठावे'.**

### ✳ पदी धैर्य, बाहूंत शौर्य स्फुरावे ! ✳

वर्धिनीच्या शाखेत रोज होणाऱ्या प्रार्थनेतील ही ओळ. प्रार्थना रोज म्हटली पाहिजे, हा आग्रह रोज मैदानात खेळणाऱ्या आणि प्रार्थना म्हणणाऱ्या छोट्या छोट्या वर्धकांच्या व्यक्तिमत्वात खरोखरीच नकळत बदल घडवत असतो. दिसायला किरकोळ असणारी मुलेसुध्दा संकटकाळी धैर्याने सामोरी जातात. अलीकडचाच घडलेला एक प्रसंग- रामकृष्ण शाखेतील ७वी इयत्तेतील शाकीर शाळेत जायला निघाला होता. वाटेत एका अनोळखी माणसाने अचानक त्याच्या तोंडावर रूमाल धरला. रूमालावर गुंगी येणारे औषध फवारलेले असल्याने शाकीरला पुढे काही कळलेच नाही. जेव्हा शुध्द आली, तेव्हा त्याच्या लक्षात आले की, आपण पुणे रेल्वे स्टेशनमध्ये लोकलमध्ये आहोत. ज्या माणसाने त्याच्या तोंडावर रूमाल धरला होता, तो शेजारीच बसलेला होता. शाकीरचा हात त्याने धरून ठेवला होता. लोकल सुरू होण्याचा भोंगा होताच शाकीरने त्या माणसाच्या हाताला कडकडून चावा घेतला. अचानक झालेल्या हल्ल्याने तो माणूस गोंधळला आणि त्याच्या हाताची पकड सुटली. ही नेमकी संधी साधून शाकीरने प्लॅटफार्मवर उडी मारली. लोकलने वेग घेतला. पळवून नेण्याचा त्या माणसाचा मनसुबा फोल ठरला.

✻ ✻ ✻

**८ सप्टेंबर १९२८ : चंद्रशेखर आझाद यांच्या हिन्दुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन आर्मीची स्थापना.**

# 'शाळा' मुलांसाठी ! नव्हे नव्हे पालकांसाठी !!

✍ श्रीमती पुष्पाताई नडे

मुलांचे शिक्षण, त्यांचे भवितव्य यासंबंधीच्या चिंता पालक सतत करीत असतात. पालक अशिक्षित असोत, अर्धशिक्षित असोत की, मोठे पदवीधर असोत. मुलांच्या संबंधीचे त्यांचे एकमेकांत होणारे संवाद हे सारखेच असतात, असाच सर्वसाधारण अनुभव येतो. माझे म्हणणे पटण्यासाठी अनेक घरात चालणाऱ्या संवादाची एक झलक खाली देत आहे. कदाचित शब्द वेगवेगळे वापरले जात असतील; पण आशय हाच असतो. बघा माझं म्हणणं पटतंय का? त्यासाठी खरं म्हणजे आपले लहानपण आणि आपल्या आईवडिलांचे आपल्यासंबंधी झालेले संवाद आठवा. म्हणजे नकळत संमतीदर्शक मान हलवाल.

*'अग ! अक्षय कुठे गेलाय ?'*

*'अहो ! आज त्याला सुट्टी आहे'*

*'म्हणून काय झालं ? अभ्यास नको करायला? '*

*'अहो ! काल रात्री उशिरापार्यंत गृहपाठ करीत बसला होता.'*

*'हे पहा ! तू त्याला पाठीशी घालू नकोस. माझ्या लहानपणी परिस्थितीमुळे माझ्या इच्छेप्रमाणे मी शिकू शकलो नाही. त्यामुळे त्या सर्व अपेक्षा अभयने पूर्ण कराव्यात असे माझे स्वप्न आहे. शिकायला पैसे कमी पडू नयेत म्हणून रात्रपाळी-दिवसपाळी-ओव्हरटाईम ... काय काय म्हणून मी करीत नाही. आणि हा शहाणा मात्र गावभर उंडारत बसतो. तू त्याला अगदी लाडावून ठेवला आहेस !'.*

असे संवाद ऐकायला आले की वाटतं, पालकांना विचारावं - आपली मुलं म्हणजे काय वस्तु बनवण्यासाठी लागणारा कच्चा माल आहेत का? हवी तशी प्रक्रिया केली की झाली तयार हवी ती वस्तू ! या वस्तूचा रिमोट कंट्रोलही पालकांच्याच हातात असतो.

कसं उठावं, कसं चालावं, कुठे जावं वगैरे हेच ठरवणार. मग एका यांत्रिक बाहुल्याप्रमाणे त्याची अवस्था होते. असे करीत असताना पालकांच्या काही गोष्टी का लक्षात येत नाहीत, कुणास ठाऊक? आपल्या मुलांना सुध्दा मन आहे, भावना आहेत, ते स्वतः विचार करू शकतात, त्यांचं कल्पनेचं विश्व हे किती मोठे आहे, हे कधी लक्षातच घेतलं जात नाही. आपण त्यांना उगीचच आपल्या विश्वात ओढत असतो ! कीव येते अशा पालकांची ! त्यांच्या कल्पनेच्या विश्वात काय नाही? दुधाच्या नद्या आहेत, चंदेरी झाडांवर आईस्क्रिमचे कप लागलेले आहेत, चॉकलेटचे बंगले आहेत, जिलेबी-लाडूंचे डोंगर आहेत. त्या विश्वात पंखांच्या पऱ्या इकडून तिकडे फिरत असतात. शिवाय एक जंगलपण आहे. तिथे वाघ, सिंह, माकड, ससे, हरीण, असे सर्व प्राणी न भांडता एकत्र रहातात. अशा विश्वात आपली मुलं कधी फुलपाखराच्या, तर कधी सशाच्या मागे धावत जातात. कधी तेथील सुगंध घेतात, तर कधी छोट्या नावेतून फिरताना दुधाच्या सागरलाटांचा स्पर्श जाणवून घेतात. आणि हे सर्व त्यांच्या कल्पनेतील विश्व कधी आपल्या चिमुकल्या हातांनी ते वाळूतून साकार करण्याचा प्रयत्न करतात, तर कधी कागदावर चितारण्याचा प्रयत्न ते करतात.

**१७ नोव्हेंबर १९२८ : लाला लजपतराय यांचा पोलीस सुपरिटेंडेंट सँडर्स याने त्यांच्या छातीवर केलेल्या दंडुक्याच्या प्रहारांनी मृत्यू .**

अशा वेळी मुलं आपणास अनेक प्रश्न विचारत असतात. अशा या विश्वात आपण लहान होऊन का हिंडू नये? त्यामुळे कदाचित आपल्यालाही खूप बरे वाटेल. हे विश्व खूप निष्पाप आहे, निस्वार्थी आहे. खरंच काही वेळा आपण आपल्या मुलांच्या विश्वात रमून जावे. त्यांना एक नवा सवंगडी मिळाल्याचा आनंद मिळेल. आणि ते आणखी कल्पना करावयास लागतील. या निरागस निष्पाप वयात त्यांची कल्पनाशक्ती कशी वाढेल, याकडेच लक्ष पाहिजे. त्यात जमली तर आपण भर टाकावी. परंतु चुकूनही आपल्या संकुचित विश्वात त्यांना ओढून आणू नये. आपल्या विश्वात त्यांना घ्यायला काही आहे तरी का? असलेच काही तर रूसवेफुगवे, हेवेदावे, दु:ख, तुझे-माझे, भांडणे, स्वार्थ, ढोंगीपणा ! या सर्वातून नको त्या गोष्टी मुलं शिकतात आणि आपल्यातील पालक म्हणतो, "पाहिलंस याच्यासाठी रात्रपाळी दिवसपाळी केली. कधी स्वत:साठी जगलो नाही. सतत याचा विचार केला. त्याचे हे फळ का?"

अशा वेळी सांगावेसे वाटते, 'अहो ! तुम्ही फार मोठी चूक करीत आहात. मुलांच्या विश्वातील आनंद तुम्ही त्यांना घेऊ दिला असतात, तर कदाचित तुमच्या मनातील सर्व गोष्टी त्यांनी पूर्ण केल्याही असत्या.' प्रकर्षाने आता असे वाटू लागले आहे की, या स्वार्थी जगापासून आता पालकांनाही दूर करणे आवश्यक आहे. त्यांच्यासाठी छान पालकशाळा सुरू कराव्यात अन् पालकांनाही थोडेसे बालमानसशास्त्र समजून द्यावे. तुमच्या इच्छा त्यांच्यावर लादू नका. आई-बाबा झालो म्हणजे आपण पालक झालो, इतके ते सोपे नसते ! तर आपणास सुजाण पालक होता आले पाहिजे. आपलं मूल म्हणजे निर्जीव कच्चा माल नाही. प्रचंड क्षमता असलेला तो एक घटक आहे. त्याला ज्ञानातून आनंद घेऊ द्या, त्या ज्ञानाचं त्याला ओझं वाटून देऊ नका. त्याला सर्व विश्वावर प्रेम करायला शिकवा. त्याच्या आकांक्षांना मर्यादा घालू नका. पालकांनी या साऱ्यांचा विचार करावा. पालकशाळा ही कल्पना काही शिक्षणतज्ज्ञांनी मांडली आहे. याचा आपण सर्वजण गांभीर्याने विचार करूया, एकमेकांशी यासंबंधी बोलूया, कारण आपल्या देशाचे, समाजाचे उज्ज्वल भवितव्य हे आपल्याच भावी पिढीच्या हातात आहे. आपण पालक शाळा काढूया. तुम्ही सर्व सहभागी व्हा व हा प्रकल्प सर्वांनी मिळून पुढे नेऊया. चला, पुन्हा शाळेत जावूया. आपल्यापासून सुरूवात करूया. नवीन सुरूवात पालकशाळेची ! आपणास जसा वेळ देता येईल, त्या वेळात चालेल ?

## दीपस्तंभ

- ***'शिक्षण म्हणजे सत्‌संगती' याहून निराळी शिक्षणाची व्याख्या मी करू शकत नाही.***
- ***प्राप्तीपेक्षा प्रयत्नांचा आनंद विशेष आहे.***
- ***"मला काय उपयोग?" असे न म्हणता "माझा काय उपयोग?" असे म्हणावे, म्हणजे उपयुक्ततावादाचे सार्थक होईल.***
- ***सेवा / अहंकार = भक्ती***

**आचार्य विनोबा भावे.**

**१७ डिसेंबर १९२८ : लाहोरला पोलीस चौकीसमोर सँडर्सचा वध.**
**८ एप्रिल १९२९ ला दिल्लीच्या असेंब्लीत भगतसिंह व बटुकेश्वर दत्त यांनी बाँब टाकला. नंतर त्यांना अटक.**

## ताई आमची शाखा पुन्हा सुरू कराना !

फिरत्या प्रयोगशाळेच्या माध्यमातून सात आठ खेड्यांशी वर्धिनीचा सतत संपर्क आहे. यापैकी तीन खेड्यांमध्ये दर रविवारी युवक-युवती कार्यकर्त्यांच्या रचनेतून तेथील विद्यार्थ्यांसाठी साप्ताहिक शाखा चालू आहेत. गेल्या वर्षी आणखी एका खेड्यात शाखा चालू होती. दूरदूरहून पायी चालत या शाखेत विद्यार्थी नियमितपणे येत होते. कार्यक्रम जोरदार व्हायचे. काही कारणांनी ही शाखा चालवायला कार्यकर्ते उपलब्ध होऊ शकले नाहीत. पर्यायाने ही शाखा बंद पडली. काही दिवसांपूर्वी या खेड्याच्या रस्त्यावरून वर्धिनीच्या फिरत्या प्रयोगशाळेची गाडी जात होती. योगायोगाने त्याच वेळी रस्त्यावरून काही विद्यार्थी जात होते. त्यांनी ती गाडी पाहिली. धावत धावत ते गाडीपाशी आले. ड्रायव्हर काकांना गाडी थांबवायला लावली. गाडीत चढले. सर्वांचे डोळे पाणावले होते. जे कार्यकर्ते गाडीत होते त्यांना विनवू लागले ‘आमची रविवारची शाखा पुन्हा सुरू कराना!’ मुलांना शाखेची लागलेली ओढ कशी असते, त्याचे दर्शन कार्यकर्त्यांना झाले.

## तुमच्या पत्रांना आमचे असे उत्तर


कारगीलच्या लढाईच्या वेळी वर्धिनीच्या अनेक शाखेतील विद्यार्थ्यांनी युध्दक्षेत्रात लढणाऱ्या सैनिकांना पत्रे पाठवून आपल्या भावना कळविल्या. राजमाता जिजाऊ या मुलींच्या शाखेतील काही मुलींना सीमेवरच्या जवानांची उत्तरे आली. एका अधिकाऱ्याने लिहिले की, ‘आम्हाला तुमच्यासारख्या मुलामुलींची इतकी पत्रे येत आहेत की, त्या सर्व पत्रांना उत्तर देणे केवळ अशक्य आहे. पण शत्रूच्या सैनिकांना कंठस्नान घालणे आणि विजय मिळविणे हेच आम्ही योग्य उत्तर समजतो.’ हे पत्र शाखेत वाचले आणि सर्व वर्धकांनी भारतमातेच्या जयजयकाराच्या घोषणा देऊन इमारत दणाणून सोडली.

## ओघळलेले मोती

**राष्ट्रपती शंकर दयाळ शर्मा**
**माजी प्रांतसंघचालक श्री. प्रल्हादजी अभ्यंकर**
**श्री. पद्माकरपंत तथा दादा पारखी**
**श्री. आनंद परोपकारे**
**श्रीमती लीलाताई कवठेकर**
**श्री. दीपक गौड**
**श्री. विनायकराव कुलकर्णी**
**श्री. मनोज मधुकर कुलकर्णी**

**२३ मार्च १९३१ ला भगतसिंह सुखदेव, राजगुरू यांना फाशी व अन्य सातांना जन्मठेप.**
**याच कटातील भगवतीचरण यांचे २८ मे १९३० ला बॉंब प्रयोगात अपघाती निधन.**

# सातासमुद्रापार वर्धिनीसाठी



**'स्व'-रूपवर्धिनीचे संस्थापक कार्याध्यक्ष श्री. कृ.ल. तथा किशाभाऊ पटवर्धन आणि पूर्णकालीन कार्यकर्ते श्री. ज्ञानेश पुरंदरे हे गेल्या वर्षी 'स्व'-रूपवर्धिनीच्या प्रचार, प्रसार आणि अर्थसंकलनाच्या कामासाठी चार महिने इंग्लंड व अमेरिकेचा प्रवास करून आले. या प्रवासाचा वृत्तांत्त मुलाखतीच्या स्वरूपात पुढे देत आहोत -**

**अमेरिकेत आणि इंग्लंडमध्ये जाण्याची कल्पना कुठून आली? त्यामागे उद्देश कोणता? आर्थिक तरतूद कशी केली ?**

'स्व'-रूपवर्धिनीचे काम सरकारी मदतीशिवाय आणि बँकेच्या कर्जाशिवाय करायचे, हे 'स्व'-रूपवर्धिनी सुरू करतानाच पक्के ठरले होते. मग राहता राहिला एक मार्ग, तो म्हणजे लोकांकडून देणग्या गोळा करावयाच्या. यातूनच संस्थेची स्वत:ची पाच मजली इमारत उभी राहिली. दोन सदनिका विकत घेतल्या आहेत. तसेच याच निधीतून संस्थेने कायम निधी उभा केला आहे. सध्या दरमहा सामान्यपणे एक लाख रुपये खर्च होतो आहे. त्यातील चाळीस ते पन्नास हजार रुपये दरमहा कायम निधीच्या व्याजातून मिळतात, आणि उरलेले पैसे देणग्यांच्या रुपाने उभे करावे लागत आहेत. अशी सध्याची स्थिती आहे. महागाई वाढीची गती लक्षात घेता आणि कामांमध्ये आगामी आठ-दहा वर्षात होऊ शकणारी वाढ लक्षात घेता २००८ साली दर महिन्याला चार लाख रुपये म्हणजे वर्षाला सुमारे ५० लाख खर्च येईल, असा अंदाज आहे. एवढ्या देणग्या प्रतिवर्षी मिळणे अशक्य. त्यामुळे त्यातील निदान ३०-३५ लाख आपल्याला व्याजाच्या रुपाने मिळाले पाहिजेत. म्हणजे त्यासाठी तीन-साडेतीन कोटी रुपये कायम निधीत जमा झाले पाहिजेत. भारतातील सध्याची आर्थिक मंदी इत्यादी परिस्थिती लक्षात घेता मी अमेरिकेला निधी संकलनाच्या कामासाठी जावे, असे कार्यकारिणीमधील अनेकांचे मत होते.

तसेच रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे संचालक श्री. विनय सहस्रबुध्दे नुकतेच अमेरिकेत जाऊन आले. त्यांनीही या संबंधात अनुकूल मत मांडले. त्यातूनच या विचाराला चालना मिळाली. तरीही माझे मन कचरत होते. माझे वय हे त्यातील एक कारण.

मग मी काही लोकांना या संबंधात भेटलो. त्यातील एक श्री. भाऊ घाणेकर. त्यांनी माझा प्रवासखर्च देण्याचे मान्य केले. त्यामुळे वर्धिनीच्या कोषावर फार ताण येणार नाही, असे चित्र उभे राहिले. या व्यतिरिक्त विदेशात उतरणे, तेथील अंतर्गत प्रवास या साठीच्या प्रवासखर्चाची व अन्य व्यवस्था अशा अनेक अडचणी

**१३ सप्टेंबर १९२९ : यतींद्रनाथ दास यांचे प्रायोपवेशन करून आत्मसमर्पण.**
**२३ डिसेंबर १९२९ : यशपाल यांनी लॉर्ड आयर्विन याची गाडी उडवली.**

होत्या. पण संघाच्या तेथील संपर्क यंत्रणेमुळे व आवश्यक ते परिचय मिळाल्यामुळे, ही पण अडचण दूर झाली.

**एकूण फलनिष्पत्ती काय?**

संघाची गेल्या ७५ वर्षाची जी तपस्या आहे, त्यातून जे काम व संपर्क उभा आहे, त्यातून अमेरिका व इंग्लंडमधील सर्व आवश्यक पत्ते मला मिळाले व तिथून त्यांना इ-मेल आम्ही जाण्याआधीच गेल्याने आमचे काम अत्यंत सुकर झाले. कुठेही हॉटेल वा लॉजमध्ये चार महिन्यात एकदाही राहावे लागले नाही.

माझ्याबरोबर श्री. ज्ञानेश पुरंदरे हे वर्धिनीचे पूर्णवेळ कार्यकर्तेही होते. ते होते म्हणूनच केवळ हा प्रवास मी पूर्ण करू शकलो व थोडेफार इप्सित गाठू शकलो.श्री. ज्ञानेश पुरंदरे यांनी या प्रवासातील कामांपैकी ८० टक्के भार स्वतःच उचलला होता. हिशेब लिहिणे, प्रवासाच्या रचना करणे, संपर्क करणे, या सगळ्या गोष्टी तेच पाहात.तसेच अनेक छोट्या मोठ्या बैठकीतून 'स्व'-रूपवर्धिनी या विषयी ते हिंदीतून उत्तम मांडणी करीत. एकूण ५८ बैठकी झाल्या. अंदाजे तीन हजार लोकांपर्यंत हा विषय पोचविला गेला. अशा लोकांपैकी सुमारे दीडशे जण हे 'स्व'-रूपवर्धिनीचे सहानुभूतदार होते असे म्हणता येईल व पन्नास लोक हे वर्धिनीचे मित्र म्हणता येतील. सहानुभूतदार व मित्र मिळून हे या मित्रांच्या प्रेरणेने म्हणजे सुमारे २०० जण आपल्या कामाला सहाय्य करतील. असा संभव आता दिसतो आहे.

**तेथील भारतीयांचा वर्धिनीबद्दलचा प्रतिसाद कसा होता? सामान्य अमेरिकन जनता कशी वाटली?**

भारतीयांचा प्रतिसाद उत्तम होता. अमेरिकेतील सर्वसामान्य माणसे अत्यंत कष्टाळू व अत्यंत प्रामाणिक आहेत. त्याचा आपल्याही लोकांवर चागला परिणाम जाणवतो. कळकळीनं, आपुलकीनं, धडधडून काम करणं हा अमेरिकनांचा स्वभाव आहे. हे वळण त्यांना पिढ्यान्‌पिढ्या लागलेले आहे.

येथून गेलेले भारतीय पूर्ण संस्कारसंपन्न आहेत. परन्तु त्यांच्या पुढच्या पिढीबद्दल मात्र जरा काळजीच वाटावी, अशी स्थिती आहे. कारण भारताबद्दल शाळेतून त्यांच्या कानावर काहीही येत नाही. एकूण अमेरिकन संस्कृतीचा त्यांच्यावर प्रभाव पडल्याने, त्यांना भारताबद्दल किंवा अशा कामांबद्दल फारसा रस असत नाही.

संघ संस्कारातून गेलेले अनेकजण मात्र मुलाच्या पहिल्या इयत्तेपासून भारतात परतण्याच्या मनःस्थितीत असतात.

परंतु, एरवी मात्र तिथेच राहाण्याचा मोह व्हावा इतकी प्रचंड भौतिक संपदा तिथे आहे. अमेरिका म्हणजे रेलचेल. या मातृभूमीबद्दल ज्यांना प्रचंड प्रेम असेल, तेच परत इथे येतील.

**एक मुख्याध्यापक म्हणून 'स्व-रूपवर्धिनी सारख्या आपल्या वेगळ्या प्रयोगाचे शिल्पकार या भूमिकेतून तेथील जीवनातील शिस्त, प्रामाणिकपणा, नैतिकता, सांस्कृतिक स्तर याबद्दलचा आपला अभिप्राय कोणता?**

'स्व'-रूपवर्धिनीचा मी शिल्पकार नाही. तसा माझा भ्रमही नाही. हे जे शिल्प उभे राहिले आहे, त्याला अनेकांचा हातभार लागलेला आहे.

शैक्षणिक बाबतीत अनेक शिक्षणविषयक सुविधा तिथे उपलब्ध आहेत. विविध शैक्षणिक उत्तमोत्तम फिल्म्स्, व्हिडिओ गेम्स, तिथे पाहायला मिळतात. वयाच्या तिसऱ्या-चवथ्या वर्षापासून हा अनुभव मिळत असल्याने त्यांचे सामान्यज्ञान वाढते. परंतु अन्य काही शिक्षणविषयक संस्कार त्यांच्यावर शाळेत केले जातात अथवा नाही याची मला फारशी कल्पना नाही. पण

**२ डिसेंबर १९३० कानपूरच्या डी.ए.व्ही. कॉलेजच्या आवारात पोलीसांशी संघर्ष होऊन, अनेकांना कंठस्नान घालून शालिग्राम शुक्ल यांचे धारातीर्थी पतन.**

तसा संभवही दिसत नाही.

सामाजिक, सांस्कृतिक या संदर्भात मी तेथे असताना घडलेले एक उदाहरण मला माहीत आहे. एका विशिष्ट वंशातील एका माणसाने तिथल्याच एका दुसऱ्या वंशातील चार मुलांचे एकदम खून केले. सगळी शाळा, सगळी अमेरिका हादरून गेली.

दुसरा एक किस्सा आहे. माझ्या परिचयाचे एक सुविद्य जोडपे आहे. त्यांच्या पत्नी एका शाळेत शिकवतात. त्या मला सांगत होत्या की, शाळेतील मुलाला एक चापट मारणे तर सोडूनच द्या; साधे रागाने बोलणेही अशक्य आहे. कारण पिस्तूल ही सहजप्राप्य गोष्ट असल्याने मुलांच्याही हातात पिस्तूल असते. वर्तमानपत्रातही याचा उहापोह चालू होता. पिस्तुले आणि बंदुका तयार करणारी लॉबी या संदर्भात प्रतिबंध लादणारा कायदा अमलात न आणू देण्यात आतापर्यंत यशस्वी झाली आहे. याचेही कारण त्या लॉबीचं सरकार दरबारी वजन आहे, असं मी ऐकलं आहे.

तेथील एकूण सांस्कृतिक वातावरण आपल्या देशापेक्षा खूप भिन्न आहे. चिंता वाढविणारं आहे. अनेक प्रश्न तेथील समाजात आहेत.

लहानपणापासूनच मुलं स्वतंत्र असतात, आईवडिलांनाही ते आवडतं. हॉटेलात काम करणं, गाड्या धुणं, पेट्रोल पंप यावर ते कामं करतात. त्यातून आपलं शिक्षण व गुजारा ते करतात. कॉलेजचं शिक्षण अत्यंत महाग आहे. स्वतः धडपडून पैसे मिळविणाऱ्यालाच ते शक्य आहे. त्यामुळे ज्याच्याजवळ कर्तबगारी आहे, ओढ आहे, तोच या शिक्षणामागे लागतो.

भौतिक संपन्नता खूप आहे. खाणंपिणं मुबलक व स्वस्त आहे. वस्ती खूप कमी व क्षेत्रफळ खूप मोठं आहे. तिथे जवळ जवळ एक कोटी मोटारी आहेत आणि पेट्रोल खूप स्वस्त आहे. पब्लिक ट्रान्सपोर्ट सहजसुलभ नाही. रिक्षा, मोटर, सायकली अभावानेच. आगगाड्या व प्रायव्हेट टॅक्सी या खूप महाग आहेत.

म्हणून तिथं काम करताना काही अडचणी जाणवतात. एक म्हणजे पब्लिक ट्रान्सपोर्ट नाही. दुसरं म्हणजे सकाळी सात ते सायंकाळी सात पर्यंत भरपूर कष्ट करून घरी परतल्यावर अशा कामांसाठी वेळ व ताकद राखणं अवघड आहे. म्हणून संघाच्या शाखाही साप्ताहिक भरतात. फक्त रविवारी. तसंच मुलं,-मुली, तरूण-तरूणी , पुरुष- महिला अशा एकत्रच शाखा भरतात. शिबिरंही तशीच होतात. ही परिस्थितीची गरज आहे. यामुळे संपर्कही फक्त दोन दिवसांच्या सुट्टीतच होतो. वाहक, वाहन व ज्यांना भेटायला जायचं त्यांचा वेळ यांचा मेळ बसणं व पुन्हा त्यांना जिथे भेटायला जायचं असेल, तिथे भेटून परतणं याला लांब अंतरामुळेही मर्यादा पडतात. म्हणून ई-मेल, पोस्टाच्या द्वारे वा दूरध्वनी या द्वारेच संवाद होऊ शकतो. या सगळया मर्यादांमुळे लोकांशी संपर्क ठेवून 'स्व'रूपवर्धिनीची कल्पना देणं अडचणीचं होतं.

तरी या सगळयातून मार्ग काढून इंग्लंड- अमेरिका मिळून आम्ही तीन हजार लोकांपर्यंत संपर्क साधू शकलो.

**तेथील समाज जीवनावर नैतिकदृष्ट्या चर्चचा काही प्रभाव दिसून आला का?**

चर्चमध्ये जाण्यासंबंधी तेथील युवापिढी पूर्णतया उदासीन आहे. काही चर्चेस् बंद पडली आहेत. कारण तिथे जायलाच कुणी तयार नाही. एखादा अमेरिकन युवक किंवा युवती चर्चमध्ये चालली तर आपल्याकडील भाषेत एखादे 'आजोबा' किंवा 'आजी' किंवा 'काकू'

**२३ डिसेंबर १९३० : हरिकृष्ण यांनी पंजाब युनिव्हर्सिटीच्या पदवीदानात गव्हर्नरवर गोळी झाडली व ते ९ जून १९३१ ला फाशी गेले.**

चालली अशी सर्व चेष्टा करू लागतात. हळूहळू चर्चेस बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे चर्चचा चारित्र्याच्या, नैतिकतेच्या संदर्भात समाजावर फार मोठा काही परिणाम होईल, असे दिसून येत नाही. टी.व्ही. संस्कृतीचाही खूप मोठा परिणाम दिसून येतो.

**तेथील वर्तमानपत्रांवर राजकारणाचा किती प्रभाव दिसून येतो ?**

तिथे एकूण शिक्षणविषयक धोरणाचा परिणाम किंवा दुष्परिणाम यांचा विचार करून शिक्षण कशा प्रकारे द्यायचे याचा सतत विचार चालू असतो. एकूण राजकारणाचा प्रभाव सर्वत्र असतो. राजकारणाच्या प्रभावाच्या बाबतीत मला काही अनुभव आला नाही. राजकारणाचा अभ्यास मात्र सर्वांचा असतो. वैयक्तिक बाबतीत आपली उन्नती आपण करून घ्यायची, अशी ओढ सर्वांच्या मनाला लागलेली असते. पण त्याच बरोबर शेजारच्या माणसावर काय आपत्ती आहे याचं ज्ञान करून घेतलं पाहिजे अशी जाण मात्र फारशी असावी, असं दिसत नाही. पण देश व समाजावर काही आपत्ती आल्यास मात्र सर्वजण झटून उभे राहातात. वैयक्तिक पातळीवर मदतीसाठी धावण्याची प्रवृत्ती नसली, तरी मी तिथे असताना मोठं वादळ आलं, तेव्हा सर्व सरकारी यंत्रणा व त्याच्या जोडीला सारा समाज एकजूट होऊन उभा होता.

**कुटुंबसंस्थेचं स्वरूप कसं आहे?**

मुळातच सर्व समाजरचना कुटुंबव्यवस्थेवर अवलंबून नाही. म्हणूनच मागच्या निवडणूकीत क्लिंटन यांनी कुटुंबसंस्था मजबूत करीन, असा एक मुद्दा त्यांच्या अनेक मुद्यांबरोबर मांडला होता. एकूण कुटुंबसंस्था पूर्णतः नसली, तरी बऱ्याच प्रमाणात उद्ध्वस्त झाली आहे. अशा परिस्थितीचं एक कारण असं आहे की, मूल जन्माला आल्यापासून त्याच्या मृत्यूपर्यंत सर्व काळजी सरकार घेतं. सरकार हे कसं करू शकतं? दिलेल्या पगारातील तीस टक्के रक्कम सरकार मूळातच कापून घेतं. १५टक्के समाज कल्याणासाठी व १५टक्के आरोग्य रक्षण अशी त्याची विभागणी असते. त्यामुळे कोणाही बेकाराला दरमहा १२०० डॉलर्स मिळतात. त्याच्या राहाण्याचीही सोय होते. त्यामुळे त्यांना कुटुंबसंस्थेची गरजच भासत नाही. पण त्यामुळे परस्परांसाठी त्याग, मुलं-आई इत्यादीं साठी काही करणं ही प्रवृत्तीच राहात नाही. म्हणून लहानपणापासूनच मुलांना व त्यांच्या आईवडिलांनाही स्वतंत्र राहाणंच आवडतं आणि त्यांना त्याचा अभिमान वाटतो. स्वतःचं शिक्षण स्वतः केल्याचा अभिमान, पण त्याचबरोबर आई-वडिलांविषयी बेफिकीरीही जाणवते. मुलं व आईवडील तेथील एकूण धावत्या जीवनक्रमामुळे आधी मुलाखतीची वेळ ठरवल्याशिवाय एकमेकांना भेटूच शकत नाहीत. कुणाला वेळच नसतो. मी एका मोठ्या किराणा दुकानामध्ये एका म्हाताऱ्या बाईंना आपलं सामान कसंबसं वाहून नेताना पाहिलं. वाईट वाटलं. पण त्या समाजाच्या हे अंगवळणी पडलं आहे. वृध्दाश्रमासारख्या संस्था तेथे मोठ्याप्रमाणावर आहेत.

**अमेरिकन समाजाची आपल्या दृष्टीनं अनुकरणीय अशी कोणती गुणवैशिष्ट्ये दिसून आली ?**

सगळयात मोठं वैशिष्ट्य म्हणजे तेथील प्रत्येक नागरिक अत्यंत कळकळीनं प्रचंड कष्ट करतो. लोक अत्यंत जागरूक असतात. एखाद्यानं कामचुकारपणा केला, तर लगेच त्याला त्याचं शासन होतं. मी जिथं राहात होतो, तिथे खूप विस्तीर्ण हिरवळ होती. माळी तिथे जीव ओतून काम करायचा. माळयाचं ते नेकीनं काम करणं मला आश्चर्य करायला लावणारं होतं. मी तिथल्या माझ्या मित्राला याबद्दल विचारलं. तो म्हणाला, "जर या माळयानं कामात कसूर केल्याचा अहवाल मिळाला आणि ते सिध्द झालं, तर दुसऱ्या क्षणी झालेल्या

**१८ एप्रिल १९३० ला चितागांवच्या कोठारावर ५१ क्रांतिकारकांचे सूर्यसेन यांचेसह आक्रमण. सूर्यसेन यांच्यासह दोघांना फाशी व अन्यांना जन्मठेप.**

कामाचे पैसे देऊन त्याला लगेच कामावरून कमी केलं जातं." असं वातावरण पिढ्यानूपिढ्या तिथं आहे. त्यामुळे एक प्रकारे अनुवांशिकतेतूनच कळकळीने खूप कष्ट करणं या सद्‌गुणाचा वारसा आला आहे.

**'बेथेल' संबंधी जरा विस्ताराने सांगा.**

बेथेल ही सरकारी अधिष्ठान नसलेली सामाजिक संघटना आहे. म्हाताऱ्यांच्या करमणुकीसाठी त्यांना मदत करणं, नीग्रोंना सहाय्य करणं इ. कामे ही संस्था करते. आपल्याकडे त्यागपूर्ण रीतीनं निस्वार्थी बनून काम करणे हा आदर्श आहे. अमेरिकेत अशा ट्रस्टचा ८० टक्के खर्च पगारवाटप इ. वर होतो. म्हणजे आपदग्रस्तांना साहयभूत होणाऱ्या मुख्य कामावर फक्त २० टक्के ३०टक्के एवढाच खर्च होतो. मिळालेल्या पैशाचा भरपूर मोबदला आपल्या कामातून देणं, हे सूत्र मात्र काम करणाऱ्यांच्या ठिकाणी नक्की असतं. अशा संघटनांना पैशांची कमतरता कधीच नसते.

आपल्याकडे पैसे मिळवण्याकरता किती कष्ट पडतात, हे मी अनुभवले आहे. सरकारचे नसलेले पैसेसुध्दा सरकारकडून मान्य करून घेण्यासाठी किती कष्ट पडतात आणि आणि तेसुध्दा सगळेच्या सगळे कसे पदरात पडत नाहीत, हेही मी अनुभवलेलं आहे.

तेथील एक सरकारी कंत्राटदार असलेला माझा मित्र मला सांगत होता की, तिथं आपण कामाचं बिल दिलं आणि सगळ्या तपासणीअंती योग्य असलं की, लगेच दुसऱ्या दिवशी सर्व पैशांचा चेक मिळतो. त्यामुळे तिथे काम करताना कोणालाही अंगचुकारपणा करावासा वाटत नाही. पूर्ण कामाचा भरपूर मोबदला सरकार देते. त्यामुळे सरकारविरोधी कोणी काही करीत नाही.

याचा अर्थ तिथे लाचलुचपत नाही असे नाही. ती आहे ; पण वरच्या पातळीवर. खालच्या पातळीवर ती पोचली नाही. ही लाचलुचपत नसण्याचं एक मुख्य कारण म्हणजे 'सेवेची सुरक्षितता' ही तिथे अजिबात नाही. मी एक कथा ऐकली. 'एका मोठ्या कारखान्याच्या उपाध्यक्षाला तो जेवत असताना अध्यक्षानं बोलावलं. हातात एक पाकीट दिलं आणि सांगितलं की, इथून तुम्ही तुमच्या केबीनमध्येही जायचं नाही, कोणत्याही कागदाला हात लावायचं नाही, सरळ कारखान्याच्या गेटबाहेर पडायचे, उद्यापासून कामावर यायचे नाही.' लोक याला घाबरतात. कारण लगेच इंटरनेटवर हे सर्वत्र पोचवले जाते. दुसरी नोकरी मिळणे अशक्य होते. हे वर्षानुवर्षे चालले आहे. त्यामुळे झटून काम करणे, अंग मोडून काम करणे, हे त्यांच्या अंगवळणी पडले आहे.

**स्वयंसेवक पाहिजेत अशी जाहीरात तुम्ही वाचलीत. त्याबद्दल तुम्ही काय सांगाल?**

जाहीरात अशी होती - "लहान मुलांना रस्ते ओलांडायला मदत करतील असे स्वयंसेवक हवेत." आणि अशा जाहिरातींना प्रतिसाद मिळून स्वयंसेवक मिळतात. "चांगलं काम केल्यावर मुलांना शाबासकी देण्यासाठी, त्यांना चांगले शिकवण्यासाठी स्वयंसेवक पाहिजेत," अशीही जाहीरात येते आणि त्यालाही प्रतिसाद मिळतो, स्वयंसेवक मिळतात.

**तुमचा दैनंदिन कार्यक्रम कसा होता? तुमच्या एकूण प्रवासातील कालावधीचे विभाजन कसे केले होते ?**

मी आणि ज्ञानेश अमेरिकेत तीन महिने आणि इंग्लंडमध्ये एक महिना राहिलो. या तीन महिन्यात पाच दिवस ज्ञानेशला सतत काम असावयाचे. ई-मेल, दूरध्वनी, पत्रलेखन, पुढचे कार्यक्रम ठरवणे इ. एकच उदाहरण सांगतो. अमेरिका सोडण्यापूर्वी ज्ञानेशने ज्यांनी

**२७ फेब्रुवारी १९३१ : अलाहाबादच्या ॲल्फ्रेड पार्कमध्ये इंग्रजांशी लढताना चंद्रशेखर आझाद यांना वीरमरण. व ३मे १९३१ ला लाहोरच्या शालीमार बागेत जगदीशचंद्र रॉय यांनाही इंग्रजांशी लढताना वीरमरण.**

देणगी दिली, अशा सर्वांना धन्यवाद देणारी पत्रे ई-मेलने आणि टपालाने पाठवली. शिवाय काही लोक भेटायला यायचे. तेही काम असायचे.

रोज पहाटे पाच-साडेपाचला उठायचे, वाचन, न्याहारी, पत्रलेखन, भेटी-गाठी इ. शनिवार-रविवारी भरपूर काम असायचे. या प्रत्येक दिवशी दोन-दोन, तीन-तीन कार्यक्रम असायचे. अर्थात त्या त्या ठिकाणच्या लोकांच्या सोयीनुसार. परंतु शारीरिक कष्ट मात्र कमी असत. ज्या ज्या संघ-स्वयंसेवकांकडे उतरत होतो, त्यांच्याकडे गाड्या असत. सर्वत्र गाडीने प्रवास होई. लांब जायचे असेल, तेव्हा पाच-पाच, सहा-सहा तासांचा विमानाचा प्रवास होई. अर्थात सार्वजनिक वाहनांच्या उपलब्धतेचा प्रश्न असल्याने विमानतळावरून इच्छित ठिकाणी पोहोचणे, ही समस्याच बने.

हिंदी-इंग्रजीवर प्रभुत्व आणि आंतरराष्ट्रीय वाहन परवाना असल्यावर भाड्यानं मिळणारी मोटार घेऊन प्रवास करणं हे तिथं सोपं आहे. सार्वजनिक वाहन नसणं हा फार मोठा अडचणींचा विषय ठरतो. इथून गेलेल्यांना ही मोठी अडचण असते.

**‘स्व’-रूपवर्धिनीच्या संस्कारातून गेलेला असा कोणी कार्यकर्ता अमेरिकेत आहे का? असल्यास त्यांचा या दौऱ्याच्या दृष्टीने उपयोग कसा झाला?**

एक काय तीन-चार युवक कार्यकर्ते आहेत, जे वर्धिनीच्या संस्कारात वाढलेले आहेत आणि सध्या अमेरिकेत आहेत. प्रसाद जमखिंडीकर हा त्यापैकी एक. तो जेथे राहतो, तेथून आमचा प्रवास सुरू करणे अधिक सोयीचे असल्याने प्रसाद जमखिंडीकरवरच आमची सर्व भिस्त होती. आम्ही अमेरिकेत पाय ठेवल्याबरोबर प्रसाद व त्याचा मित्र प्रशांत निकम आम्हाला न्यावयास आले होते. पहिले आठ दहा दिवस त्याच्याकडे राहूनच आम्ही सर्व भेटीगाठी, प्रवास याबाबतीत संपर्क साधला आणि पुढच्या सर्व वास्तव्याचे नियोजन केले. प्रसाद ज़मखिंडीकरचे घर हेच आमचे अमेरिकेतल्या वास्तव्याचे ‘मुख्यालय’ होते. सगळे निरोप प्रसादकडे यायचे आणि मग तो ते आम्हाला ई-मेलने किंवा दूरध्वनी करून कळवायचा. एका प्रकारे प्रसाद हाच आमचा अमेरिकेतला ‘मित्र, तत्वचिंतक आणि मार्गदर्शक’ होता. त्याच्यामुळेच आमचं पुष्कळसं काम सुकर झालं.

**उर्वरीत सर्व प्रवासात प्रसाद व्यतिरिक्त कोणाकोणाचे सहाय्य झाले ?**

सुदैव असे होते की, तिथे नेमक्या त्याचवेळी संघाची तीन शिबिरे होती. एक शिबिर ब्रजभूमीला होते. तिथे आम्ही बोललो. दुसरे शिबिर ह्यूस्टनला होते. हिंदू हेरिटेज कॅम्प असे त्याचे नाव होते. तिथे ज्ञानेश शिक्षक होता. त्यामुळे अनेक स्वयंसेवकांशी संपर्क आला. तसेच पुढील प्रवासातील निवास व्यवस्था, संपर्क व्यवस्था, विमानतळावरून नेण्याची व विमानतळावर पोचवण्याची व्यवस्था या सर्व गोष्टी संघ स्वयंसेवकांच्या परिपूर्ण साह्यामुळे अत्यंत सुकर झाल्या. कोणीही पूर्वपरिचयाचे नसून केवळ संघसूत्रामुळे सर्व योजना व्यवस्थित पार पडल्या. हा संघप्रभावाचाच परिणाम आहे.

**या दौऱ्यासाठी पूर्वतयारी काय केली होती ? त्याचा किती उपयोग झाला. आगामी काळात असा दौरा करायची वेळ आल्यास तुमच्या सूचना काय असतील ?**

भविष्यात ज्यांना कोणाला तिथे धनसंग्रह किंवा तत्सम कामाकरिता जायचे असेल, त्यांना आधी पाच-सहा महिने तिथल्या दोन-तीन महिन्याच्या कालावधीचे पूर्ण नियोजन करावे लागेल. तिथले सर्वचजण तीन तीन महिन्यांच्या रिकामे असणाऱ्या सर्व शनिवार-रविवारांचे

**२२ जुलै १९३१ : वासुदेव बळवंत गोगटे यांनी मुंबईचे गर्व्हनर हॉटसन यांच्यावर सोलापूरच्या मार्शल लॉचा सूड म्हणून गोळी झाडली.**

आधीच नियोजन करतात. त्यामुळे आधीच त्यांना 'आम्ही अमक्या अमक्या दिवशी आलो. तर चालेल का?' अशी विचारपूस करून भेटी-गाठींचे नियोजन करता येते. या भेटीत आम्ही तीन हजार लोकांना भेटलो. पण भेटीचे नियोजन असते; तर सहा-सात हजार लोकांना सहज भेटू शकलो असतो.

आम्ही वर्धिनीची चित्रफीत घेऊन गेलो होतो. त्यामुळे जवळ जवळ साठ ते सत्तर टक्के काम ती चित्रफीतच करीत असे. पहिल्या दोन-चार मिनिटात 'स्व'-रूपवर्धिनीची कल्पना देत असू. त्यानंतर वर्धिनीच्या कार्यातील काही विशेष अनुभवांचे हृदयस्पर्शी अनुभवांचे वाचन करीत असे. त्यानंतर प्रश्नोत्तरे होत असत. याच्या जोडीला हिंदी व इंग्रजीवर प्रभुत्व असणेही आवश्यक.

**तेथील भारतीयांशी बोलताना अशा उद्देशाने जे दौरे होतात, त्यासंबंधी तेथील भारतीयांना काय वाटते ?**

एकाने असे बोलून दाखविले की, सगळेच जण कलावंत, कार्यकर्ते, अमेरिकेत धनसंग्रहासाठी येतात. त्याच त्याच जणांकडे ही मंडळी सतत जात असल्याने ते हैराण झालेले असतात. अनेकांची समजूत अशी असते की, इथे जणू सगळे कल्पवृक्ष आहेत, पैशांच्या खाणी पडल्या आहेत. त्यामुळे अर्थसाह्यासाठी कोणी तिथे गेले, तर अनेकवेळा तिथल्या काहींची प्रतिक्रिया जरा नाराजीचीच असते. त्यामुळे भेटी घेण्यापूर्वी ज्यांच्याकडे जाणार आहोत, त्यांच्याकडून अशी नाराजी होणार नाही असे आधी पहावे. ज्या कामासाठी पैसे देत आहोत, त्याच कामासाठी ते खर्च होतात ना अशी जबरदस्त शंकाही त्यांच्या मनात असते. तिथे मला दहा-वीस माणसे अशी भेटली की, आत्तापर्यंत त्यांनी कोणालाच मदत केलेली नाही. परंतु वैशिष्ट्य असे की, त्यांनी 'स्व'-रूपवर्धिनीला मात्र पहिल्यांदा मदत केली आहे. आपला पत्रव्यवहार, आपले कार्यवृत्त, आपला सहवास वा संपर्काद्वारे होणारा व्यवहार यातूनच समोरच्या व्यक्तीच्या मनात आपल्याबद्दल विश्वास निर्माण होऊ शकतो व कामात यश येते, याचाही विचार तेथे जाणाऱ्यांनी केला पाहिजे.

**जे जे अनिवासी भारतीय तेथे भेटले, त्यांच्याशी बोलल्यानंतर त्यांची मानसिकता कशी जाणवली ?**

मनापासून देशप्रेम असलेले अनेकजण तेथे आहेत. येथे घडणाऱ्या घटनांविषयी त्यांच्या मनात सतत औत्सुक्य असते. चिंता असते. आपण भरपूर पैसे मिळवतो, त्यातील काही भाग देशविकासाच्या कामी देण्याचीही त्यांची तयारी असते. पण कोणत्या कामासाठी पैसे द्यावेत हे त्यांना ठरवताना मर्यादा येतात. कारण त्यांच्याशी चांगल्या रीतीने चालू असलेल्या अनेक समाजोपयोगी संस्थांचा संपर्कच नसतो. हा संपर्क जितका वाढेल आणि त्यात सातत्य वाढेल तितका या देशबांधवांचाही सहभाग वाढता राहील, याची मला खात्री वाटते.

**दीपस्तंभ**

★ ***यशःश्री माळ घालण्यासाठी तुझ्यामागे धावत येईल, पण त्यासाठी यशाची अभिलाषा बाळगून काम करण्याचे सोडून दे.***

★ ***पहिल्यांदा हृदय जिंका, मग बुध्दीला आवाहन करा.***


***- स्वामी रामतीर्थ***

**६ फेब्रुवारी १९३२ : कलकत्ता विश्वविद्यालयात कु. वीणा दास यांनी पदवीदान समारंभात बंगालच्या गव्हर्नरवर गोळी झाडली.**

## वाढते काम, वाढता खर्च ...

महागाई वाढतेच आहे. याचे कोणालाच काही वाटत नाही की काय, असे वाटावे असे वातावरण समाजात सर्वत्र वावरताना दिसते. महागाई वाढली की पगार वाढीसाठीची आंदोलने हा आज नित्याचा व्यवहार झाला आहे. नोकरदार वर्गाच्या हाती यापेक्षा वेगळा काही खात्रीचा उपाय नसतो. सरकारी अनुदानातून चाललेल्या संस्थांमधूनही हेच चित्र दिसते. मग सरकारी वाढीव खर्च पुन्हा एकदा नागरिकांच्याच खिशातून कररूपाने काढते. पण जी समाजहिताची कामे कोणत्याही सरकारी मदतीशिवाय चालतात; त्यांचे काय होत असेल? इच्छा नसली तरी खर्च वाढतो. काम तर वाढत असतेच. वाढलेल्या खर्चाची तरतूद करताना, ज्यांनी अधिक वेळ संस्थेच्या उद्दिष्टपूर्तीसाठी द्यायचा ते अर्थउभारणीच्या कामासाठी कंबर कसून उभे राहतात. अर्थात, समाजात अशा कामांबद्दल आपुलकीचा भाव असणारी माणसे, धर्मादाय न्यास, उद्योजक आहेत, म्हणून ही कसरत कशीबशी साधता येते.

पण अशी कसरत करायला लागण्याऐवजी काही प्रमाणात का होईना; पण निश्चित आर्थिक रचना असणे, पर्यायाने कायमनिधी उभा करणे, हे अतिशय आवश्यक झाले आहे.



'स्व'-रूपवर्धिनीच्या बाबतीत सांगायचे, तर गेल्या आर्थिक वर्षात (९८-९९) प्रत्यक्ष खर्च एकूण रू. ११,२२,९९२/- इतका झाला व त्यापैकी रू. ८,६७,०००/- इतका खर्च हा उद्दिष्टांवरील कामासाठी झाला.

'स्व'-रूपवर्धिनीनेही कायमनिधी उभा करण्याची सुरुवात केली असून, या रकमेतून वरील एकूण खर्चापैकी फक्त ४४% रक्कम ही कायमनिधीच्या व्याजातून मिळाली. आगामी दहा वर्षामधे होणाऱ्या कार्यवाढीचा, महागाई निर्देशांकांत होणाऱ्या वृध्दीचा विचार केला तर, महत्त्वाचे मूलभूत असे हे काम सुरळीतपणे चालण्यासाठी कायमनिधीची रक्कम ही साधारणपणे तीन कोटी रूपये असण्याची आवश्यकता आहे. या संदर्भात आपण सहाय्य करीत आहातच; पण असे अर्थसहाय्य करू शकणाऱ्या व्यक्ती, संस्था, न्यास यांची जोड या कामाला लागण्यासाठीही आपण काही सहाय्य करावे, ही विनंती यानिमित्ताने आपल्याला करावीशी वाटते.

### तक्रार 'निवारण' --- असेही !

शाखेत येणाऱ्या वर्धकांच्या वर्तनात बदल हळूहळू होत असतात. काही वेळेस संपर्काला गेलेल्या कार्यकर्त्यांना त्या घरातील वर्धक किंवा वर्धिकेसंबंधीच्या पालकांच्या तक्रारींना सामोरे जावे लागते. त्या वर्धकाला किंवा वर्धिकेला पालकांच्या समोर रागावताही येत नाही. परंतु यांच्याशी शाखेत जेव्हा अनौपचारिक बोलणे होते, त्यावेळेस त्यांच्याकडून 'आपल्याबद्दलच्या' तक्रारी यापुढे येणार नाहीत, याची खात्री कार्यकर्त्यांना मिळते. अशाच एका घरात आल्याबरोबर दिसेल अशा जागी त्या घरातल्या वर्धिकेने मोठ्या अक्षरात लिहून ठेवले होते, 'यापुढे मी दररोज घरातले काम न कंटाळता करीन व त्याचा परिणाम शाखेवर किंवा अभ्यासावर होऊ देणार नाही.'

**२४ सप्टेंबर १९३२ : कुमारी प्रीतिबहादूर यांनी चितागांवच्या युरोपियन क्लबवर आक्रमण करून लढता लढता प्राणार्पण केले.**

# दैनंदिन प्रकल्पांचे पत्ते व संपर्काच्या वेळा

१) **रामकृष्ण शाखा**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११.
शाखाप्रमुख - **श्री. प्रशांत वेदपाठक**
शाखापालक - **श्री. शिरीष पटवर्धन**

१) **अभेदानंद शाखा**
वीर बाजीप्रभू विद्यालय, गोखलेनगर, पुणे -१६
शाखाप्रमुख - **श्री. मंदार रायरीकर**
शाखापालक - **श्री.शिरीष अडके**

३) **विवेकानंद शाखा**
रामदासस्वामी माध्यमिक विद्यालय, पांडवनगर, वडारवाडी, पुणे - १६
शाखाप्रमुख - **श्री. पंकज मुंडे**
शाखापालक - **श्री. र. ज. नरवणे**

४) **अखंडानंद शाखा**
कै. यशवंतराव चव्हाण विद्यालय, बिबवेवाडी, पुणे - ३७
शाखाप्रमुख - **श्री. विनोद बिबवे**
शाखापालक - **श्री. राजाभाऊ लवळेकर**

५) **सुबोधानंद शाखा**
ज्ञानदा प्रशाला, नवसह्याद्री वसाहत, कर्वेनगर, पुणे - ५२
शाखाप्रमुख - **श्री. संदीप मोरे**
शाखापालक - **श्री. व. ना. दाते**

६) **योगानंद शाखा**
नवीन मराठी शाळा, शनिवार पेठ, पुणे-३०
शाखाप्रमुख - **श्री. निशिकांत वाईकर**
शाखापालक - **श्री. पराग लकडे**

७) **भगिनी निवेदिता शाखा**
आगरकर मुलींचे विद्यालय, रास्ता पेठ, पुणे - ११
शाखाप्रमुख - **कु. हेमांगी खेडकर**
शाखापालक - **श्री. शिरीष पटवर्धन**

८) **राजमाता जिजाऊ शाखा**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय, शाळा क्र. ७४ लक्ष्मीनगर, पुणे - ९
शाखाप्रमुख - **कु. दिपाली पवार**
शाखापालक - **श्री. अविनाश जोशी**

९) **आजोळ**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११.
प्रकल्प प्रमुख - **श्री. जयंत कवटेकर**
संपर्क - सोम. ते शुक्र. स. १.३० ते ५

१०) **वीर अभिमन्यू बालशाखा**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११
शाखाप्रमुख - **श्रीमती पुष्पाताई नडे**

११) **शारदामणि महिला विभाग व बालवाडी 'पाकोळी'**
२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११
प्रकल्पप्रमुख - **श्रीमती पुष्पाताई नडे**
संपर्क - सोम.ते शुक्र.स. १०ते१, शनि.९ते १०.३०

१२) **कार्यालय** २२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे - ११
श्री. रामकृष्ण रानडे, व्यवस्थापक
सौ. वासंती कुलकर्णी
कु. स्मिता कुलकर्णी
श्री. पुरूषोत्तम अभ्यंकर

**संपर्क** - सोम.ते शनिवार, दु. ११.३० ते सायं. ६.००

**दैनंदिन शाखांसाठी संपर्क :**
सोम. ते शुक्र. सायं ६.१५ ते रात्री. ८.३०.
शनिवार दु. ४.३० ते सायं ७.३०.
रविवार स. ७.३० ते १०.००

**प्रधान शाखापालक :**
श्री. दि. दा. जोशी,
जनता गृहरचना संस्था,
बिबवेवाडी, पुणे - ३७.

**ऑक्टोबर १९४३ : सुभाषबाबूंची हंगामी भारत सरकार स्थापना व त्याला नऊ राष्ट्रांची मान्यता. १९४४ मधे त्यांची ब्रिटीशांविरूद्ध युद्धघोषणा. मणिपूरला स्वातंत्र्यध्वज फडकवला. १८ ऑगस्ट १९४५ : सुभाषबाबू कालपटावरून अंतर्धान.**

# 'स्व'-रूपवर्धिनी म्हणजेच ...

- ☼ सहवासातून शिक्षण व शिक्षणातून संस्कार घडवणारी संस्था
- ☼ व्रती शिक्षक आणि तळमळीचे कार्यकर्ते यांच्याद्वारा हेतुप्रधान शिक्षण देणारी एक चळवळ
- ☼ आपुलकीने व जिव्हाळ्याने मुलांचे प्रश्न हाताळणारा, सर्वांना आपलासा वाटणारा परिवार
- ☼ विपरित परिस्थितीवर मात करायला शिकविणारी कार्यशाळा
- ☼ राष्ट्रीय चारित्र्य, सार्वजनिक शिस्त आणि सामाजिक बांधिलकी जोपासणारा एक 'राष्ट्रीय प्रकल्प'
- ☼ परिस्थितीचा शाप आणि वातावरणाचा ताप असला, तरीही सदैव प्रगतीचाच मार्ग दाखविणारी, आपुलकी निर्माण करणारी संघटना
- ☼ अर्थात, ही पूर्ण वेळाची शाळा नाही; शाळेला पर्यायही नाही. विविध उपक्रमांद्वारे एकही दिवस सुट्टी न घेता वर्षभर सायंकाळी राबविला जाणारा हा एक शिक्षण प्रकल्प आहे.

दि. २० जानेवारी १९४६ ते २१ एप्रिल १९४७ : भारतात सैनिक विद्रोह. अखेर १५ ऑगस्ट १९४७ ला देश विभाजन व स्वातंत्र्यप्राप्ती. पंडित नेहरू, मौलाना आझाद, वल्लभभाई पटेल, पट्टाभि सितारामय्या, डॉ. हर्डीकर, आचार्य काकासाहेब कालेलकर या नेत्यांचा समावेश असलेल्या काँग्रेसच्या ध्वजसमितीने स्वतंत्र भारताचा राष्ट्रीय ध्वज केशरी रंगाचा असावा व ध्वजदंडाच्या बाजूला चरख्याचे चित्र असावे,असा एकमताने निर्णय घेतला. हा निर्णय पुढे अनपेक्षितरित्या डावलण्यात आला.